<u>सभापतीस्थानी माननीय उपाध्यक्ष</u>

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अलिबाग ( जि.रायगड ) तालुक्यातील खारेपाट विभागात उधाणाच्या भरतीमुळे भातशेतीच्या झालेल्या नुकसानीबाबत**

**(1) * 37587 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील** : सन्माननीय **खार जमीन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 25 नोव्हेंबर, 2007 रोजी आलेल्या उधाणाच्या भरतीमुळे अलिबाग ( जि.रायगड) खारेपाट विभागातील सुमारे 8 गावातील भात शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे हे खरे आहे काय,

(2) उधाणाच्या पाण्याने भातशेतीचे नुकसान होऊन देखील खारलॅन्ड अधिकाऱ्यांनी तेथील बंदराच्या कामाकडे दुर्लक्ष केल्याने संतप्त शेतकऱ्यांनी 4 डिसेंबर, 2007 रोजी खारलॅन्डचे शाखा अभियंता श्री. क्षीरसाट यांना घेराव घातला, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने शेतकऱ्यांच्या शेतीच्या झालेल्या नुकसानाबाबत दखल घेतली आहे काय ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) हे अंशत: खरे आहे.

(2) दिनांक 4.12.2007 रोजी संबंधीत लाभधारक व पदाधिकारी खारभूमी कामासंदर्भात चर्चा करणेसाठी खारभूमी विकास उपविभाग, अलिबाग येथे आले होते. त्यावेळी शाखा अभियंता श्री.शिरसाठ यांचे बरोबर चर्चा झाली. चर्चेनुसार नुकसान झालेल्या बांधाची दुरुस्ती तातडीने करणेत येईल असे लाभधारकांना सांगण्यात आले.

(3) खारभूमी बांधाचे झालेले नुकसान तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक लाभधारकाकडून/ ग्रामपंचायतांकडून दुरुस्त करुन घेतले आहे व योजना सुस्थितीत ठेवण्यात आल्या आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अलिबाग तालुक्यातील खार जमिनीच्या बांध-बंदिस्तीचे नुकसान झाले, शेतकऱ्यांच्या जमिनीचेही नुकसान झाले याचे उत्तर शासनाने "अंशत: खरे आहे" असे दिलेले आहे. याचा अर्थ काय आहे ? माझा प्रश्न असा आहे की, यामध्ये एकूण किती रुपयांचे नुकसान झालेले आहे ? शासनाने उत्तरात असे म्हटले आहे की, ग्रामपंचायतीला काम करायला सांगितले. ग्रामपंचायतीने आतापर्यंत त्यांच्या निधीतून किती कामे केली ? तसेच ही कामे करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे आर्थिक तरतूद आहे काय ? तसेच ग्रामपंचायतींना ही कामे करण्यासाठी शासनाने डायरेक्ट पैसे दिले आहेत काय ? प्रामुख्याने ही जमीन ओसाड ठेवून भांडवलदारांच्या घशात घालण्याचे काम शासनाच्या वतीने जाणुनबुजून होत आहे. पाणी घुसल्याने या ठिकाणची हजारो एकर जमीन ओसाड होत आहे. समुद्राचे पाणी जमिनीत शिरत आहे ते

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील........ ता.प्र.क्र.37587......

थांबविण्याचे काम शासन करणार काय ? आणि यासाठी असलेली आर्थिक तरतूद भरपूर प्रमाणात होणार काय ? तसेच कोकणातील खार जमिनीसाठी एकूण तरतूद किती आहे आणि किती क्षेत्राचे नुकसान झालेले आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : "अंशत: खरे आहे" असे जे म्हटले त्याचे कारण असे की, यामध्ये एकूण 10 योजना आहेत त्यात 2764 हेक्टर एवढया क्षेत्रफळापैकी नुकसान झालेले आहे त्यापैकी 40.56 एकरामध्ये पाणी घुसले असल्यामुळे "अंशत: खरे आहे" असे म्हटले आहे. या कामासाठी 88.29 लाख एवढा खर्च येणार आहे व त्या अनुषंगाने ही कार्यवाही सुरु आहे. 25 नोव्हेंबर रोजी समुद्रात उधाणामुळे भरती आली होती त्यामध्ये रेवस बंदराच्या तटबंदीला धोका पोहचला आहे व त्याची दुरुस्ती करण्यासाठी 88.29 लाख एवढा खर्च येणार आहे. ही दुरुस्ती प्रामुख्याने ग्रामपंचायतींच्या माध्यमातून आपण करीत आहोत. ठाणे जिल्हयात सुध्दा एमआरईजीएस योजना लागू झाली असून त्या योजनेच्या माध्यमातून हा खर्च करण्यात येत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 37587 .........**

श्री. बाळासाहेब थोरात ....

या करिता सुध्दा मोठया निधीची आवश्यकता आहे. अलिबाग येथे जे नुकसान झालेले आहे त्याची दुरुस्ती करण्यासाठी एक प्रस्ताव तयार केला असून संपूर्ण कामाच्या नुतनीकरणासाठी 13 कोटी रुपये खर्च येणार असून यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी संपूर्ण कोकणपट्टीसाठी किती खर्च येणार आहे याची माहिती विचारलेली आहे परंतु सदर माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, शेतक-यांच्या संदर्भात अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला आहे. या ठिकाणी बंदरांच्या कामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे अलिबाग खारेपाट विभागातील सुमारे 8 गावातील शेतक-यांच्या भात शेतीचे प्रचंड नुकसान झालेले आहे. रायगड आणि ठाणे जिल्हयातील शेतकरी हा सोशिक असल्यामुळे शासन त्यांचा अंत पाहत आहे. 8 गावात जे नुकसान झालेले आहे त्यासाठी 13 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे अशी माहिती या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेली आहे. त्यामुळे या ठिकाणच्या दुरुस्तीचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे तसेच ज्या शेतक-यांचे उधाणामुळे नुकसान झालेले आहे अशा शेतक-यांना आतापर्यंत किती नुकसानभरपाई देण्यात आलेली आहे?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या ठिकाणचा एकंदर खर्च 88 लक्ष रुपये असून यासंदर्भातील पुर्णपणे दुरुस्ती करीत आहोत. 50 वर्षापूर्वीची ही कामे असून खार लँड डिटिरिऑरेशनचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असून यामध्ये नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात माननीय मंत्रीमहोदयांनी अलिबाग तालुक्यातील धेरंड गावाला नुकसानभरपाई दिली जाईल असे सांगितले होते तसेच या गावाची पाहणी सुध्दा त्यांनी केली होती परंतु अद्यापपर्यंत नुकसानभरपाई देण्यात आलेली नाही. असे असतांना खार लँडच्या नुकसान भरपाईसाठी 13 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. परंतु बजेटमध्ये कोकण

....2

**ता.प्र.क्र. : 37587 .........**

श्री. जयंत प्र.पाटील....

रिजनवर 7-8 कोटी रुपयांची तरतूद केली जात असते. त्यामुळे खार लँडसाठी आपण 13 कोटी रुपये कसे काय खर्च करणार आहात? त्यामुळे यासंदर्भातील तरतूद वाढविण्यासाठी शासन काही भूमिका घेणार आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, तरतूद वाढविण्याकरिता प्रयत्न केले जात आहेत. मी सभागृहाला पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, अतिवृष्टीमुळे जे नुकसान होते त्यासाठी शेतक-यांना नुकसानभरपाई दिली जात असते. अशाच प्रकारची नुकसानभरपाई सन 2005-2006 मध्ये देण्यात आली होती.

----------

**( तारांकित प्रश्न क्रमांक 38047 )**

**( सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)**

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उस्मानाबाद जिल्हयातील रब्बी हंगामात शेतातील पिके पाण्याविना कोलमडुन गेली व बियाणांची उगवण न झाल्याबाबत**

**(३) * ३७६२० श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री.सय्यद जामा , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री.राजन तेली :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात रब्बी हंगामात शेतातील डोलणारी मूग, उडीद, बाजरी,साळ, तुर, भुईमूग, सोयाबीन इ.पिके पाण्याविना कोलमडुन गेली व बियाणांची उगवण न झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनी राष्ट्रीय पिक विमा हप्त्याची रक्कम तात्काळ वाटप करावी तसेच शासनाकडून आर्थिक मोबदल्याची मागणी माहे डिसेंबर, २००७ मध्ये वा त्या दरम्यान कृषी विभागाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीच्या आधारे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व कार्यवाही किती कालावधीत होणे अपेक्षित आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) अशा प्रकारच्या मागणीचे पत्र कृषि विभागास अद्यापपर्यंत प्राप्त झालेले दिसत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 12.10

ता.प्र.क्र.37620..

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "अशा प्रकारच्या मागणीचे पत्र कृषी विभागास अद्यापपर्यंत प्राप्त झालेले दिसत नाही " आम्ही हा तारांकित प्रश्न विचारल्यानंतर या सबंधी संबंधित अधिकाऱ्यांनी चौकशी करुन वस्तुस्थितीची पहाणी केली आहे काय, असल्यास त्यांना त्यात काय आढळून आले होते आणि पाहणी केली नसल्यास त्याची कारणे काय आहेत याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्हयातील रब्बीच्या पिकांना पीक विमा योजनेतून पैसे मिळण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारे मागणीचे पत्र कृषी विभागास प्राप्त झाले नाही. पीक विमा योजनेचे 2 कोटी 90 लाख रुपये 3 लाख 12 हजार शेतकऱ्यांनी भरलेले आहेत. त्याची आकडेवारी प्राप्त झालेली आहे तसेच क्रॉप कटींग झालेले आहे त्याची आकडेवारी आलेली आहे. पीक विमा कंपनी मार्फत त्या आकडेवारीची छाननी केली जाते व पीक विमा कंपनीकडून 15 एप्रिलच्या आत त्यासबंधीचा निर्णय जाहीर केला जातो. त्याप्रमाणे 15 एप्रिलपर्यंत निर्णय जाहीर होईल आणि मे महिन्यात नुकसान भरपाईच्या रक्कमेचे वाटप शेतक-यांना केले जाईल.

-----

ता.प्र.क्र. 39378

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील पाझर तलाव व वळण बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याबाबत**

**(५) * ३७६५७ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली** : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात निळुंज, पिंपळे, धनकवठी, जाधववाडी, उराची वाडी, गुऱ्होळी, साकुर्डे, वाद्यापूर मावडी, क.प.वाल्हे (पातरमाळा) शिवरी, सोमुर्डी व चांबळी या ठिकाणी पाझर तलाव व देवडी मावडी सुपे, कुंभोशी व दिवे या ठिकाणी बंधारे करण्यात आले असून सदर पाझर तलाव व वळण बंधाऱ्यांची होत असलेल्या गळतीची दुरुस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गळतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी रू.६.१० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर निधीतून मौजे शिवरी ( कासार बुआ ) येथील पाझर तलाव दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले असून ते प्रगती पथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, " सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी ६.१० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे आणि सदर निधीतून मौजे शिवरी ( कासार बुआ ) येथील पाझर तलाव दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून ते प्रगती पथावर आहे." या बाबतीत मला माननीय मंत्रीमहोदयांना असा स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, इतर पंधरा ठिकाणच्या पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या कामासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील पुरंदर तालुकयातील पाझर तलावाची , के.टी.वेअर्स आणि वळण बंधाऱ्यांची ही कामे आहेत. १९७२ साली पाझर तलावाचे काम सुरु झाले होते आणि १९७४ साली संपले होते. १९७२ सालापासून सुरु झालेले शेवटचे काम २००२ सालापर्यंत पूर्ण केले गेले आहे. १९७२ साली दुष्काळी कामे हाती घेण्यात आली होती त्यामध्ये काही पाझर तलावाचे काम देखील होते ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर त्यावेळी काही के.टी.वेअर्सची आणि वळण बंधाऱ्यांची कामे हाती घेण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे.

३

या कामासाठी जिल्हा परिषदंना जो काही निधी प्राप्त होत असतो तो अत्यंत मर्यादित असल्यामुळे सगळया कामांची दुरुस्ती करण्याबाबत काही प्रश्न होते. सी.ओ.टी. घेऊन मौजे शिवरी (कासार बुआ ) येथील जिल्हा परिषदेच्या पाझर तलावाच्या दुरुस्तीचे काम आता सुरु करण्यात आलेले आहे. ते काम झाल्यानंतर त्या कामाचे रिझल्टस काय येतात हे पाहून बाकीच्या पाझर तलावाच्या दुरुस्तीच्या बाबतीत निर्णय घेतला जाईल.

---

ता.प्र.क्र. ४०३३८

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे जिल्ह्यातील वडगाव जलशुद्धीकरण केंद्रामधून पुरविल्या जाणाऱ्या अस्वच्छ पाण्यामुळे तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत

**(७) * ३७७७० श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री. सुधाकर गणगणे , श्री.राजन तेली :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वडगाव जलशुद्धीकरण केंद्रामधून पुरविल्या जाणाऱ्या अस्वच्छ पाण्यामुळे या भागात राहणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्याचे दिनांक १२ जुलै, २००७ च्या सुमारास निदर्शनास आल्या हे खरे आहे काय,

(२) वडगाव येथील जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम गैरनियोजन अतिघाईने केल्याने अस्वच्छ पाण्याचा पुरविठा होत असल्याचे बोलले जात आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत का आढळून आले व त्या अनुषंगाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली व नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.रणजित कांबळे,अजित पवार यांच्याकरिता**: (१) होय,

(२) वडगाव जलशुद्धीकरण केंद्राचे काम जुलै २००७ मध्ये अपूर्ण अवस्थेत असल्याने गढूळ पाणी काही प्रमाणात पुरविले जात होते, मात्र या पाण्यावर क्लोरीनेशन प्रक्रिया करण्यात येत होती.

(३) व (४) मुळ कंत्राटदाराने विहित मुदतीत काम पुर्ण न केल्याने दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन उर्वरित काम दुसऱ्या कंत्राटदारामार्फत पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत जलशुद्धीकरण केंद्रातून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, ज्या कंत्राटदाराने हे काम पूर्ण केलेले नाही त्याच्या विरुध्द कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली आहे ? उर्वरित काम अन्य ठेकेदाराकडून पूर्ण करुन घेण्यासाठी किती जादा खर्च येणार आहे ? ज्या कंत्राटदाराने काम पूर्ण केले नाही त्या कंत्राटदाराचे नाव काय आहे ? त्याचे नाव काळया यादीत प्रसिध्द करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, उर्वरित काम 2 कोटी 69 लाख रुपयांचे असून ते काम पूर्ण झालेले आहे.हे काम पूर्वी एका कंत्राटदाराला दिले होते परंतु त्यांनी ते अर्धवटच केले होते. त्या संबंधी कोर्टात केस पेन्डीग असून जोपर्यंत कोर्ट या प्रकरणात आदेश देणार नाही तोपर्यंत त्यांच्या विरुध्द कोणतीही कारवाई करणे शक्य नाही. आता हे काम पूर्ण झाले असून या जलशुध्दीकरण केन्द्रातून शुध्द पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38306

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MHM/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 12:15

<u>ता.प्र.क्र. 38047 चर्चेला घेण्याबाबत.</u>

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि अन्य विरोधी पक्ष सदस्य यांना मी माझ्या दालनामध्ये चर्चेला बोलाविले होते आणि त्याप्रमाणे ते माझ्या दालनात चर्चेला आले होते. तेथे माझ्या आग्रहामुळे ते अधिक काळ थांबले होते त्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सुरूवातीस ते सदनात उपस्थित राहू शकले नाहीत. परिणामी प्रश्नोत्तराच्या यादीतील क्र.2 वर असलेला त्यांचा ता.प्र.क्र. 38047 हा चर्चेविना गेला. त्यांनी विनंती केल्यामुळे मी विशेष बाब म्हणून त्यांचा यादीतील क्रमांक 2 वर असलेला ता.प्र.क्र.38047 हा चर्चेला घेण्यासाठी त्यांना परवानगी देत आहे.

**पॅकेजमधील वस्तुंचे वाटप करताना झालेल्या गैरप्रकाराबाबत**

**(2) * 38047 श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री.सागर मेघे , श्री.केशवराव मानकर , श्री.सय्याद पाशा पटेल , श्री. श्रीकांत जोशी** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयात शेतीची अवजारे, गायी वाटप, सेंद्रिय शेतीसाठी निविष्ठा, बैलजोडी, बैलगाडी पंपसंच आदि 1 लाख 48 हजाराहून अधिक वस्तूंचे वाटप करण्यात आले आहे व त्यासाठी दिडशे कोटीहून अधिक रक्कम खर्च झाली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, हे वाटप सुरू असताना वाटपास जबाबदार असणाऱ्या सहा जिल्हयातील विविध अधिकाऱ्यांकडे 80 लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत हे खरे आहे काय,
(3) असल्यास , या तक्रारीचे स्वरूप काय आहे व त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(4) गैरप्रकार करणाऱ्या कोणत्या अधिकाऱ्यांना आतापर्यंत निलंबित करण्यात आले आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1) या योजनेअंतर्गत फेब्रुवारी, 2008 अखेर 1 लाख 53 हजारहून अधिक वस्तुचे वाटप करण्यात आले असून रुपये 90.79 कोटी खर्च झालेला आहे.
(2) होय.
(3) तक्रारीचे स्वरुप खर्चात अनियमितता, निविष्ठा व साहित्य निकृष्ट असणे व त्याचे वाटप वेळेत न करणे, नोंदवहीत नोंद व्यवस्थित न ठेवणे इ.असे आहे. या प्रकरणी चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे.
(4) यासंदर्भात खालील अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

1) श्री.विठ्ठल धोडूंजी भांदककर, उपविभागीय कृषि अधिकारी, आकोट,
2) श्री.मकसुद अहमद शेख, तंत्र अधिकारी तथा प्रभारी तालुका कृषि अधिकारी, अकोट,
3) श्री.प्रकाश लहू धुरंधर, कृषि अधिकारी तथा प्रभारी तालुका कृषि अधिकारी, अकोट,
4) श्री.प्रमोद रामकृष्ण कोलतकर, कृषि सहाय्यक कार्यालय, तालुका कृषि अधिकारी, आकोट,

..... डी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (पुढे चालू...) ता.प्र.क्र.38047 ...

5) श्री.रमेश सदाशिव वेतकर, कृषि सहाय्यक कार्यालय, तालुका कृषि अधिकारी, आकोट,
6) श्री.अशोक ना.कांडारकर, तालुका कृषि अधिकारी, कारंजा जि.वाशिम (दिनांक 17.1.2008 पासून सेवेत पुर्नस्थापित)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी या ठिकाणी सरळ प्रश्न विचारला होता की, विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्ह्यांत शेतीची अवजारे, गायी वाटप, सेंद्रीय शेतीसाठी निविष्ठा, बैलजोडी, बैलगाडी, पंपसंच आदी 1 लाख 48 हजाराहून अधिक वस्तुंचे वाटप करण्यात आले आहे व त्यासाठी दीडशे कोटीहून अधिक रक्कम खर्च झाली आहे, हे खरे आहे काय ? त्यावर उत्तर देताना माननीय कृषी मंत्र्यांनी 'यासाठी केवळ 90 कोटी रूपये खर्च झाला आहे' असे म्हटले आहे. सभापती महोदय, ही अवजारे वाटताना आणि दुधारू जनावरे वाटताना या योजनेत प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे अशा प्रकारच्या तक्रारी संबंधित अधिकाऱ्याकडे देण्यात आल्यानंतर त्याची चौकशी झाल्यानंतरही त्याबाबत अद्यापी कारवाई संबंधितांवर झालेली नाही. उदाहरण म्हणून मी सांगेन की, खामगाव जिल्ह्यातील मागटा गावामध्ये 3 बचतगटांना म्हशींचे वाटप झाले असल्याचे कागदावर दाखविण्यात आले असले तरी मुळात तेथे लाभार्थींना म्हशी वाटल्याच गेल्या नाहीत. याबाबत मी माननीय मंत्री श्री.अनिस अहमद यांना फोन देखील केला होता. त्या ठिकाणी म्हशीच काय पण हेले, वासरू वगैरे काहीही वाटण्यात आलेले नाही. त्या योजनेतून काँग्रेसच्या एका माणसाने संगनमताने पैसे काढले आहेत. त्या जनावरांचे फूड देखील तेथे ट्रकभर खाली झाले पण लाभार्थींना, बचतगटांना त्यातून काहीही मिळाले नाही, एकही म्हैस मिळाली नाही. मी याबाबत फोन वरून कळविल्यानंतर देखील अधिकाऱ्यांवर कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, अकोला जिल्ह्यात 1 हजार गायींचे वाटप झाल्याचे दाखविले गेले आहे पण प्रत्यक्षात तसे वाटपच झालेले नाही. इतका प्रचंड भ्रष्टाचार यामध्ये झालेला आहे. बैलजोडीवर सह्या करण्यात आल्या आणि आता तुमचे अधिकारी लोकांना सांगत आहेत की, तुम्ही रॉकेल पंप घ्या. ज्या शेतकऱ्यांच्या शेतात विहीर नाही त्यांना पंप देण्याची तयारी त्यांनी चालविली आहे. तुम्हाला बैलजोडी देणार म्हणून सांगितल्यानंतर, त्याप्रमाणे त्या पेपरवर सही करून घेतल्यानंतर आता बैलजोडी न देता रॉकेलचा

...... डी 3 ...



KBS/MHM/KGS. श्री. गायकवाड नंतर --- 12:15

पंप घ्या म्हणून सांगितले जात आहे. ज्यांच्याकडे विहीरच नाही त्यांना पंप कशासाठी देता आहात? मग पॅकेजचे काय झाले ? सभापती महोदय, आंधळा दळतो आहे आणि कुत्रं पीठ खाते आहे अशी परिस्थिती तेथे सध्या निर्माण झालेली आहे. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची, माननीय पंतप्रधानांनी तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी जे पॅकेज दिले होते त्याची श्वेतपत्रिका आपण जाहीर करणार काय ? ज्या अधिकाऱ्यांनी या पॅकेजमध्ये भ्रष्टाचार केला आहे त्याच्यावर ताबडतोब कारवाई करणार काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हशी वाटपासंबंधात जे सांगितले आहे त्याबद्दल निश्चितपणे चौकशी केली जाईल. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता आपण चौकशी काय करणार आहात ? माझ्याकडे त्या लाभाधारकांचे ॲफिडेव्हिट आहे. त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये याबाबत ततक्रार देखील केलेली आहे. बचतगटांना म्हशी मिळाल्या नाहीत म्हणून तक्रार देखील केलेली आहे पण त्या अधिकाऱ्यावर अजूनही कारवाई केलेली नाही. त्यांच्याबाबतीत पोलीस केस, गुन्हा रजिस्टर झालेला आहे मात्र अजून कोणालाही पकडले नाही. बैलजोडीवर सह्या घेतल्या आणि आता तुम्ही पंप घ्या म्हणून आग्रह चालला आहे. ते सारे कशासाठी ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ज्या नेमक्या तक्रारी आहेत त्याबद्दल चौकशी केली जाईल. ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यात बैलजोडी देतो म्हणून सांगून लाभार्थ्यांच्या सह्या घेतल्या आणि आता अधिकारी त्यांना जबरदस्तीने पंप घेण्यास सांगत आहेत.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये दुसरी तक्रार आहे की, 25 हजार पर्यंत 60 हजार कुटुंबांना मदत करतो आहोत त्यात निरनिराळ्या अटी आहेत. त्यामध्ये 90 कोटी रूपये आतापर्यंत खर्च करण्यात आला आहे. 1 लाख 53 हजार लाभार्थींना मदत केलेली आहे. यामध्ये पीक संरक्षणासाठी जी सुधारित अवजारे वाटण्यात आली त्यामध्ये 19 तक्रारी आलेल्या आहेत. ...

( यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

ता.प्र.क्र. 38047....

19 तक्रारी आल्या. त्याचप्रमाणे 7668 बैलगाडया वाटण्यात आल्या. त्या बैलगाडयांच्या गुणवत्तेच्या संदर्भात 21 तक्रारी प्राप्त झाल्या. पंपसंच 21 हजार वाटण्यात आले, त्यापैकी 12 तक्रारी प्राप्त झ ाल्या. पाईपलाईनच्या संदर्भात 2 तक्रारी प्राप्त झाल्या. जैविक खते आणि गांडूळ खते यांचे युनिट उभे करण्यात आले. त्या संदर्भात 32 तक्रारी करण्यात आल्या. आणि सर्वसाधारण 12 तक्रारी करण्यात आल्या. अशाप्रकारे एकूण 80 तक्रारी प्राप्त झाल्या. याबाबत नागपूरच्या अधिवेशनामध्ये चर्चा झाल्यानंतर श्री. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. त्या समितीमध्ये 31 अधिकाऱ्यांचे गट तयार करण्यात आले असून त्यांनी रँडम पध्दतीने निरनिराळया वस्तूंची चौकशी केली आहे. या समितीचा अहवाल अजून आलेला नाही.

श्री. पांडरंग फुंडकर : सभापती महोदय, माझी आग्रहाची मागणी आहे की, पंतप्रधान आणि मुख्यमंत्री पॅकेजच्या संदर्भात सहा जिल्हयांमध्ये किती शेतकऱ्यांना लाभ झाला, किती शेतकऱ्यांना वस्तूंचे वाटप करण्यात आले? किती शेतकऱ्यांना गाईंचे वाटप करण्यात आले या संदर्भात एक श्वेतपत्रिका जाहीर करण्यात येईल काय?

. श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, श्वेतपत्रिका काढण्याची गरज नाही. मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना माहिती देण्यास तयार आहे. सभापती महोदय, याकरिता नेमण्यात आलेल्या समितीने अधिवेशन संपण्यापूर्वी आपला अहवाल दिला पाहिजे अशाप्रकारचे निदेश दिनांक 13 मार्च रोजी आपण दिले आहेत. त्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आपणाकडून संरक्षण हवे आहे. श्रीमती गीता संजय ताटे, अध्यक्ष, श्रीमती अर्जुना अरुण चव्हाण, सचिव यांनी 50 रुपयांच्या स्टँप पेपरवर माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांच्याकडे सादर केलेले हे पत्र आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, सर्वांनी एकत्रित होऊन महिला बचत गटाकरिता दोन म्हशी याप्रमाणे 20 म्हशी मंजूर केल्या. त्यामध्ये वैयक्तिक हिस्सा म्हणून 10 हजार रुपये याप्रमाणे या प्रकरणात पुढाकार घेणारे राष्ट्रीय कॉंग्रेसचे नेते श्री. दामोदर पुंडलिक ताठे, राहणार मागटा यांनी मागितले. त्यानंतर एक ट्रक भरुन पशुखाद्य आले व ते श्री. ताठे यांच्या घरी उतरले. हे सर्व स्टँप पेपरवर लिहिले आहे. पशुखाद्य गायब केले, म्हशी मिळाल्या नाहीत. अनेक ठिकाणी भाकड म्हशी तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

ता.प्र.क्र. 38047....

श्री. नितीन गडकरी....

काही ठिकाणी हेले देण्यात आले. भाकड म्हशी आणि हेले यांच्याकडून दूध कसे काढायचे? हेले म्हणजे रेडे. जसा गाईचा सांड असतो त्याप्रमाणे म्हशीचा रेडा असतो....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी "हेले" नाही तर "हल्या" म्हटले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : आमच्याकडे त्याला "हेले" म्हणतात. हेले, हल्या, रेडा जे काही असेल ते. माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांना माहीत आहे. त्यांच्या खात्याने जादूचे प्रयोग केले. म्हैस मागितली असतांना रेडा दिला. आणि याठिकाणी दूधाची म्हैस मागितली असतांना भाकड म्हैस दिली. खूप प्रयोग झाले आहेत. हे सर्व 50 रुपयांच्या स्टँप पेपरवर दिले आहे. श्री. दामोदर ताठे यांनी म्हशी खाल्या, पशुखाद्य खाल्ले आणि 10 हजार रुपयांना चुना लावला. याबाबत माझा असा प्रश्न आहे की, या प्रकरणाची चौकशी करुन आपण त्या लोकांवर क्रिमिनल केस टाकली पाहिजे. माननीय प्रधान मंत्र्यांचे पॅकेज म्हणजे या लोकांना पर्वणी मिळाली आहे. त्याठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या 6 बँकांना 712 कोटी मिळाले, त्यांचे भले झाले. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, आपण माननीय मंत्री श्री. अनिस अहमद यांना विचारावे की, खरोखरच त्यांनी दूधाच्या म्हशी देण्याऐवजी भाकड म्हशी दिल्या? आणि हल्या वाटले? हे तपासून घेणार काय? दुसरे असे की, माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये कि ती रुपये मंजूर झाले व किती रुपये खर्च झाले? तिसरा प्रश्न असा की, माननीय विरोधी पक्षनेते म्हणतात त्याप्रमाणे आपण एवढे चांगले काम करीत आहात तर या सर्व प्रकरणाची आपण चौकशी करावी. 1 लाख 48 हजार लाभार्थींची चौकशी करुन श्वेतपत्रिका काढावी. कारण जे सत्य आहे, जे चांगले काम केले आहे ते लोकांसमोर आले पाहिजे. जर दुसरे मंत्री असते तर त्यांनी गृह विभागाच्या मोठया अधिकाऱ्याला नेमून पोलीस चौकशी केली असती. पंतप्रधान पॅकेजव्दारे आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या लोकांना एक्सपोज केले असते. हे सर्व लक्षात घेऊन याबाबत श्वेतपत्रिका प्रसिध्द करुन या प्रकरणी कुणामार्फत चौकशी करण्यात येणार आहे?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:25

ता.प्र.क्र.38047 . . . . .

श्री.अनिस अहमद : सभापति महोंदय, माननीय सदस्य श्री. गडकरी ने मेरा नाम लिया है, इसलिए मैं सभागृह को बताना चाहता हूॅं कि प्रधानमंत्री पॅकेज या चीफ मिनिस्टर पॅकेज में से किसी भी पॅकेज में "हलिया" नहीं बांटा गया है. केवल भेंस या गाय ही बांटी गई हैं.

श्री.नितीन गडकरी : 50 रुपए के स्टाम्प पेपर पर लिखकर दिया है

श्री.अनिस अहमद : वह गलत हो सकता है.

(सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी माननीय सभापतींकडे कागदपत्रे देतात.)

**सभापती** : माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी याठिकाणी सदरहू तारांकित प्रश्न दिलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, या बाबतीत झालेल्या गैरप्रकाराबाबत पोलिसांकडे सुध्दा तक्रार करण्यात आलेली आहे. या भागातील शेतकऱ्यांना रेडा किंवा हेले अशा प्रकारच्या जनावरांचे वाटप करण्यात यावे अशा काही माननीय मंत्री महोदयांनी सूचना दिलेल्या नाहीत. पण तरी देखील जर अशा प्रकारचे चुकून कुठे वाटप झाले असेल तर त्याची चौकशी करण्यात यावी.

श्री.अनिस अहमद : सभापति महोदय, हम इस बारे में चौकशी करेंगे और अगर ऐसी कोई गलती किसी अधिकारी ने की होगी तो उसके ऊपर एक्शन लिया जाएगा.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांना म्हशींचे वाटप करावे अशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. माननीय मंत्री श्री.अनिस अहमद यांचे हेल्यावर प्रेम नाही. परंतु या प्रकरणामध्ये 20 म्हशींच्या वाटपासाठी 10-10 हजार रुपये घेतलेले आहेत. मात्र म्हैस दिली नाही. तर हेले दिले, भाकड म्हशी दिल्या, ज्या दूध देत नाहीत.

**सभापती** : म्हणूनच मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, याठिकाणी या विशिष्ट प्रकरणाच्या बाबतीत चर्चा झाली आहे. त्यासंबंधातील कागदपत्रे देखील माझ्याकडे देण्यात आलेली आहेत. त्याअनुषंगाने माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी विभागामार्फत पुन्हा सखोल चौकशी करावी. तसेच याबाबतीत पोलीस केस देखील नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे पोलीस विभागामार्फत देखील ही चौकशी लवकर पूर्ण होईल याची काळजी धेण्यात यावी.

श्री.अनिस अहमद : सभापती महोदय, होय.

. . . 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38047 . . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील पेरेंट एजन्सी कृषी विभाग आहे. म्हणजे मेन लग्न या विभागाच्या घरी आहे आणि बाकीचे विभाग म्हणजे वेगवेगळया बॅण्ड पार्टी आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, राज्य शासनाने आणि केंद्र शासनाने पॅकेज जाहीर केलेले असले तरी, त्यामध्ये अनेक विभागांच्या कामांचा संबंध आहे. ज्याप्रमाणे यामध्ये कृषी विभागाच्या कामांचा संबंध आहे, त्याप्रमाणे पशुसंवर्धन विभागाचा देखील संबंध आहे. त्यानुसार माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले आहे की, याची चौकशी करण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, विदर्भातील सहा जिल्हयांसाठी दोन पॅकेज जाहीर करण्यात आलेली आहेत. केंद्र शासनाने 3750 कोटी रुपयांचे आणि राज्य शासनाने 1050 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. आम्ही जेव्हा-जेव्हा वाशिम, बुलढाणा, अकोला इ.जिल्हयांमध्ये या पॅकेज अंतर्गत केलेल्या कामाचा ब्रेकअप द्यावा अशी तेथील अधिकाऱ्यांकडे मागणी करतो, त्यावेळी असे सांगितले जाते की, याबाबतीत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारावे, प्लॅनिंग विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारावे व आम्हाला याबाबतीत कोणत्याही प्रकारची माहिती दिली जात नाही. म्हणून मघाशी माननीय विरोधी पक्षनेते आदरणीय श्री.पांडुरंग फुंडकरसाहेबांनी या भागामध्ये केलेल्या कामाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्यात यावी अशी मागणी केली होती. त्याप्रमाणे विदर्भातील सहा जिल्हयांमध्ये पॅकेजच्या अंतर्गत कशा प्रकारे निधी खर्च केलेला आहे ? कोणती कामे केलेली आहेत ? याची माहिती देण्यात यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याबाबतीत वेगळी श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता नाही. यासंदर्भात जो खर्च झालेला आहे, त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्री यांनी विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केलेले आहे. त्या पॅकेजचा उपयोग कशा प्रकारे करण्यात आलेला आहे ? यासंबंधात शेतकऱ्यांच्या, जिल्हयांच्या नावानिशी सर्व माहिती वर्तमानपत्रामध्ये यावयास पाहिजे. मग त्यातून सर्व सत्य देखील बाहेर येणार आहे.

. . . F 3



APR/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी नावे देण्याची गरज नाही. या पॅकेज अंतर्गत दीड लाख शेतकऱ्यांना निधी दिलेला आहे. ती सगळी नावे येथे कशी देणार ? पण जो खर्च झालेला आहे, त्याबाबतीत आम्ही माहिती देण्यास तयार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांची नावे नाहीत, पण किमान गावांची नावे आणि जो खर्च केला आहे, त्यासंदर्भातील आकडेवारी तरी याठिकाणी दिली पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी दुसऱ्या प्रश्नामध्ये असे विचारलेले आहे की,"असल्यास, हे वाटप सुरु असताना वाटपास जबाबदार असणाऱ्या सहा जिल्हयातील विविध अधिकाऱ्यांकडे 80 लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला "होय" असे उत्तर देण्यात आलेले आहे. या तक्रारी प्राप्त झाल्या असतील तर त्यामध्ये संबंधित शेतकऱ्यांना टोणगा किंवा हल्या अशा जनावरांचे वाटप करण्यात आले आहे अशा प्रकारच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, याठिकाणी कृषी विभागाच्या संदर्भात उत्तर देताना 80 तक्रारी प्राप्त झाल्या असे म्हटलेले आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38047 ......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मागच्या नागपूर अधिवेशनाच्या वेळी निकृष्ट दर्जाच्या साहित्याचे वाटप कसे केले जात आहे यासंदर्भात विधानसभा सदस्य श्री. संजय राठोड यांनी विधान सभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री. रामदास कदम यांच्या बंगल्याच्या बाजूला प्रदर्शन भरविले होते आणि ते प्रदर्शन पाहण्यासाठी अनेक लोक आले होते. इतक्या निकृष्ट दर्जाच्या सामानाचे वाटप केले गेले. यामध्ये कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. शासन याबाबत श्वेतपत्रिका का जाहीर करीत नाही ? 3700 कोटी रुपयांच्या पंतप्रधान पॅकेजचा ढिंडोरा पिटतात. कोणत्या जिल्ह्यात किती शेतकऱ्यांना लाभ झाला याची माहिती मिळाली पाहिजे. त्यांची नावे देऊ नका परंतु या माध्यमातून शेतकऱ्यांना कशाचे वाटप केले आणि किती शेतकऱ्यांना वाटप केले याबाबत श्वेतपत्रिका काढली पाहिजे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही सर्व माहिती देण्यास तयार आहोत.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांची अशी इच्छा आहे की, 6 जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारावी म्हणून ज्या वेगवेगळ्या पध्दतीने मदत केली त्यामध्ये जिल्हावार किती मदत केली, कोणत्या क्षेत्राकरिता मदत केली, पशुसंवर्धन विभागाने किती मदत केली, कृषी विभागाने किती मदत केली याची आकडेवारी आपण जरुर या सदनाला द्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही माहिती देण्यात येईल.

---

**सभापती** : यानंतर प्रश्न क्रमांक 37809 घेण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, अनुक्रमांक 4 वरील माझा प्रश्न राहिलेला आहे.

**सभापती** : मी आपल्याला बैठकीसाठी बोलवले नव्हते. मी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, मधुकर सरपोतदार, श्री. मधुकर चव्हाण तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना बैठकीस बोलवले होते.

श्री. केशवराव मानकर : त्यावेळी आमचा बहिष्कार होता त्यामुळे आम्हाला संधी द्यावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. यानंतर प्रश्न क्रमांक 37809 घेण्यात येईल..

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ KGS

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३५ पशुवैद्यकीय दवाखाने रिक्त पदांमुळे बंद पडल्याबाबत**

**(९) * ३७८०९ श्री.परशुराम उपरकर , डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील ३५ पशुवैद्यकीय दवाखाने रिक्त पदांमुळे बंद पडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिस अहमद** : (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पशुसंवर्धन खात्यातील एकूण ३३ पशुधन विकास अधिकाऱ्याची पदे रिक्त आहेत. तथापि, सदर रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार देऊन दवाखान्याचे काम सुरळीत चालू ठेवले आहे.

(२) होय.

(३) सदर रिक्त पदे भरणेबाबत २५१ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचेकडे अनुक्रमे दिनांक २२.३.२००६ व दिनांक २९.३.२००७ रोजी पाठविलेले आहे. आयोगाकडून शिफारस झाल्यानंतर रिक्त पदे भरण्यात येतील.

(४) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील असल्याने आयोगाची शिफारस झाल्याशिवाय रिक्त पदांवर नियुक्त्या देता येत नाहीत.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 35 पशुवैद्यकीय दवाखान्यांमधील पशुवैद्यकीय डॉक्टर्सची पदे रिक्त आहेत. हे 35 दवाखाने जिल्ह्यामध्ये विखुरलेले आहेत. या 35 दवाखान्यांमधील पदे रिक्त असताना दवाखाने सुरु असल्याचे उत्तरामध्ये म्हटले आहे. हे दवाखाने कसे सुरु आहेत ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, जगह भरने के लिए एम.पी.एस.सी. के द्वारा काम शुरु किया है. पिछले 6 महीने में एल.डी.ओ. की 297 जगह भरी हैं, 28 जगह और भरना है. मैं सभागृह को बताना चाहता हूँ कि मॅट ने स्टे दिया हुआ है और हाईकोर्ट में केस चालू है. ओपन केटेगरी की 200 जगह हैं और रिजर्व केटेगरी की 51 जगह हैं. जैसे ही स्टे व्हेकेट हो जाएगा, सारी की सारी जगह भरी जाएंगी और कोंकण के जिलों को पहली प्राथमिकता दी जाएगी.

. . . G3...

ता. प्र. क्र. 37809 .......

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, यामध्ये असा प्रश्न विचारलेला आहे की, सिधुदुर्ग जिल्ह्यातील 35 पशुवैद्यकीय दवाखाने रिक्त पदांमुळे बंद पडले आहेत, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. या 35 दवाखान्यांपैकी आज किती दवाखाने चालू आहेत आणि आज त्या ठिकाणी किती डॉक्टर्स कार्यरत आहेत ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, 12 एल.डी.ओ. वहां पर काम कर रहे हैं. बाकी जगह पर डॉक्टर्स नहीं है. उनको एडीशनल चार्ज दिया हुआ है और सभी दवाखाने चालू हैं.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय हे अत्यंत महत्वाच्या प्रश्नाला बगल देत आहेत. एमपीएससीकडून जागा भरण्याची जबाबदारी लोकांची नसून ती शासनाची जबाबदारी आहे. जर एमपीएससीचा कारभार सुधारणार नसेल तर तो किती दिवसात सुधारणार आणि किती दिवसात जागा भरणार याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिले पाहिजे. या जागा किती दिवसात भरणार ? एमपीएससीकडून जागा भरेपर्यंत कंत्राटी पध्दतीवर किंवा सहा महिन्याची, नऊ महिन्यांची ऑर्डर देऊन एल.डी.ओ.चे पोस्टींग देऊ शकतो. एखाद्या खेड्यामधील एल.डी.ओ.च्या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार दुसऱ्या खेड्यातील एल.डी.ओ.ला देऊन त्यांच्याकडून रिमोट पध्दतीने किंवा कशा पध्दतीने ट्रिटमेंट दिली जाते ? मूळ प्रश्नाला बगल देतात त्यामुळे याकडे दुर्लक्ष होते. शासन या जागा कंत्राटी पध्दतीने ताबडतोब भरणार काय ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, जैसा कि मैंने पहले बताया है कि पिछले 6 महीने में एल.डी.ओ. की 297 पोस्ट भरी हैं. जहां पर जगह खाली होगी, वहां पर उनको पोस्टिंग दी जाएगी. एम.पी.एस.सी. एक सेपरेट ऑर्गनारईजेशन है, फिर भी हम इस बारे में एम.पी.एस.सी से बात करेंगे और एक्जाम लेकर जितनी जल्दी हो सकता है, उतनी जल्दी इन पदों को भरने की कोशिश करेंगे.

----

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**"भाम" या नियोजित धरणाच्या बांधकामाला (ता.इगतपुरी, जि.नाशिक) विरोध दर्शविण्याकरीता धरण कृती समितीच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी आयोजित केलेला मेळावा**

**(१०) * ४०८३८ श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. जगदीश गुप्ता , श्री. श्रीकांत जोशी , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दि.१६ जानेवारी,२००८ वा त्या सुमारास "भाम" या नियोजित धरणाच्या बांधकामाला (ता. इगतपूरी, जि. नाशिक) विरोध दर्शविण्याकरीता धरणकृती समितीच्या नेतृत्त्वाखाली, "भरवस" या गावी आदिवासींनी एक भव्य मेळाव्याचे आयोजन इगतपूरी पंचायत समिती सदस्यांच्या नेतृत्वाखाली केले होते, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे देण्यांत आलेल्या निवेदनावर काय निर्णय घेण्यांत आला वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दिलेल्या निवेदनाच्या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने निवेदनातील प्रत्येक मुद्दयांच्या संदर्भात कार्यवाही करण्याचे कळविले आहे व त्याअनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रतापराव सोनवणे : सभापती महोदय, नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यातील भाम या नियोजित धरणासंबंधीचा हा प्रश्न आहे. तालुक्यात अनेक धरणे असताना तालुक्यातील भूमिपुत्र असलेल्या आदिवासी जनतेला विश्वासात न घेता सदर धरणाच्या कामाला सुरुवात केली आहे हे असंतोषाचे प्रमुख कारण आहे. त्यामुळे धरणग्रस्त कृति समिती स्थापन होऊन तेथे संघर्ष सुरु झालेला आहे. यासंबंधी आंदोलनकर्त्यांनी दिनांक १६.१.२००८ रोजी भरवस येथे सभा घेऊन जिल्हाधिका-यांना निवेदन दिले आहे. या निवेदनातील प्रमुख मागण्या काय आहेत हा पहिला प्रश्न आहे. या आंदोलनकर्त्यांनी प्रत्येक मुद्यांसंबंधी जिल्हाधिका-यांना निवेदन दिले आहे त्याच्यातील मुद्दे कोणते आहेत ? या मुद्यांसंबंधी जिल्हाधिका-यांनी कोणते उपाय सुचविले आहेत ? त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ते मंत्रिमहोदय जाहीर करतील काय ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

२...

ता.प्र.क्र.40838.....

डॉ.सुनील देशमुख : भाम धरणाच्या भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर असताना दिनांक १६.१.२००८ रोजी नियोजित धरणाच्या भूसंपादनाला विरोध करण्यासाठी मोर्चा काढण्यात आला होता ही गोष्ट खरी आहे. संबंधित धरणग्रस्तांनी जिल्हाधिका-यांना निवेदन दिले आहे. त्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिका-यांनी २८ तारखेला एक बैठक घेतली होती. या धरणग्रस्तांनी ११ मागण्या केल्या होत्या. त्यांची पहिली मागणी अशी होती की, भाम धरणाच्या वरील बुडित क्षेत्राव्यतिरिक्त जमिनीत वहिवाटीस जाणे शक्य होणार नसल्याने अशा जमिनी प्राधान्याने संपादित करणे व त्यावर त्वरीत कार्यवाही करणे. दुसरी मागणी अशी आहे की, बुडित क्षेत्रात जमिनी गेलेल्या प्रत्येक घरातील एका व्यक्तीला शासकीय सेवेत सामावून घेणे...

**सभापती** : मंत्रिमहोदयांनी सर्व मागण्यांची माहिती पटलावर ठेवावी.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मागण्यांची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, निळवंडे पॅटर्नची खूप मोठी चर्चा झाली होती. बुडित होणा-या संपूर्ण क्षेत्राचे पुनर्वसन अगोदर करुन नंतरच धरणाचे काम केले पाहिजे, अशाप्रकारचा महाराष्ट्र टाईम्समधील एक सुंदर लेख परवा माझ्या वाचण्यात आला. निळवंडे पॅटर्न समजून सिंचन खात्याने त्याचे अनुकरण करावे असे त्यात लिहिले होते. पाटबंधारे खाते हे कंत्राटदारांसाठी काम करीत आहे की सर्वसामान्य जनतेचे काम करीत आहे हा प्रश्न निर्माण झाला आहे. तेथील विस्थापितांचे सर्व प्रश्न मार्गी लावून नंतर काम करण्यास सुरुवात करणार की त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करुन कामाला सुरुवात करणार हा सरळ प्रश्न माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी विचारला होता. त्याबाबतची माहिती द्यावी

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आधी पुनर्वसन मग धरण हेच शासनाचे धोरण आहे. शासन त्याच धोरणाप्रमाणे सर्व धरणांचे काम करीत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदय, इतकी बेमालूमपणे सभागृहात उत्तरे देत आहेत की,त्यामुळे विदर्भाचे नाव बदनाम होईल. आपण कमीत कमी माननीय मंत्रिमहोदय श्री.अजितदादा यांच्यासमोर तरी असे बोलू नये. त्यांचे ठीक आहे. आधी पुनर्वसन

३....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40838.....                                                  श्री.नितीन  गडकरी......

नंतर धरण हे शासनाचे धोरण आहे असे आपण म्हणत असाल तर त्याप्रमाणे एका तरी धरणाच्या बाबतीत शासनाने धोरण राबविले आहे काय ते सांगावे. आपण काहीही सभागृहामध्ये बोलत आहात. माझी मंत्रिमहोदयांना अशी विनंती आहे.  आपण प्रथम हे पुनर्वसन खाते बरखास्त करण्याचे काम करावे. माननीय मंत्रिमहोदय श्री.पतंगराव कदम यांच्या प्रेमापोटी मी बोलत नाही.  माननीय मंत्रिमहोदय श्री.अजित पवार यांना सांगू इच्छितो की, माझ्या मध्यस्थीद्वारे दोन प्रकल्पांच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत आहे.  एक म्हणजे भद्रावतीला कोळसा खाणीच्या प्रकल्पग्रस्तांचे केले आहे.  ७ वर्षानंतर पाटबंधारे विभागाकडून परत केली जाईल.  त्यांनी किंमतही दिलेली आहे, तेथे इंजिनिअरिंग कॉलेज इत्यादी सुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत. दुसरे म्हणजे मिहान प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन होत आहे. या प्रश्नासंबंधी शासनाने दोन पॅकेज तयार करावेत.  इरिगेशन विभागामध्येच एक्झिक्यूटीव्ह इंजिनिअर (पुनर्वसन) अशी व्यवस्था करुन सर्व अधिकार शासनाकडे घेऊन सहा महिन्यात पुनर्वसन करावे.  परंतु एक एक एजन्सी नेमू नये.  शासनाच्या अधिका-यांना सुध्दा वेड लागण्याची वेळ आलेली आहे. नागपूर जिल्हयात गोसीखूर्द प्रकल्पग्रस्तांना घरे वाटावयाची होती.  जिल्हा परिषदेमध्ये श्री.मुंडे नावाचे सी.इ.ओ.आले आहेत.  ते म्हणतात की घरे वाटता येत नाहीत.

नंतर  श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 40838..... (श्री. नितीन गडकरी...)

शेवटी त्यांनी ती परवा वाटली. इतर विभाग कामामध्ये मदत न करता उलट त्यांच्यामुळे कामाला विलंब होतो. म्हणून प्रत्येक धरणग्रस्तांचे प्रथम योग्य रीतीने पुनर्वसन करा आणि पुनर्वसनाचे काम संपल्यानंतर धरणाचे काम सुरु करा. तसेच पुनर्वसन करताना कोणत्याही शेतक-यावर अन्याय होणार नाही अशा प्रकारचे नि:संदिग्ध्द उत्तर माननीय मंत्री महोदय देतील काय ?

डॉ. सुनील देशमुख : भूसंपादनाची प्रक्रिया ही महसूल विभागाकडून केली जाते. सेक्शन 4 ते सेक्शन 13 पर्यन्तची प्रक्रिया महसूल विभागाकडून केली जाते. त्यानंतर पेरेण्ट डिपार्टमेण्टकडून पैशाचा भरणा केला जातो आणि त्यानंतर पुढची कार्यवाही सुरु होते. काही प्रकल्पांमध्ये सरळ खरेदी पध्दतीने शेतक-यांच्या जमिनी घेतल्या जात आहेत आणि त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

श्री. नितीन गडकरी : जमिनीचे राहू द्या. ज्या गावाचे पुनर्वसन करावयाचे आहे त्या गावाला वीज, पाणी, रस्ते या मूलभूत गरजा पुरविण्याची आवश्यकता आहे. मिहानच्या फाईलवर 9-9 महिने सह्या होत नाहीत. माझे म्हणणे असे आहे की, पुनर्वसन खात्याची आवश्यकता नाही. भूसंपादन महसूल विभागाकडून होते. तेव्हा पुनर्वसनाची जबाबदारी एकाच एजन्सीकडे सोपवून धरणग्रस्तांचे तातडीने पुनर्वासन करण्याची गरज आहे. ज्या प्रमाणे मिहान कंपनीवर पुनर्वसनाची जबाबदारी टाकली तशा प्रकारे पुनर्वसनाची जबाबदारी पुनर्वसन विभागावर टाकून निर्धारित कालावधीमध्ये पुनर्वसन करुनच मग धरणाचे काम सुरु केले जाईल अशा प्रकारचे नि:संदिग्ध आश्वासन मंत्री महोदय देतील काय ?

श्री. अजित पवार : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नासंबंधी मिहान आणि भद्रावती कोल माईन या प्रकल्पांच्या संदर्भात प्रस्ताव दिलेला आहे. मी त्याबाबतीत सभागृहाला एवढेच सांगेन की, त्याबाबतची संपूर्ण माहिती घेऊन राज्यात जी नवीन धरणे होणार आहेत ती त्या धर्तीवर केली तर पुनर्वसनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडवता येत असेल तर तशा प्रकारचा विचार जरुर केला जाईल आणि तशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला जाईल.

-----

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 38002**

**सभापती** : ता.प्र.क्र. 38002 पुकारल्यानंतर त्या प्रश्नाशी संबंधित विभागाचे मंत्री आणि राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे हा प्रश्न मी राखून ठेवीत आहे. मी हेही सांगू इच्छितो की, ही पध्दत बरोबर नाही. कार्यक्रमपत्रिकेवर प्रश्न आल्यानंतर त्या प्रश्नाच्या वेळी संबंधित मंत्री किंवा राज्यमंत्री यांनी सभागृहामध्ये उपस्थित राहाणे अत्यंत महत्वाचे आहे. सहकार विभागाचे मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी या गोष्टीची नोंद घ्यावी.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी नोंद घेतलेली आहे.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील दगडखाणीत काम करणाऱ्या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित असल्याबाबत**

**(१२) * ३८२०३ श्री. संजय दत्त , श्री. शरद रणपिसे , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दगडखाणीत काम करणाऱ्या कामगारांची सुमारे ८ लाख मुले शिक्षणापासून वंचित असून त्यांना शासनाच्या विविध योजनाचाही लाभ मिळत नसल्याचे माहे डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दगडखाणीत काम करणाऱ्या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत तसेच त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वसंत पुरके :** (1) नाही.

(2) व (3) दगडखाण कामगारांची शाळाबाह्य मुलांची संख्या सर्वेक्षणानुसार 2800 एवढी आढळून आली आहे. पुणे 9124, सांगली 634, सातारा 372, कोल्हापूर 526 आणि अहमदनगर 354 अशी जिल्हानिहाय शाळाबाह्य मुलांची संख्या सन 2007-08 मध्ये आढळून आली आहे. या मुलांसाठी पाषाण शाळा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

श्री. संजय दत्त : हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर मोघम दिलेले आहे. उपेक्षित वर्गाची काळजी घेण्याची सरकारची जबाबदारी आहे. माझा प्रश्न असा आहे की, या पाषाण शाळा कोणकोणत्या ठिकाणी सुरु करण्यात आल्या आहेत ? पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि अहमदनगर या व्यतिरिक्त अन्य जिल्ह्यातील शाळाबाह्य मुलांची संख्या शोधण्यासाठी सर्व्हे करण्यात आला होता काय ? असल्यास केव्हा आणि त्या सर्व्हेमधून काय निष्पन्न झाले ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MHM/ प्रथम श्री. शिगम 12:45

ता.प्र.क्र.38203....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, दगडखाणीत काम करणा-या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून पाषाषण शाळा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. तसेच राज्यातील गरीब कामगार घटकातील मुले देखील शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून महात्मा फुले हमी शाळा, राजीव गांधी वस्तीशाळा, साखर शाळा, भोंगा शाळा अशा विविध प्रकारच्या शाळा शासनाने सुरु केलेल्या आहेत. पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि अहमदनगर या जिल्हया व्यतिरिक्त अन्य जिल्हयात देखील शाळा बाहय मुले आहेत. म्हणून गेल्या दोन वर्षापूर्वी शाळा बाहय मुलांच्या संदर्भात तीन दिवसाचा झटपट सर्वेक्षणाचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्या सर्वेक्षणात 4 लाख 28 हजार शाळा बाहय मुले आढळून आली होती. त्यातील 84 टक्के मुलांना या विविध शाळांमध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे. उर्वरित शाळा बाहय मुलांना देखील या विविध शाळांमध्ये प्रवेश मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, दगडखाण काम करणा-या कामगारांच्या अडचणी, तसेच त्यांच्या मुलांचे जे प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात "संतुलन" नावाची संस्था कार्य करीत आहे. दगडखाण कामगारांच्या बालकांचे जे प्रश्न आहेत त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्रात अनेक गट, अनेक संघटना कार्यरत आहेत. या गटांना आणि संघटनांना विश्वासात घेऊन त्यांचे मत या सर्वेक्षणाच्या वेळी विचारात घेण्यात आले आहे काय ? या प्रश्नाच्या संदर्भात एखादा टास्क फोर्स तयार करुन जेथे जेथे आवश्यकता आहे त्या सर्व ठिकाणी यासंबंधीची अंमलबजावणी करण्यात येईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, दगडखाणीत काम करणाऱ्या कामगारांच्या मुलांसाठी काम करणारी " संतुलन " संघटना आहे. या संघटने समवेत देखील पुणे येथे आम्ही चर्चा केली होती. त्यांचे म्हणणे असे होते की, आम्हाला विश्वासात घ्यावे आणि आमचे देखील शिक्षक आतापर्यंत कार्यरत आहेत त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवावी. परंतु याबाबतीत अजून निर्णय झालेला नाही. या विषयाच्या संदर्भात एक बैठक बोलाविण्यात येईल व त्या बैठकीस सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना निश्चितपणे निमंत्रीत करण्यात येईल.

2...

ता.प्र.क्र.38203....

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, पहिल्या लेखी प्रश्नास "नाही" असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. परंतु दुस-या लेखी प्रश्नाच्या उत्तरात मात्र पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर आणि अहमदनगर या जिल्हयातील शाळा बाहय मुलांची संख्या दिली आहे. वास्तविक पाहता "संतुलन" या संस्थेनेच यासंबंधीचे सर्वेक्षण केलेले आहे. पाषाण शाळांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत अनुदान मिळावे अशा प्रकारची मागणी केंद्र शासनाकडे केली होती आणि ती मागणी केंद्र शासनाने मंजूर देखील केली आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात शेवटी असे म्हटले आहे की, " या मुलांसाठी पाषाण शाळा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत." सदरहू केंद्रे कोणी सुरु केली आहेत व ती कोणकोणत्या ठिकाणी सुरु केली आहेत व एकूण किती केंद्रे सुरु केली आहेत ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, कामगारांची 8 लाख शाळा बाहय मुले आहेत असा "संतुलन" संस्थेने अहवाल दिलेला आहे, तो अहवाल शासनास मान्य नाही. शाळा बाहय मुले आहेत परंतु ती एवढया मोठया संख्येने नाहीत असे मी नम्रपणे सांगू इच्छितो. या परिसरात 2800 शाळाबाहय मुले आढळून आली आहेत. राज्यात वेगवेगळया कारणांमुळे शाळा बाहय मुले वेगळी आहेत. पुणे येथे 910 शाळा बाहय मुले आढळून आली आहेत. या शाळा बाहय मुलांसाठी पुणे परिसरात 39 केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, दगडखाणीत काम करणा-या कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत तसेच त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे वा करण्यात आली आहे असा प्रश्न विचारण्यात आला होता, परंतु त्या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले नाही. माननीय मंत्री महोदयांनी प्रत्येक जिल्हयात शाळा बाहय मुलांची संख्या किती आहे यासंबंधीची आकडेवारी दिली आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मघाशी सांगितले की, यासंदर्भात "संतुलन" संस्था चांगल्या प्रकारे काम करीत आहे. म्हणून त्या संस्थेतील शिक्षकांना या कामात समाविष्ट करुन घेण्यात यावे. तर या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, "संतुलन" या संस्थेतील शिक्षकांना या कामात समाविष्ट करुन घेतले जाईल काय ?

3...



ABG/ KGS/ MHM/ प्रथम श्री. शिगम 12:45

ता.प्र.क्र.38203....

प्रा.वसंत पुरके : साखर कारखान्यातील कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा सुरु केल्या आहेत. भोंगा शाळा आहेत, वस्तीशाळा आहेत, महात्मा फुले हमी शाळा आहेत, अशा विविध शाळा विविध परिसरातील कामगारांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून सुरु केलेल्या आहेत. या ठिकाणी सांगितले गेले आहे की, "संतुलन" या संस्थेस या कामी विश्वासात घ्यावे. यासंदर्भात मी मघाशीच उत्तर दिले आहे की, "संतुलन" या संस्थेशी निश्चितपणे चर्चा करुन, त्यांच्या काय समस्या आहेत त्या जाणून घेऊ आणि शक्य असेल तर त्यांना सहभागी करुन घेण्याचा प्रयत्न करु.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी कष्टकरी कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. दगडखाणीत काम करणा-या कामगारांच्या मुलांसाठी पाषाण शाळा सुरु केल्या आहेत असे शासनाने उत्तरात म्हटले आहे. पाषाण शाळा केंद्रे विविध ठिकाणी सुरु आहेत, या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलांना शालेय पोषण आहार आणि मोफत पाठ्यपुस्तक योजनेचा लाभ देण्यात येतो आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, कोणत्याही घटकातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये असा सर्व शिक्षण अभियानाचा मुख्य हेतू आहे. पाषाण शाळेत शिकत असलेल्या मुलांना देखील या योजनेचा लाभ निश्चितपणे देण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ 12:50

ता.प्र.क्र. 38203 पुढे सुरु .....

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दगडखाणी कामगारांच्या मुलांसाठी शाळा सुरु करताना या खाणींना जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आहे किंवा नाही हे पाहिले जाते काय ? याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शासनाचे मूळ धोरण हे आहे की कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये. शाळा सुरु करताना त्या गावामध्ये ग्रामशिक्षण समिती आहे तसेच ग्रामपंचायत आहे. यांना विश्वासात घेऊनच शाळा सुरु करण्यात येतात.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दगडखाणी सुरु करताना जिल्हाधिकाऱ्यांकडून परवाने घ्यावे लागतात. अशा त-हेची परवानगी घेतलेली आहे किंवा नाही हे पाहूनच त्याठिकाणी दगडखाणी कामगारांच्या मुलांसाठी शाळा उघडली जाईल काय ? नाहीतर शाळा सुरु करुन मग दगडखाणी चालू ठेवणार काय ? याबाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, भविष्यामध्ये ही बाब तपासून शाळा सुरु करण्यास परवानगी दिली जाईल.

-------

........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अनुशेष ग्रस्त जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत**

**(१३) * ३८०७१ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक २९३५६ ला दिनांक २० जुलै २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे जे अधिकार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला प्रदान करण्यात आलेले आहेत त्याचा वापर करुन या मंडळाने ३० जानेवारी.२००७ पावेतो एकूण किती मोठया, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे,

(२) अशा या प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रकल्पांमध्ये मा. पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हयांमध्ये,जिल्हावार किती मोठया, मध्यम व लहान प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे,

(३) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास प्रशासकीय मान्यतेचे अधिकार दिनांक ११.०४.२००७ रोजी प्रदान केले असल्यामुळे त्या दिनांकापूर्वी महामंडळाने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मूळ प्रश्न विचारण्यात आलेला आहे त्याच्या भाग-१ मध्ये ३० जानेवारी २००७ पावेतो असे विचारण्यात आले आहे. त्याऐवजी ३० जानेवारी २००८ पर्यंतची स्थिती विचारणे आवश्यक होते. ही तांत्रिक चूक झालेली आहे त्याबद्दल मी क्षमा मागतो.

सभापती महोदय, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला जे अधिकार देण्यात आलेले आहेत ते कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या धर्तीवर देण्यात आलेले आहेत. याचे कारण असे की, प्रकल्पांची कामे लवकर म्हणजे स्पीडने व्हावीत यासाठी अधिकार दिलेले आहेत. माननीय पाटबंधारे मंत्री यांनी नागपूर अधिवेशनात यासंदर्भात एक बैठक घेतली होती. त्याबैठकीमध्ये त्यांनी असे स्पष्ट आदेश दिले होते की, यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी. अनेकदा आदेश दिले जातात परंतु त्याची नोंद होत नाही. पण पाटबंधारे मंत्र्यांनी या बैठकीमध्ये जे आदेश दिले त्याची कार्यवृत्तामध्ये नोंद आहे. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत विदर्भातील सहा जिल्हे येतात. बहुअनुशेषग्रस्त जे जिल्हे आहेत त्यात अमरावतील विभागातील पाच जिल्हे येतात. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार १.४.२००७ रोजीचा सिंचनाचा जो अनुशेष शिल्लक आहे त्यातील ७७ टक्के अनुशेष या विभागात आहे.

......३





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ३८०७१ पुढे सुरु .....

प्रा.बी.टी.देशमुख ....

विदर्भाचा जो काही अनुशेष आहे त्यातील ९९.२२ टक्के अनुशेष या पाच जिल्हयात आहे. आमची अशी अपेक्षा आहे की, जुन्या गतीने काम न चालता विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला अधिकार मिळाल्यामुळे तत्परतेने काम झाले पाहिजे. या पाच जिल्हयामध्ये जे ३९ प्रकल्प आहेत त्यांची सद्यस्थिती काय आहे ? मूळ प्रश्नाला जे उत्तर दिलेले आहे ते तांत्रिकदृष्टया बरोबर आहे. ते समाधानकारक नाही हा भाग वेगळा आहे. या पाच जिल्हयातील मोठया,मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, शासनाने ११.४.२००७ च्या आदेशान्वये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात विदर्भातील सर्व जिल्हयातील मोठे,मध्यम आणि लहान पाटबंधारे योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार महामंडळाला दिले. हा निर्णय झाल्यावर जवळजवळ या निर्णयाच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेसाठी एकंदर १६ प्रस्ताव महामंडळाच्या मान्यतेसाठी प्राप्त झाले. १५ प्रस्ताव मुख्य अभियंता,जलसंधारण विभाग,नागपूर यांच्याकडून प्राप्त झाले. ३१ प्रस्तावांपैकी जवळजवळ १० प्रस्तावांना या ६-८ महिन्यांमध्ये प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या १० प्रस्तावांमध्ये ९ प्रकल्प अमरावती जिल्हयातील आहेत आणि एक प्रकल्प नागपूर विभागातील आहे. ३१ पैकी १० प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रशासकीय मान्यता डीपीआर झाल्यानंतर दिली जाते. बहुअनुशेष असलेल्या ५ जिल्हयांमध्ये १३ प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे ? या १३ प्रकल्पांच्या बाबतीत सविस्तर प्रकल्प अहवाल हे प्रक्रियेत आहेत अशी परिस्थिती आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, प्रक्रियेत असलेल्या १३ प्रकल्पांची सद्यस्थिती काय आहे ?

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रशासकीय मान्यतेसाठी वेगवेगळया स्तरावर असलेल्या 13 प्रकल्पांची नावे दिली तर त्यासंबंधीची सद्यस्थिती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, तापी डायव्हर्शन, खैरी चंद्रभागा, राजना/आसेगाव, कौंडण्यपूर उ.सिं.योजना, पिंपरी बॅरेज, सिंदी बु., बोर नदी, सोनगाव, मलकापूर, जरुड, बागलिंगा, टाकळी कलान, भगाडी हे 13 प्रकल्प सविस्तर डीपीआरच्या प्रक्रियेत आहेत. पिंगळादेवी, गडगा डायव्हर्शन, निम्न साखली, सोनदाडी, गायमुख, अंबाडी, दावला, भूगाव, धानोरा, उर्ध्व शहानूर, राजूरा, धाकरमल व वाघाडी हे 13 प्रकल्प प्राथमिक अवस्थेत आहेत. पीडी बॅरेज हा प्रकल्प तयार झाला आहे. ज्या प्रकल्पांबाबत डीपीआर होणे आवश्यक आहे त्या प्रकल्पांबाबत टाईम बाऊंड सांगता येणार नाही. परंतु ज्या प्रकल्पांना फक्त प्रशासकीय मान्यता द्यायची शिल्लक आहे त्याबाबत निश्चितपणे वेळापत्रक आखून देऊन आदेश दिले जावेत. माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले, अधिकार दिले आहेत. ते अधिकार वापरावेत. ज्याप्रमाणे एखाद्या सिनेमामध्ये गेस्ट आर्टिस्ट पाठवितात तसे गेस्ट इंजिनिअर्स पाठवून हे काम तत्परतेने करावे. या 5 जिल्हयांमध्ये तत्परतेची आवश्यकता आहे. 13 अधिक 13 व पीडी बॅरेज या प्रकल्पांचे काम 2-3 महिन्यांच्या कालमर्यादेत पूर्ण करण्याविषयी आदेश दिले जातील काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, विदर्भातील सर्वच प्रकल्पांबाबत वेळोवेळी बैठका घेऊन टाईम बाऊंड कार्यक्रम आखून दिलेला आहे. विविध स्तरावर असलेल्या प्रकल्पांना गती मिळावी, तातडीने प्रशासकीय मान्यता मिळावी यासाठीच टाईम बाऊंड कार्यक्रम आखलेला आहे. तो टाईम बाऊंड कार्यक्रम आणि 13 प्रकल्पांची परिस्थिती याची माहिती उद्या सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : पीडी बॅरेज या प्रकल्पाचा निश्चितपणे त्या माहितीमध्ये समावेश केला जाईल का?

डॉ.सुनील देशमुख : होय.

----------





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील दुष्काळी तालुक्यांसाठी दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याबाबत**

(१४) * ३९७२१ **श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी तालुक्यासाठी दुष्काळी महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेवूनही अद्याप दुष्काळी महामंडळ स्थापन करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी तालुक्याच्या निवडीसाठी कोणते निकष लावण्यात आले आहेत आणि या निकषात कोणते तालुके बसत आहेत,

(३) नसल्यास, दुष्काळी महामंडळ स्थापन करण्यास होणाऱ्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

**डॉ.सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) राज्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील सिंचन विकास क्षेत्राच्या अनुशेष निश्चितीसाठी श्री.व्ही.रंगनाथन माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून या समितीकडे दुष्काळी तालुके निश्चित करण्याचे काम सोपविण्यात आलेले आहे. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दुष्काळी तालुके निश्चित करण्यात येणार आहेत.

(३) रंगनाथन समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवालाचे निष्कर्ष तपासून दुष्काळी तालुक्यांसाठी महामंडळ स्थापनेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याचे प्रस्तावित आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रात जे कायमदुष्काळी तालुके आहेत, त्या तालुक्यांमध्ये असलेल्या ताकारी, म्हैसाळ व टेंभू या योजनांचे 90 टक्के काम पूर्ण झाले आहे. या योजना दुष्काळी तालुक्यांना जीवनदायी ठरणाऱ्या योजना आहेत. माननीय राज्यपालांच्या निदेशामुळे या तालुक्यांवर अन्याय झाला आहे. मध्यंतरीच्या काळात दुष्काळी महामंडळाचे गाजर दाखविण्यात आले. मागील अधिवेशनात दुष्काळी तालुक्यांसाठी महामंडळ स्थापन करुन विकास केला पाहिजे अशी सर्वपक्षीय आमदारांनी मागणी केली होती. माननीय राष्ट्रपतींना देखील साकडे घालण्यात आले. परंतु शासनाकडून चालढकल केली जात आहे. आता उत्तरामध्ये म्हटले आहे की, व्ही.रंगनाथन यांची समिती स्थापन केली असून त्या समितीचा अहवाल आल्यानंतर दुष्काळी तालुके निश्चित केले जातील. म्हणजे अजूनही दुष्काळी तालुके निश्चित करण्याचे काम पूर्ण झ ालेले नाही. हे काम पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे? दुष्काळी तालुक्यांसाठी महामंडळ निर्माण करण्याचा निर्णय शासन घेणार आहे का? असल्यास किती दिवसात निर्णय घेतला जाईल?

..3.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कोणते तालुके दुष्काळग्रस्त आहेत व कोणते तालुके दुष्काळग्रस्त नाहीत हे शोधण्यासाठी रंगनाथन समितीची स्थापना केलेली नाही. दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील सिंचनाची परिगणती करण्यासाठी ही समिती स्थापन केलेली आहे. दुष्काळग्रस्त तालुके आहेत की नाही हे शोधण्यासाठी रंगनाथन समिती नेमण्यात आलेली नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले तोंडी उत्तर आणि लेखी उत्तर यामध्ये तफावत आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, दुष्काळग्रस्त तालुके निश्चित करण्यासाठी रंगनाथन समिती नेमलेली नाही. परंतु लेखी उत्तरात स्पष्ट म्हटले आहे की, 'या समितीकडे दुष्काळी तालुके निश्चित करण्याचे काम सोपविलेले आहे.' मंत्रीमहोदयांना उत्तरामध्ये सुधारणा करावयाची आहे का? माझा पुढील प्रश्न असा आहे की, रंगनाथन समिती केव्हा स्थापन केली? या समितीला कालमर्यादा घालून दिली आहे का? असल्यास कालमर्यादेत काम पूर्ण केले की नाही?

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. भोगले 13:00

ता. प्र. क्र. 39721.........

डॉ. सुनील देशमुख : राज्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील सिंचन विकास क्षेत्राच्या निश्चितीसाठी रंगनाथन् समिती गठित करण्यात आली आहे. सन 1960 पासून आतापर्यंत 12 समित्या अलग अलग दुष्काळी तालुक्यांसाठी स्थापन केल्या होत्या व त्यात शेवटी 48 तालुके होते परंतु आता हे 195 तालुके झालेले आहेत. त्या तालुक्यातील अनुशेष निश्चित करण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे. नव्याने दुष्काळी तालुके त्यात घालण्यासाठी व वगळण्यासाठी ही समिती बसविलेली नाही तर दुष्काळी तालुक्यासंबंधी शासनाने जो निर्णय घेतलेला आहे त्यानुसार अनुशेषाची परिगणती करण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे.

<u>(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)</u>

श्री. अरविंद सावंत : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी मंत्री महोदय वेगळेच उत्तर देत आहेत. त्यांनी विचारले की, या समित्या किती वेळा स्थापन केल्या, त्यांचा कालावधी किती आणि या समित्यांचे अहवाल किती तारखेपर्यंत येणे अपेक्षित होते ?

डॉ. सुनील देशमुख : महोदय, या समितीला तीन महिन्यांचा कार्यकाल दिला होता पण या समितीने अजून कार्यकाल वाढवून मागितलेला आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

**उपसभापती** : आपण आता पुढे गेलो आहोत.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**उपसभापती** : आता आपण पुढे गेलो आहोत, त्यामुळे मागे जाता येणार नाही. तरी देखील सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना थोडक्यात प्रश्न विचारण्यासाठी मी संधी देतो.

श्री. अरविंद सावंत : महोदय, आपण मागे जाऊ नका, केवळ आमचे ऐकून घ्यावे अशी मी विनंती करतो. राज्यातील जे दुष्काळी तालुके आहेत त्यांच्या संदर्भात अगदी पीन पॉईंट प्रश्न होता. तो म्हणजे रंगनाथन् समिती किती वेळा स्थापन करण्यात आली ? त्या समितीचा कालावधी किती होता ? तसेच या समितीचा अहवाल कधी येईल याचे अपेक्षित उत्तर देणे आवश्यक होते. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, या समितीची कालमर्यादा वाढविली. पण त्या समितीची कालमर्यादा कधी संपली व किती काळापर्यंत ही मुदत वाढविली आहे ?

**उपसभापती** : शासनाने ही माहिती पटलावर ठेवावी अशा सूचना मी देत आहे.

25-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माननीय राज्यपालांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासंदर्भात दिलेल्या निदेशांच्या अनुषंगाने सन 2008-09 चे वार्षिक नियोजन व सन 2007-08 मधील वितरित तरतूद व जानेवारी, 2008 अखेर खर्चाचा जिल्हानिहाय तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक नियोजन तसेच खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------

श्री. बाबा सिध्दीकी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माल वाहतूक कामगार मंडळ, मुंबईचा सन 2005-06 चा पस्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---------------

यानंतर श्री. जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्रीमती उषा दराडे (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने इतर मागासवर्ग कल्याण समितीचा सहावा अहवाल सभागृहासमोर सादर करते.

सभापती महोदय, यासंदर्भात मी दोन तीन सूचना करणार आहे. मुंबई विद्यापीठातील इतर मागासवर्गाच्या वर्ग-1 ते वर्ग-4 मधील रिक्त पदांचा अनुशेष तातडीने भरण्याची गरज आहे. मुंबई विद्यापीठाकडून बिंदूनामावली नोंदवहया अद्ययावत केलेल्या नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे मुंबई विद्यापीठाची बिंदू नामावली अद्ययावत करण्याबाबत समितीने शिफारस केलेली आहे. मुंबई विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांची जात पडताळणी लवकरात लवकर करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठामध्ये इतर मागासवर्गाचा अनुशेष नाही ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. सदर विद्यापीठाने भविष्यात हीच स्थिती ठेवून मागास व दुर्लक्षित प्रवर्गास न्याय देण्याची त्यांची ही भूमिका अशीच पुढे चालू ठेवावी. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची कामगिरी ही कौतुकास्पद आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

**उपसभापती** : इतर मागासवर्ग कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.**

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "दिनांक 24 फेब्रुवारी, 2008 रोजी श्री. गणेश एस.एन.कोटींग या वाळूज औरंगाबाद येथील कारखान्यात कपंनीचे मालक व कामगार यांच्यामध्ये भांडणे होऊन कामगारांना मारहाण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, यांनी "राज्यात 48 वन विभागापैकी 19 वन विभागांना चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन देणे आणि 29 विभागांमध्ये "क" वर्ग जंगल असून सुध्दा मेंढयाकरिता चराईसाठी क्षेत्र उपलब्ध करुन न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे यांनी नियम 93 यांनी "राष्ट्रीय सुरक्षा दलातील (एन.एफ.सी.) कर्मचा-यांच्या वेतन दुरुस्तीच्या प्रस्तावाबाबत मा. शालेय शिक्षण मंत्री यांनी सभागृहात आश्वासन देऊनही शासनाने त्यावर निर्णय न घेतल्याने सदर कर्मचा-यांच्या मनात निर्माण झालेला असंतोष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, यांनी "मुंबईत सुमारे 96 हजार भटके कुत्रे असल्याचा पालिका प्रशासनाने केलेला दावा, परंतु प्रत्यक्षात 3 लाख भटके कुत्रे लोकांवर हल्ले करीत असून कुत्रे चावलेल्या व्यक्तींना महापालिकेच्या दवाखान्यात रॅबिज लस मिळत नसल्याने ती विकत घ्यावी लागत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

......3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती .....**

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "कु. दिक्षा दिनेश ब्रेधरे, रा. गोठे,ता. मंडणगढ, जि. रत्नागिरी या 3 वर्षीय मुलीला पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने तिला रॅबिज प्रतिबंधक लस दिल्यानंतर तिचा मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, संजय केळकर, यांनी "पनवेल शइहरात नगरपालिकेच्या इमारतीत सुरु असलेल्या ग्रामीण रुग्णालयाची इमारत मोडकळीस आल्यामुळे तेथील डॉक्टर आणि कर्मचा-यांच्या जिवितास निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, यांनी "राज्य शासनाने मुंबई विद्यापीठाला 275 एकराचा भूखंड देणे, त्यातील काही जमीन हयात हॉटेलला देणे, एम.एम.आर.डी.ए. ने निर्माण केलेला रस्ताही विद्यापीठाच्या जागेतून जाणे, याच जागेत अनाधिकृत झोपडपट्टी उभी असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, रामनाथ मोते, यांनी "10 वी, 12 वीच्या विद्यार्थ्यांकडून रोख रक्कम घेऊन उत्तरपत्रिका दुरुस्त करणारी टोळी गोंदिया जिल्हयात नुकतीच उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त परिचर पदासाठी प्राप्त झालेले 3320 डिमांड ड्राफ्ट् सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सिंधुदुर्ग नगर येथे जमा करण्यात येणे, सदर डिमांड ड्राफ्ट् मुदतीपूर्व जमा करण्यात येऊनही बँकेने मुदत संपल्याचे कारण सांगून उमेदवारांना परत पाठविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "मुंबईतील आय.सी.एस.ई. आणि सीबीएसई या दिल्ली बोर्डाच्या शाळांच्या व्यवस्थापनाने केलेली बेसुमार फी वाढ, या शाळांचे नियंत्रण राज्य शासनाच्या अखत्यारित असूनही शासनाचे नियंत्रण या शाळा जुमानीत नसणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-----------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : औरंगाबाद जवळील अजिंठा लेण्याच्या परिसरात लागलेली भीषण आग

मु.शी : औरंगाबाद जवळील अंजिठा लेण्याच्या परिसरात लागलेल्या भीषण आगी बाबत डॉ. नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत यांनी " औरंगाबाद जवळील अंजिठा लेण्याच्या परिसरात लागलेली भीषण आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेंवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**निवेदना नंतर**</u>

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी तपशीलवार उत्तर दिलेले आहे. माझा मूळ प्रश्न असा आहे की, औरंगाबाद जवळील अजिंठा लेण्याच्या परिसरातील वनराईत ही आग लागली असून त्या ठिकाणी आग विझविण्याची काय व्यवस्था आहे ? तेथे लागलेली आग विझविण्याचा वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पुष्कळ प्रयत्न केले असून त्यामुळे काही मजूर जखमी झालेले आहेत. तेथील मजुरांनी ही आग आटोकयात आणण्याचा प्रयत्न केला आहे. अजिंठा हे एक जागतिक पातळीवरील पर्यटन स्थळ असून तेथील लेणी पाहण्यासाठी अनेक पर्यटक तेथे येत असतात. अशा ठिकाणी ही आग लागलेली आहे. ती आग लेण्यापर्यंतसुध्दा पोहोचू शकली असती. पर्यटक जेथे येतात त्या ठिकाणी ही आग लागली असून आग विझविण्यासाठी कोणतीही यंत्रणा तेथे अस्तित्वात नाही काय आणि जर ही यंत्रणा अस्त्वित नसेल तर ती केव्हा उभी करण्यात येणार आहे.?, विद्युत वाहिनीमध्ये स्पार्कींग होऊन ठिणगीमुळे तेथे आग लागली असल्याचे निवेदनात सांगण्यात आलेले आहे परंतु लोकांच्या मनात या आगीबद्दल वेगळाच संशय येतो. त्या भागात असलेल्या जंगलामध्ये काही जण शिकारीसाठी जातात त्यांच्या चुकीमुळे ही आग लागली असावी असा संशय काही लोकांना येतो तेव्हा ही आग नक्की कशामुळे लागली आहे ? त्याचबरोबर ही आग लागल्यानंतर तिचे निरीक्षण करण्यासाठी आपल्याकडे कोणती यंत्रणा आहे ? एखाद्या ठिकाणी आग लागली असेल तर ती टॉवरवरुन पाहिल्यानंतर लगेच लक्षात आली पाहिजे. नाही तर 50 -50 किलोमिटर्स अंतरापर्यंत ही आग पसरल्यानंतर आग विझविण्यासाठी धावाधाव करण्यात काही अर्थ नाही. तेव्हा या बाबतीत दक्षता घेण्याच्या दृष्टीने वन विभागाकडून कोणती पावले उचलली जाणार आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, शॉर्ट सर्कीटमुळे तेथे ही आग लागली आहे हे चौकशीमध्ये सिध्द झालेले आहे. आग लागण्याचे प्रकार वेगवेगळे असू शकतात परंतु या ठिकाणी मात्र शॉर्ट सर्कीटमुळे आग लागली आहे. त्याचबरोबर ही आग विझविण्याचा तेथील वन कर्मचाऱ्यांनी तातडीने प्रयत्न केले आहेत. या कर्मचा-यांच्या प्रयत्नामुळे तसेच जाळ रेषा केल्यामुळे आग आटोक्यात आणू शकलो. त्या ठिकाणी वनाचे क्षेत्र फार मोठे आहे. जवळजवळ 35 हेक्टर्स क्षेत्रावर ही आग लागली आहे. दुपारच्या वेळी ही आग लागली असल्यामुळे त्यावेळी उष्णता

2..



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 13.10

जास्त होती. त्यामुळे तेथे वावटळ निर्माण झाली आणि ही आग मोठयाप्रमाणावर पसरली . कर्मचाऱ्याच्या शर्तीच्या प्रयत्नामुळे आपण ही आग विझवू शकलो. या विभागाकडे कर्मचारी कमी होते त्यामुळे त्या ठिकाणी काही कर्मचारी दिलेले आहेत. त्या ठिकाणी आता पूर्ण कर्मचारी आहेत. दुसरी गोष्ट अशी की, आता आग विझविण्यासाठी वन खात्याकडे यंत्रणा उभी करणार आहोत. त्यासाठी ड्रेस, साहित्य बंब लागणार असून त्या साहित्याची व्यवस्था मोठया प्रमाणावर करणार आहोत. त्याशिवाय सॅटेलाईट सर्व्हिसकडून आगीचा शोध देखील आपण घेत आहोत. तसेच आग विझविण्याच्या संदर्भात किंवा आग लागल्यानंतर काय काय करावे यासाठी आता आपण कायम स्वरुपी हेल्प लाईन देखील सुरु करीत आहोत. त्यामुळे राज्यात कोठेही आग लागली तरी एका ठिकाणी माहिती येऊन एकत्रितपणे सगळीकडे ती माहिती दिली जाईल. ज्या प्रमाणे पोलिसांचा एक हेल्प लाईनचा नंबर असतो त्याप्रमाणे वन विभागाचा एक हेल्प लाईनचा एक ंनबर राहणार आहे. त्यामुळे आग विझविण्यासाठी मोठया प्रमाणावर मदत होणार आहे. या शिवाय वन वनवा लागू नये , आग लागू नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी दोन समित्या गठीत करण्यात आल्या आहेत आणि त्या समित्याच्या शिफारशी देखील शासनाकडे आलेल्या आहेत. त्या शिफारशी शासनाने स्वीकारलेल्या आहेत. त्या शिफारशी प्रमाणे आग नियंत्रणाची व्यवस्था आपण मोठया प्रमाणावर करीत आहोत. या व्यतिरिक्त राज्यामध्ये एकूण 45 हजार गावे आहेत. त्यापैकी 5,500 गावे वन क्षेत्राशी संबंधित आहेत आणि 12 हजार 500 गावाच्या ठिकाणी संयुक्तिक वन व्यवस्थापन समित्या स्थापन केलेल्या आहे. वनामध्ये वणवा लागू नये म्हणून या समित्यांनी प्रयत्न करावयाचा असून . या समित्यांचे सहकार्य आता आपल्याला मिळू लागले आहे. गावामध्ये वणवा लागू न देणे आणि लागला तर तो विझविणे यासाठी बक्षिसाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे आग लागू नये म्हणून लोकांचा सहभाग मोठया प्रमाणावर मिळू लागला आहे. त्यामुळे गेल्या तीन चार वर्षाच्या तुलनेने आता आग लागण्याचे प्रमाण कमी होत आहे. त्याचबरोबर आग विझविण्यासाठी ज्या काही वस्तू लागणार आहेत त्या खरेदी करण्याची तयारी शासनाने ठेवली आहे.

नंतर श्री.सुंबरे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना जशी विनंती केली तशीच मंत्र्यांना देखील करतो की, त्यांनी सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर अत्यंत समर्पक आणि थोडक्यात द्यावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा उपप्रश्न काय येणार हे ओळखून माननीय मंत्र्यांनी त्यादृष्टीने थोडेसे उत्तर दिले आहे. त्यांनी हेल्पलाईन सुरू करण्याबाबत सांगितले आहे. या निवेदनामध्ये मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, आग विझविण्याबाबत हिरव्या फांद्यांनी झोडपून आग नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. म्हणजे हे सारे जुनेच प्रकार अजूनही सुरू आहेत. असे असताना आता सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी जे उपाय करण्यात येणार आहे म्हणून सांगितले त्याची अमलबजावणी केव्हा होणार आहे ? हेल्प लाईन किती दिवसात सुरू होणार आहे आणि ती सर्व ठिकाणी, सर्व जिल्ह्यांमध्ये उपलब्ध होईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाला 'लवकरात लवकर' आणि दुसऱ्या प्रश्नाला 'होय' असे माझे उत्तर आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी यासाठी हा प्रश्न विचारला की, ही आग लागल्यानंतर आठच दिवसात दुसरी आग वणी येथे लागली होती. म्हणून मी पुन्हा एकदा विचारतो की, आपण किती दिवसात हे सुरू करणार आहात ?

श्री. बबनराव पाचपुते : शक्य तितक्या लवकर आपण हे करणार आहोत. कारण शेवटी हे करण्याशिवाय अन्य पर्याय नाही. त्यादृष्टीने आपण यंत्रणा उभी करीत आहोत.

***

..... पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नियम 93 खालील क्र.2 चे शालेय शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनाबाबत ...**

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नियम 93 खालील यापुढील निवेदन माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांचे आहे. परंतु आता ते सभागृहात उपस्थित नाहीत. तेव्हा ते येईपर्यंत आपण तसेच थांबावयाचे काय ? मी तर असे ठरविले आहे की, यासाठी सभागृह स्थगित करण्याऐवजी आपण तसेच थांबून रहावयाचे ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनाचा एवढा अपमान यापूर्वी कधीही झालेला नाही. सरकार पक्षाकडून सदनाची प्रतिष्ठा ठेवली जात नाही. मघाशी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये देखील दोन मंत्री उपस्थित नव्हते पण तरीही माननीय सभापतींनी त्यांची गंभीर दखल घेतली नाही. जणू काही त्यांनी तसे न करण्याचे ठरवूनच ठेवले आहे. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये या सदनाचा एवढा अपमान होत असताना त्याकडे शासन पक्ष लक्ष देत नाही, किंबहुना कोणीही मंत्री या सदनाला फारसे गंभीरतेने घेत नाहीत. तसे असेल तर मग हे सत्रच आपण बंद करावे.

**उपसभापती** : हे निवेदन नंतर घेण्यात येईल. आता आपण क्रमांक 3 वरील निवेदन चर्चेला घेऊ.

***

..... पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेचे परीक्षा वेळापत्रक सदोष असणे.

**मु. शी.** : मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेचे परीक्षा वेळापत्रक सदोष असणे याबाबत सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील, जैनुद्दीन जव्हेरी यांनी "मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष कला शाखेचे परीक्षा वेळापत्रक सदोष असणे " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... पी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 खाली मा.उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर (3) )

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आताच आपण सांगितले की, मंत्र्यांनी सदस्यांच्या प्रश्नाला समर्पक उत्तर दिले पाहिजे. आम्ही जेव्हा येथे प्रश्न उपस्थित करतो तेव्हा त्यावर मंत्र्यांकडून समर्पक उत्तराचीच अपेक्षा आम्हाला असते. आता या ठिकाणी एका प्रश्नाचा निकाल लागला आहे. एकाच वेळी दोन परीक्षा विद्यापीठाकडून ठेवण्यात आल्या होत्या त्या बाबत आपण सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. पण तरीही एकाच दिवशी दोन दोन परीक्षा आपण ठेवल्या आहेत म्हणजे तीन तीन तासाच्या दोन परीक्षा विद्यार्थ्यांना एकाच दिवशी द्याव्या लागणार आहेत. एकाच दिवशी विद्यार्थ्यांनी या परीक्षा कशा काय द्यायच्या ? त्याचे उत्तर आपण दिलेले नाही. एकाच दिवशी दोन पेपर्स देण्याची कसरत विद्यार्थ्यांनी कशी करायची ? आपण सुरूवातीस प्रसिद्ध केलेले परीक्षेचे वेळापत्रक बदलले त्याबद्दल जरूर आपल्याला धन्यवाद. पण एकाच दिवशी विद्यार्थ्यांना दोन दोन पेपर्स द्यावे लागत आहेत, सलगतेने 6 तास पेपर्स हे विद्यार्थी कसे लिहिणार ? तेव्हा त्याबाबत आपण विचार करून हे वेळापत्रक बदलणार का ? येथे दिलेले हे उत्तर बेजबाबदार आहे असे मला वाटते.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आम्ही या निवेदनातच मान्य केलेले आहे की, मराठी आणि इतिहास व अर्थशास्त्र विषयांचे पेपर्स एकाच वेळी वेळापत्रकात दाखविलेले होते. आणि ही चूक मान्य करून आम्ही 5.3.2008 रोजी प्रसिद्ध केलेल्या या वेळापत्रकात लागलीच म्हणजे 13 मार्चलाच दुरूस्ती केलेली आहे. ही परीक्षा उद्यापासून सुरू होत आहे म्हणजेच आम्ही 15 दिवस अगोदरच ही दुरूस्ती केलेली आहे. परंतु आता सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे एका दिवशी दोन पेपर्स विद्यार्थ्यांना द्यावे लागत आहेत, ते बरोबर आहे, त्यात गैर असे काहीही नाही. कारण मी देखील माझ्या विद्यार्थीदशेमध्ये असताना अशा प्रकारे एका दिवशी दोन दोन पेपर्स दिलेले आहेत. सभापती महोदय, मुंबई विद्यापीठामध्ये 33 ग्रूप्स आहेत आणि 261 विषय आहेत. म्हणजे इतक्या विषयांची परीक्षा घेण्यास आपल्याला आज 40 दिवस लागत आहेत तरीही आपण ते कॉंप्रेस करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र एका दिवशी दोन पेपर्स लिहिण्यामध्ये काहीही अडचण येत नाही असे माझे स्वत:चेही मत आहे. यापूर्वी आम्ही देखील अशा परीक्षा दिल्या आहेत.

श्री. कपिल पाटील : पण एकाच शाखेचे दोन पेपर्स अशा प्रकारे एकाच दिवशी असतील तर सलग 6 तास विद्यार्थी कसे काय ते लिहू शकतील ?

...... पी 5 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. पुढील शैक्षणिक वर्षात हे दुरूस्त करून घेऊ. उद्या पासून परीक्षा सुरू होणार असल्याने आता याबाबत काहीही करता येणार नाही.

***

( यानंतर श्री. सरफरे ....क्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना होत असलेला मानसिक त्रास

**मु.शी.**: अकोला जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांना होत असलेला मानसिक त्रास याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा कारागृहात आरोपीचा गृढ मृत्यू होणे

मु.शी. : अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा कारागृहात आरोपीचा गृढ मृत्यू होणे याबाबत सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. जयंत प्र. पाटील, शरद पाटील, वि.प.स. यांनी "(अलिबाग (जि.रायगड) येथील जिल्हा कारागृहात आरोपीचा गृढ मृत्यू होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आधीच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मृत्यूपूर्वी मयत श्री. प्रभाकर हैबत नाईक याने विडी आणि तंबाखूचे सेवन केले होते असे प्राथमिक चौकशीमध्ये आढळून आले. सदर वस्तू पोलिसांनी ताब्यात घेऊन चौकशी केली होती काय? मयत श्री. नाईक याचा मृत्यू झाल्यानंतर नजिकच्या पोलीस स्टेशनमध्ये केव्हां खबर देण्यात आली? खबर देण्यात आल्यानंतर पोलिसांनी कोणती कारवाई केली?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, श्री. नाईक यांचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्याकडील तंबाखू ताब्यात घेऊन त्याची आपण काय तपासणी करणार?

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्या तंबाखूमध्ये विष असू शकते...

**उपसभापती** : पोलिसांना काहीही खाण्याची सवय असते, त्यामुळे पोलिसांनी ते तंबाखू खाल्ले काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, जेलमधील कँटीनमधून ते तंबाखू घेण्यात आले होते. त्यामुळे त्याला तंबाखूमधून विषबाधा झालेली नाही. याबाबतची तपासणी करण्यात आली आहे. घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला तक्रार केल्यानंतर पोलिसांनी त्याठिकाणी जाऊन पंचनामा केला आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेगांव-जानोरी रस्त्याचे काम निकृष्ट होणे

**मु.शी.**: प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयातील शेगांव-जानोरी रस्त्याचे काम निकृष्ट होणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

**पृ.शी.**: कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करणे

**मु.शी.**: कोकण विभागासाठी स्वतंत्र शालांत परीक्षा मंडळ स्थापन करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, नितीन गडकरी, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, गुरुमुख जागवाणी वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : संबंधित विभागाचे माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरहू नियम 93 चे निवेदन पुढे ढकलण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कांदिवली (पश्चिम) येथील न्यू एम.आय.जी. वसाहतीचा पुनर्विकास करणाऱ्या विकासकाकडून म्हाडाने थकबाकीची वसूली न करणे

**मु.शी.**: कांदिवली (पश्चिम) येथील न्यू एम.आय.जी. वसाहतीचा पुनर्विकास करणाऱ्या विकासकाकडून म्हाडाने थकबाकीची वसूली न करणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

**पृ.शी.**: संक्रमण शिबीर बांधण्यासाठी बिल्डरांना दिलेल्या जमिनी म्हाडाच्या ताब्यात न मिळणे

**मु.शी.**: संक्रमण शिबीर बांधण्यासाठी बिल्डरांना दिलेल्या जमिनी म्हाडाच्या ताब्यात न मिळणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

पृ.शी. : पोद्दार व पेटीट या रुग्णालयांकडून जैविक कचऱ्याची विल्हेवाट योग्य प्रकारे न लावली जाणे

मु.शी. : पोद्दार व पेटीट या रुग्णालयांकडून जैविक कचऱ्याची विल्हेवाट योग्य प्रकारे न लावली जाणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. गणेश नाईक (पर्यावरण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी "पोद्दार व पेटीट या रुग्णालयांकडून जैविक कचऱ्याची विल्हेवाट योग्यप्रकारे न लावली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील रुग्णालयांमध्ये कशाप्रकारे कारभार चालतो याबाबत अतिशय महत्वाचे निवेदन याठिकाणी करण्यात आले आहे. भगवती, जे.जे., के.ई.एम. या रुग्णालयांचा कारभार सुधारला नाहीतर जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द खटला भरण्याची कारवाई करण्यास न्यायालयाने प्रदूषण मंडळाला सांगितले आहे काय? असल्यास, या 3 अधिकाऱ्यांविरुध्द खटला कां भरला नाही? न्यायमूर्ती श्री. सुंदरकुमार आणि न्यायमूर्ती श्री. जे. पी. देवधर यांनी आदेश देतांना राज्यातील 1874 रुग्णालयांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळविण्यासाठी अर्ज केलेला नाही. त्यांच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले होते काय? असल्यास, न्यायालयाने आदेश देईपर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळ कां थांबले?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, जैविक घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व रुग्णालयांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे रितसर अर्ज करुन परवानगी घ्यावी लागते. मुंबईतील पोद्दार, आणि दिनशॉ पेटीट या दोन रुग्णालयांनी अशाप्रकारची परवानगी घेतली नव्हती. पी.आय.एल. व्दारे ही बाब उजेडात आणली. आणि त्यानुसार न्यायालयाच्या आदेशानुसार या दोहोंच्या बाबतीत चौकशी करण्याचे ठरविण्यात आले. त्या चौकशीमध्ये या लोकांनी परवानगी घेतली नव्हती असे निष्पन्न झाले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:25

श्री.गणेश नाईक . . . .

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे अशा लोकांना नोटीस दिली जाते आणि विहित कालखंडामध्ये संबंधितांनी तशा प्रकारची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने अर्ज केला आणि पूर्तता केली तर त्यांना पुन्हा नियमित केले जाते. त्याप्रमाणे पोद्दार रुग्णालय, वरळी आणि दिनशॉ पेटीट रुग्णालय, परळ यांनी तशा प्रकारचे अर्ज केले आणि पूर्तता केल्यामुळे त्यांच्यावर पुढे कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित झालेला नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदय वेगळे उत्तर देत आहेत. न्यायालयाने असे म्हटलेले आहे की, भगवती रुग्णालय, जे.जे.रुग्णालय आणि के.ई.एम.रुग्णालयाचा कारभार सुधारला नाही तर त्यांच्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द कारवाई करण्यात यावी. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्रात सादर केल्याप्रमाणे राज्यातील म.प्र.नि.मंडळाच्या 22 प्रादेशिक कार्यालयांतर्गत एकूण 10711 वैद्यकीय आस्थापनांपैकी 8837 आस्थापनांनी अर्ज केलेला आहे व राहिलेल्या आस्थापनांनी (1874) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळविण्याकरिता अर्ज केलेला नाही अशा रुग्णालयांवर कार्यवाही करण्याची प्रक्रिया चालू आहे."म्हणजे काय ? तसेच निवेदनामध्ये असेही म्हटलेले आहे की,"तसेच मा.उच्च न्यायालयाने नेमेलेल्या कोर्ट कमिशनर यांनी भगवती, जे.जे. व के.ई..एम.या रुग्णालयांना सुध्दा भेटी देऊन सादर केलेल्या अहवालानुसार मंडळाने दिनांक 6-2-2008 रोजी या रुग्णालयांना पर्यावरण (संरक्षण) कायदा, 1986 च्या अंतर्गत नोटीसा बजावल्या असून या रुग्णालयांना नियमांची पूर्तता करण्यासाठी सहा आठवडयांचा कालावधी देण्यात आलेला आहे." के.ई.एम.हॉस्पिटल हे काही लहान हॉस्पिटल नाही. शासनाला असे सांगितले आहे की, त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करावी. पण आपण त्यांना सहा आठवडयांची संधी दिलेली आहे. हे सर्व विसंगत आहे. तसेच 1874 रुग्णालयांनी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाची मान्यता मिळविण्याकरिता अर्ज केलेला नाही. म्हणजे महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे अधिकारी हे केवळ पैसे खाण्याचे काम करतात काय ? या शासनाची सत्ता येऊन चार वर्षे झालेली असली तरीअजून या मंडळाचा चेअरमन देखील नेमलेला नाही. ही रुग्णालये लोकांच्या जिविताशी खेळ खेळत आहेत. निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे एकूण 10,711 वैद्यकीय आस्थापनांपैकी 8837 आस्थापनांनी अर्ज केलेला आहे आणि त्यातील 1874 आस्थापनांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता ....

. . . .आर-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

मिळविण्यासाठी अर्ज केलेला नाही. अशा रुग्णालयांवर कायदेशीर कारवाई करावी असे न्यायालयाने सांगितलेले आहे. पण माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरु आहे. म्हणजे नेमके काय सुरु आहे ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाणसाहेबांची जी भावना आहे, तीच माझी भावना आहे. एखाद्या आस्थापनेला त्यांनी ज्या पूर्तता केलेल्या नाहीत, त्या बद्दल नोटीस देणे, हा सुध्दा कायदेशीर कारवाईचाच भाग आहे. अशा वेळी संबंधितांना दिलेल्या कालखंडामध्ये त्यांनी त्यांच्याकडील अनियमितता नियमित केली नाही तर त्यांच्यावर पुन्हा कठोर कारवाई करण्याचा प्रश्न निर्माण होतो. जर त्यांनी त्या कालखंडामध्ये आपल्या चुका दुरुस्त केल्या तर त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

----

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अनेक महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे

मु. शी. : अनेक महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,श्रीकांत जोशी, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सुरेश शेट्टी (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर,विनोद तावडे,मधुकर चव्हाण,श्रीकांत जोशी यांनी "अनेक महाविद्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची सेवा नियमित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

. . . .आर-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी शासकीय संस्थांमध्ये काम करणाऱ्या जवळजवळ 22 ते 23 कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. गेली 28 ते 29 वर्षे हे कर्मचारी अत्यावश्यक सेवा म्हणून भरलेले आहेत. पण अद्यापही त्यांना कायम म्हणून मान्यता मिळालेली नाही. याठिकाणी मला माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद द्यावेसे वाटतात. कारण हे कर्मचारी 28 ते 29 वर्षापासून काम करीत आहेत. हे त्यांनी मान्य केलेले आहे. आम्ही लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर जाऊन याबाबतीत निर्णय घेऊ. म्हणून माझे केवळ दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा की, गेली 28-29 वर्षे हे कर्मचारी चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. अशा वेळी शिक्षण उप संचालकांनी या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रस्ताव तयार करुन तो अद्यापपर्यंत का पाठविला नाही ? दुसरा प्रश्न असा आहे की, सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे आपण याबाबतीत सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन या सर्व कर्मचाऱ्यांना कायम करण्याच्या बाबतीत लवकरात लवकर मंत्रिमंडळासमोर जाऊन त्याला मान्यता घेण्याचे मान्य केलेले आहे. तेव्हा या कर्मचाऱ्यांचा प्रश्न कधीपर्यंत मार्गी लागेल ? एवढेच माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारलेले आहेत. पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांना माहिती आहे की, प्रत्येक विभागामध्ये आढावा घेण्याचे काम सुरु होते. हे काम संपल्यानंतर आपण असे ठरविले की, जे टेम्पररी कर्मचारी आहेत, त्यांना परमनंन्ट करावयाचे. तसेच निवेदनामध्येही उल्लेख केलेला आहे. गट "ड" मधील जे 22 कर्मचारी आहेत. आता त्यातील 6 कर्मचारी नाहीत. बाकीच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आमचा प्रस्ताव तयार असून लवकरच मंत्रिमंडळासमोर जाऊन दोन महिन्याच्या आत निर्णय घेऊ आणि ही जी कमतरता होती, ती पूर्ण करु.

----

. . . .आर-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**उपसभापती** : यानंतर निवेदन क्र.13 घेण्यात येईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सभागृहामध्ये संबंधित मंत्री महोदय उपस्थित नाहीत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 14 घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे निवेदन महसूल खात्याकडून व्हावयास पाहिजे. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. सभापती महोदय सभागृहात काय चालले आहे ?

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 14 हे महसूल विभागाशी संबंधित आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभपती महोदय, सभागृहात काय चालले आहे. शासन एकदम लाईटली घेत आहेत.

**उपसभापती** : यानंतर निवेदन क्रमांक 15 घेण्यात येईल.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सभागृहामध्ये काय चालले आहे ? या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. सत्ताधारी पक्ष ही बाब एवढी लाईटली घेणार काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे अनेक निवेदनांच्या बाबतीत झालेले आहे. अनेक निवेदनांच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत आणि सभापती म्हणून आपण त्याची योग्य ती नोंद घेत नाही. त्यानंतर पुढे गेलो, मग पुढे बघू, राखून ठेवले, करावयाचे असेल तर करा नाही तर करु नका अशी सरकारची परिस्थिती झालेली आहे.

**उपसभापती** : मी जी निवेदने पुकारली आणि ज्या निवेदनाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत त्याची मी गंभीर नोंद घेतलेली आहे. ही सर्व निवेदने संपल्यानंतर मला जे बोलावयाचे आहे ते मी बोलणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सदस्य उपस्थित नसेल तर ते निवेदन रद्द होते मग माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसतील तर ते निवेदन पुढे कसे जाईल ?

**उपसभापती** : निवेदनाचा हा सगळा भाग संपल्यानंतर मला याबाबतीत जे सुतोवाच करावयाचे ते मी करीन. मी फक्त आता कामकाज थांबवलेले नाही एवढेच सांगतो. ज्या निवेदनाच्या वेळी माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नव्हते ते प्रत्येक मी निवेदन राखून ठेवलेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण त्या आसनावर असल्यामुळे मी विश्वासाने खाली बसतो.

**उपसभापती** : आपला जोपर्यंत विश्वास आहे तोपर्यंत मी या आसनावर बसेन. ज्या दिवशी आपला विश्वास नसेल त्या दिवशी मी या आसनावर थांबणार नाही. यानंतर निवेदन क्रमांक 15 नंतर घेण्यात येईल. संबंधित मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे हे निवेदन राखून ठेवण्यात येत आहे. यानंतर निवेदन क्रमांक 16 घेण्यात येईल.

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : भायखळा येथील रेतीवाला इंडस्ट्रीयल इस्टेटच्या तिसऱ्या मजल्यावर लागलेली आग

**मु. शी.** : भायखळा येथील रेतीवाला इंडस्ट्रीयल इस्टेटच्या तिसऱ्या मजल्यावर लागलेली आग याबाबत श्री जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील. ॲड. अनिल परब, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. गणेश नाईक ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील. ॲड. अनिल परब, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. अरविंद सावंत यांनी "भायखळा येथील रेतीवाला इंडस्ट्रीयल इस्टेटच्या तिसऱ्या मजल्यावर लागलेली आग" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, दिनांक 17.3.2008 ला ही घटना घडूनही या घटनेला जबाबदार असलेले मालक फरार आहेत. त्यांना अटक करण्याच्या बाबतीत कोणती कारवाई करण्यात आली ? फॅक्टरी इन्स्पेक्टरने त्या फॅक्टरीमध्ये या आधी किती वेळा भेटी दिलेल्या होत्या ? ही फॅक्टरी अनधिकृत होती, त्या फॅक्टरीला परवानगी नव्हती, ती फॅक्टरी बेकायदेशीर चालू होती, ही बाब खरी आहे काय ?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, या फॅक्टरीचा मालक फरार आहे म्हणजे ते शोधूनही सापडत नाहीत. त्यांचा शोध चालू आहे. ज्या कालखंडामध्ये ते पोलिसांच्या नजरेस दिसतील त्यावेळी पोलीस त्यांना अटक करतील. त्या ठिकाणी फॅक्टरी इन्स्पेक्टरने भेटी दिल्या का असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. त्या ठिकाणी गाळे आहेत आणि त्या ठिकाणी विजेचे कोणतेही कनेक्शन घेऊन प्रोसेसचे काम होत नाही. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया करण्याचे काम होत नाही. त्या ठिकाणी फक्त एअर फ्रेशनर मोठ्या ड्रममध्ये आणून छोट्या सिलेंडरमध्ये टाकण्याचे काम चालते. म्हणून त्याला आपण आस्थापना म्हणूया. एरवी फॅक्टरी ॲक्टच्या अनुषंगाने जे जे नियम लागू असतात ते नियम त्या ठिकाणी लागू नाहीत. एखाद्या गाळ्यामध्ये दुकान टाकतात तशा स्वरुपाचा हा व्यवसाय आहे. त्या ठिकाणी आग लागल्यानंतर त्या ठिकाणी कामगार होते ही बाब लक्षात आलेली आहे. एरवी ही बाब कोणाच्याही लक्षात आली नसती. म्हणून त्या ठिकाणी वारंवार कामगार खात्याकडून भेटी देण्याचा प्रश्न उपस्थित झाला नाही. कारण तशा प्रकारची नोंदच नव्हती.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, त्याठिकाणी स्फोटके, केमिकल्स ठेवली जातात. ज्याठिकाणी खिडक्यांना जाळी लावून आत स्फोटके, केमिकल्स ठेवली जातात. साधे दुकान काढावयाचे असेल तर दुकाने व आस्थापना विभागाचा परवाना घ्यावा लागतो. भायखळा येथील या इमारतीमध्ये एवढया मोठया प्रमाणात हा कारखाना सुरु होता. मंत्रिमहोदयांनी म्हटले आहे की, तेथे मशिनरी नव्हती, इलेक्ट्रिकचे काम केलेले नव्हते, त्यामुळे या कारखान्याला दुकाने व आस्थापना ॲक्ट लागू होत नाही. परंतु या कारखान्याला शासनाचा कंपनी ॲक्ट तरी लागू होतो. त्यासाठी त्यांनी शासनाची परवानगी घेतली होती काय ? त्याची सदनाला माहिती होणे आवश्यक आहे. कारण लोकांच्या जीविताचा हा प्रश्न आहे.

श्री.गणेश नाईक : मुंबई शहरामध्ये दुकाने व आस्थापना विभाग महापालिकडे आहे. त्यामुळे या कारखान्याची कामगार खात्याकडे नोंद असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्या कारखान्यात ज्वालाग्रही पदार्थ होता. शासनाने वारंवार महापालिकेकडे असलेले दुकाने व आस्थापना विभागाचे अधिकार.......

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासनाच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेला हा विषय असल्यामुळे सभागृहाच्या रेकॉर्डवर चुकीची माहिती येऊ नये अशी माझी मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

श्री.गणेश नाईक : माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. महापालिका ही शासनाच्या अखत्यारितीतील बाब आहे हे खरे आहे. राज्यातील अन्य परिसरामध्ये दुकाने व आस्थापना शाखेचे नियंत्रण कामगार खात्यातर्फे केले जाते. परंतु मुंबईसाठी विशेष बाब म्हणून हा विषय महापालिकेकडे वर्ग केलेला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून याप्रकरणाची माहिती घेण्याचे काम सुरु आहे. या प्रकरणातील संबंधितास पकडल्यानंतर त्यांच्याकडून माहिती घेऊन पुढील कारवाई केली जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ.शी.**: मुंबईतील तेली गल्लीतील शिवशक्ती इमारतीमध्ये लिकेज, पिण्याच्या पाण्याचे पाईप फाटणे व खोलीतील स्लॅब कोसळण्याचे वारंवार प्रकार होणे

**मु.शी.**: मुंबईतील तेली गल्लीतील शिवशक्ती इमारतीमध्ये लिकेज, पिण्याच्या पाण्याचे पाईप फाटणे व खोलीतील स्लॅब कोसळण्याचे वारंवार प्रकार होणे याबाबत सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी 'मुंबईतील तेली गल्लीतील शिवशक्ती इमारतीमध्ये लिकेज, पिण्याच्या पाण्याचे पाईप फाटणे व खोलीतील स्लॅब कोसळण्याचे वारंवार प्रकार होणे ' या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, निवेदनाच्या पान क्रमांक 2 वर दिलेल्या उत्तरावरुन असे वाटते की, शासन याबाबत कोणत्याही प्रकारची गंभीर दखल घेत नाही. घरदुरुस्त मंडळ हे सर्वांत चांगले उदाहरण आहे. मंत्रिमहोदयांनी अगदी लाईटली उत्तर दिलेले आहे. माझ्याजवळ फोटो आहेत. तेथील 288 माणसे जीव मुठीत धरुन रहात आहेत. प्रत्येक घराचे छत दररोज पडत आहे. त्यामुळे गेले सहा महिने हे लोक सांगत आहेत की, एखाद्या दिवशी संपूर्ण इमारतीचे छत कोसळून आम्ही मरुन जाऊ. परवा तर एका खोलीतील पंख्यासह छत कोसळले आहे. ही सर्व वस्तुस्थिती असताना शासनाने मात्र निबंध लिहावा असे उत्तर दिले आहे. या निवेदनात असे नमूद केले आहे की, 'अलिकडील काळामध्ये काही गाळयांच्या छताचा काही भाग गळून पडण्याच्या घटना घडत आहेत. त्याठिकाणी सिपोरेक्स कंपनीतर्फे पावडर उपलब्ध करुन देण्यात येते.' म्हणजे तोंडाला पावडर लावून घराबाहेर पडावे अशाप्रकारचे हे उत्तर दिले आहे. तेथील रहिवाशांनी तक्रार करुन सुध्दा तक्रारीची दखल घेतली जात नाही. बी.जी.शिर्के कंपनीने सिपोरेक्स कंपनीच्या पावडरचा वापर करुन पुर्वरचित बांधकाम घटक पध्दतीने हया इमारतींचे बांधकाम केलेले आहे. त्याच्या खोलामध्ये मला जावयाचे नाही. परंतु हे टेक्निक आता कालबाहय झाले आहे काय आणि हया इमारतींची पुनर्बांधणी केली जाईल काय आणि तक्रार करुन सुध्दा दखल न घेणा-या अधिका-यांविरुध्द कारवाई केली जाईल काय ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, सदर इमारती 1978 साली प्रीफॅग बिल्डिंग कॉम्पोनंट पध्दतीने बी.जी.शिर्के कंपनीने बांधल्या आहेत. या इमारतींची वेळोवेळी दुरुस्त केलेली आहे. इमारतीमधील रहिवाशांच्या तक्रारीनंतर इमारतींची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. प्रामुख्याने छताबाबत तक्रार करण्यात आली होती. विशिष्ट पावडर असेल तर छताची दुरुस्ती होऊ शकते. परंतु शिर्के कंपनीकडे त्यावेळी पावडर उपलब्ध नव्हती. आता ती पावडर उपलब्ध झ ाली असून 8 दिवसामध्ये दुरुस्तीचे काम सुरु होईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, 288 लोक आपला जीव मुठीत धरुन तेथे रहात आहेत. पुनर्बांधणीची पध्दत आता कालबाहय झालेली आहे. या इमारतीसाठी सिपोरेक्स स्लॅब पॅनल वापरलेले आहे. त्या इमारतींचा 20-20 किलो वजनाचा छताचा भाग दररोज कोसळत आहे. त्यामुळे लोक गॅलरीत झोपत आहेत.

नंतर श्री.शिगम

(श्री. मधुकर चव्हाण....)

या इमारतीमध्ये 160 चौ.फुटांचे गाळे आहेत. ही इमारत पुनर्बांधणीसाठी घेण्यात येणार आहे काय ? या इमारतीच्या संदर्भात वेळोवेळी तक्रारी करुन देखील त्या तक्रारींची दखल ज्या अधिका-यांनी घेतली नाही त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : पुनर्बांधणीसाठी रहिवाशी आग्रह धरत असतील तर त्यांच्या सोसायटीने तसा अर्ज करावा. त्या अर्जाचा जरुर विचार केला जाईल. तेथील रहिवाशांना राहाण्यालायक दुरुस्ती मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे त्यांचा प्रश्न मिटेल असे वाटते.

(माननीय उपसभापती माननीय राज्यमंत्री महोदय ॲड. प्रितमकुमार शेगांवकर यांना फोटो देतात.)

-----

==2==

अस्पुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 93च्या निवेदनासंबंधी</u>**

**उपसभापती** : निवेदन क्रमांक 18, 19 व 20 पुढे ढकलण्यात आलेली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

**पृ. शी**. : वसईमध्ये एका अल्पवयीन मुलीवर रिक्षाचालकाने केलेला बलात्कार

**मु. शी**. : वसईमध्ये एका अल्पवयीन मुलीवर रिक्षाचालकाने केलेला बलात्कार याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "वसईमध्ये एका अल्पवयीन मुलीवर रिक्षाचालकाने केलेला बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : वसईमध्ये हा बलात्काराचा प्रकार घडल्यानंतर 15 तारखेला मी स्वत: त्या मुलीला भेटले. तसेच पोलीस स्टेशनला देखील मी भेट दिली आणि तेथील पोलीस इन्स्पेक्टर श्री.कोळी यांनी या प्रकारणी काय काय तपास केला याची माहिती घेतली. या सभागृहातील माहिती विविध माध्यमातून सगळीकडे पोहोचत असते त्यामुळे या घटनेबद्दल अगदी स्पष्ट बोलण्याला मला स्वत:ला काही मर्यादा पडतात. या प्रकरणी मेडिकल रिपोर्टमध्ये हस्तक्षेप व्हावा, या पध्दतीने एफआयआरमध्ये अपुरेपणा ठेवलेला मला आढळला. एफआयआर मी स्वत: वाचलेला आहे. बलात्काराचा पुरावा राहू नये अशा पध्दतीने, त्या आरोपींनी एक वेळा कंडोम वापरला आणि एका वेळा वापरला नाही असा उलेख एफआयआरमध्ये केलेला आहे. मला मेडिकल रिपोर्ट दाखवा असे मी सांगितल्यानंतर मला कोरीया नावाच्या इन्स्पेक्टरने सांगितले की, शेट्टी नावाचे अधिकारी मेडिकल रिपोर्ट घेऊन आरोपीला शोधण्यासाठी उत्तर प्रदेशामध्ये गेलेले आहेत. पोलीस अधिकारी मेडिकल रिपोर्ट बरोबर घेऊन आरोपीला शोधण्यासाठी उत्तर प्रदेशला जातात याचे आश्चर्यच वाटते. आरोपीला शोधण्यासाठी बरोबर मेडिकल रिपोर्ट घेऊन जाण्याची काय आवश्यकता आहे ? हा प्रकार घडल्यामुळे आरोपीला लोक शोधत होते आणि त्यावेळी आरोपीला कोर्टात लपवून ठेवण्यात आले होते आणि त्याच वेळी पोलिसांनी त्याला अटक केल्याचे दाखविले होते. अशा प्रकारे हे प्रकरण दडपण्याचा प्रकार सुरु आहे. मेडिकल रिपोर्टची झेरॉक्स प्रत देखील मला दाखविण्यात आली नाही. तेव्हा अशा प्रकारे आरोपीला संरक्षण देणा-या कोळी नावाच्या पोलीस अधिका-यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? डी.एन.अे. टेस्ट केल्यानंतर पुरावा स्पष्ट होईल. तेव्हा या प्रकरणी डी.एन.अे.टेस्ट केली जाईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : संबंधित पी.आय.ने एफ.आय.आर.मध्ये खाडाखोड केली असेल किंवा अपुरेपणा ठेवला असेल तर त्याची चौकशी करुन निश्चितपणे कारवाई केली जाईल. कंडोम वापरला असो अथवा नसो, इंटरकोर्स झाला की बलात्काराचा गुन्हा दाखल होतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे डी.एन.अे.टेस्ट करण्यात येईल.

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : जालना मधून आलेले हे गरीब आणि असंघटीत लोक आहेत. ज्या पध्दतीने पोलीस अधिकारी वागत आहेत त्यावरुन हा गुन्हा दडपण्याचा प्रकार होत असल्याचे दिसून येत आहे. तेव्हा हा गुन्हा मागे घेण्यासाठी त्या लोकांवर दबाव आणण्याचे काम होणार नाही आणि ज्या शिवसैनिकांनी आरोपीला पकडण्यासाठी सहकार्य केले त्याच्यावर कारवाई होणार नाही अशा प्रकारचे आश्वासन मंत्री महोदय देतील काय ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ही घटना घडली, त्यानंतर तेथील दोन्ही समाजाच्या लोकांनी सदर प्रकरण आपापसात मिटविण्याचा प्रयत्न केला होता. तेथील शिवसैनिकांनी त्या पिडीत मुलीला पोलीस स्टेशनमध्ये आणले होते. त्यावेळी त्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवून घेतला आहे. संबंधित पोलीस स्टेशनकडून गुन्हा नोंदवून घेण्याची कार्यवाही केलेली आहे. शिवसेनेचे लोक असोत अथवा अन्य लोक असोत, ज्यांनी शासकीय कामकाज करण्यासाठी मदत केली असेल तर अशा लोकांना त्रास होणार नाही याची दक्षता निश्चितपणे घेण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही घटना घडली त्यावेळी तेथे लोकांची गर्दी जमली होती. तेथील लोकांना पोलीस कॉन्स्टेबल विचारतो की, त्या ठिकाणी काय घडले आहे ? त्या ठिकाणी बलात्काराची घटना याची तेथील पोलीस कॉन्स्टेबलला माहिती नव्हती अशी वस्तुस्थिती आहृ आपणास जर ही वस्तुस्थिती खरी वाटत नसेल तर या प्रकाराबाबतची सी.आय.डी. चौकशी करावी.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण घटना घडल्यानंतर दुस-या दिवशी तेथे गेला होतात. परंतु घटना घडली त्या दिवशी तेथे दोन्ही समाजाची बैठक चालली होती. तेथे उपस्थित असलेल्या पोलिसाने विचारले की, त्या ठिकाणी काय चालले आहे ? त्या पोलिसांने तेथील लोकांना सांगितले की, झालेल्या प्रकाराबाबत तुम्हाला तक्रार करावयाची असल्यास पोलीस स्टेशनमध्ये जा. परंतु त्यास तेथील लोकांकडून सांगण्यात आले की, आम्हाला याबाबतीत काही तक्रार करावयाची नाही. शिवसैनिकांनी त्या मुलीस पोलीस स्टेशनला आणल्या नंतर सदर घटनेबाबत तक्रार दाखल करुन घेण्यात आली आहे. त्या पिडीत मुलीस भीती वाटत असेल तर तिला निश्चितपणे संरक्षण दिले जाईल.

---------------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भातसा धरणाची उंची वाढविल्यामुळे धरणाच्या मागील बाजुची जमीन नापिक होणे

**मु. शी.**: भातसा धरणाची उंची वाढविल्यामुळे धरणाच्या मागील बाजुची जमीन नापिक होणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अजित पवार ( जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "भातसा धरणाची उंची वाढविल्यामुळे धरणाच्या मागील बाजुची जमीन नापिक होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, भातसा धरणांची उंची वाढविल्यामुळे धरणाखालील जमिनीचा काही भाग पाण्याखाली आला. ती जमीन शासनाने संपादन केली नाही म्हणून तेथील शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. आता तेथील जमीन संपादित करण्यासंबंधीची प्रोसेस सुरु झाली आहे असे निवेदनाच्या उत्तरात म्हटले आहे. परंतु या धरणाच्या मागील बाजुच्या शेतक-यांच्या जमिनी बुडीत क्षेत्रात आधीपासूनच आलेल्या आहेत. म्हणून सदरहू जमिनी शासनाकडून कधीपर्यंत संपादित केल्या जातील? निवेदनाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, भुईभाडे दिले जाईल. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, ज्या शेतक-यांची जमीन बुडीत क्षेत्रात गेली आहे त्यांना मागील काळापासूनचा इफेक्ट दिला जाईल की जमीन संपादन केल्यापासूनचा इफेक्ट दिला जाईल ?

**उपसभापती** : आपण स्पेसिफीक प्रश्न विचारावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, सदर ठिकाणची जमीन किती दिवसात संपादित केली जाईल ? जमीन संपादनाचा मोबदला कधी पासून आणि केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, भातसा धरणाची उंची वाढविली नव्हती. परंतु 1979 ते 2005 पर्यंत भातसा धरणाची वक्रव्दारे बसविली नव्हती. सदर वक्रव्दारे 2005 मध्ये बसविली गेली. 2005 नंतर जो पावसाळा आला त्यावेळी प्रथमच 142 मीटरपर्यंत पाणीसाठा करण्यात आला. पूर्वी 133 मीटरपर्यंत पाणीसाठा करण्यात येत होता. विभागाला असे वाटले होते की, येथेपर्यंत पाणीसाठा केल्यानंतर नवीन जमीन पाण्याखाली जाणार नाही. परंतु त्यामध्ये सर्व्हे क्रमांक 48 मधील 97 आर एवढे क्षेत्र पाण्याखाली गेले. त्यात श्रीमती सीमा भाकरे आणि श्री. गणपत नारायण भाकरे शेतक-यांची जमीन पाण्याखाली गेली. तसे बघितले तर त्या शेतक-यांचा यात काही दोष नव्हता. याबाबतीत जलसंपदा विभागाकडून दोष राहून गेला आहे. त्यावेळी पाणी अडविल्यामुळे त्या शेतक-यांचे नुकसान झाले असेल त्यासंबंधी निश्चितपणे नुकसान भरपाई दिली जाईल. तेथील जमीन भूसंपादन करण्याकरिता तातडीने कार्यवाही सुरु केली आहे. भूसंपादन अधिकारी, जिल्हा ठाणे यांनी जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे एप्रिल, 2008 मध्ये रितसर प्रस्ताव सादर केला आहे. ऑक्टोबर, 2008 पर्यंत कलम 4 आणि कलम 6 ची कार्यवाही होईल. त्यानंतर त्या जमिनीचे मुल्ल्यांकन निश्चित केले जाईल. मुल्ल्यांकन झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांना ताबडतोब 80 टक्के

4...



श्री.अजित पवार...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोबदला वेगवेगळया रक्कमेचा दिला जाईल आणि त्यांना 5 टक्के भुईभाडे 2005 पासून देणे शक्य होईल. कलम 8,9,11 आणि 12 प्रक्रिया सुरु होईल आणि अंतिम मोबदला आणि उर्वरित 5 टक्के भुईभाडे देण्यात येईल. तेथील शेतक-याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही अशा प्रकारची खबरदारी जलसंपदा विभागाकडून घेतली जाईल.

----------

5....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनाच्या वेळी मंत्री, राज्यमंत्री अनुपस्थित असणेबाबत**</u>

**उपसभापती** : निवेदनाच्या बाबतीत एक गोष्ट मी शासनास गांभीर्याने सांगू इच्छितो की, ज्या ज्या वेळी सभागृहात नियम 93 अन्वयेची निवेदने येतील, त्यावेळी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना अथवा राज्यमंत्र्यांना सभागृहाच्या कामापेक्षा जास्त महत्वाचे काम असेल तर त्यांनी अनुपस्थित राहण्याबाबतची माहिती पीठासीन अधिका-यांना अगोदर दिली पाहिजे. मंत्री अथवा राज्यमंत्र्यांनी अनुपस्थित राहण्याबाबतची माहिती अगोदर दिली तर त्यासंबंधीची माहिती पीठासीन अधिका-यांना सभागृहास देता येईल. परंतु आजच्या सूचनेच्या बाबतीत कोणाही मंत्र्यांनी पीठासीन अधिका-यांना अनुपस्थिती बाबत काहीही माहिती दिली नाही. या आसनावर मी असो, माननीय सभापती असोत, अथवा तालिका सभापती असोत आम्ही सभागृहात ट्रस्टी म्हणून काम करीत असतो. ज्या सदस्यांनी 93 ची सूचना दिलेली असते त्या सदस्यांची देखील कुंचबणा होत असते. आपण एवढी मेहनत घेऊन सभागृहात नियम 93 अन्वये सूचना मांडतो. परंतु शासनाकडून सदरहू नियम 93 च्या सूचनेच्या निवेदनाच्या बाबतीत काही प्रतिसाद मिळत नसेल तर ती बाब सभागृहाला भुषणावह नाही. मी या ठिकाणी जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांचे आभार मानतो की, ते जेव्हा त्यांच्या विभागाच्या निवेदनाच्या वेळी सभागृहात उपस्थित नव्हते. म्हणून त्यांनी सभागृहात दिलगिरी व्यक्त केली होती आणि ते निवेदन चर्चेला घावे अशी इच्छा व्यक्त केली होती.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** ......

किमानपक्षी असे वाटते की, असा आदर्श संबंधित मंत्रीमहोदयांनी ठेवून ते जर सदनामध्ये हजर राहू शकत नसतील तर त्यांनी आगाऊ पीठासीन अधिकाऱ्यांना कळवावे जेणेकरुन सन्माननीय सभासदांना माहिती देता येईल. मला असे वाटते की, झाले तेवढे पुरे झाले. याच्यापुढे अशी पाळी माझ्यावर अथवा सदनावर आणू नये. सन्माननीय सदस्यांची कुचंबणा होईल अशा प्रकारचे वर्तन मंत्रीमहोदयांकडून होऊ नये अशा प्रकारची अपेक्षा मी बाळगतो.

------

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत</u>**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 1 नंतर चर्चेला घेण्यात येईल. आधी लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चर्चेला घेण्यात येईल.

---

..........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आयुर्वेदिक औषधाने रोग बरा करण्याचे आमिष दाखवून तरुणीला लाखो रुपयांना फसविणेबाबत

**मु. शी.** :आयुर्वेदिक औषधाने रोग बरा करण्याचे आमिष दाखवून तरुणीला लाखो रुपयांना फसविल्यासंबंधी सर्वश्री गुरुमुख जागवानी,विनोद तावडे, मधुकर चव्हाण, संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुमुख जागवानी : ( जळगांव स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उपमुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुत्रपिंडाचा विकार आयुर्वेदिक औषधाने पूर्णपणे बरा करण्याचे आमिष दाखवून गोरेगाव येथे राहणारी दिपाली पाटील या तरुणीला व तिच्या वडिलांना लाखो रुपयांना फसविणाऱ्या 7 जणांच्या एका टोळीला गुन्हा अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक करणे, या अटक करण्यात आलेल्या टोळीत मालाड येथील आयुर्वेदिक दुकानाचा मालक राजेश शिर्के याचा समावेश असणे, या टोळीने सदर तरुणीला दिलेली हिरक व सुवर्ण या महागडया भस्माची पावडर ही नकली असल्याचे चौकशीत निष्पन्न हाणे,रुग्णांना फसविणाऱ्या या सराईत टोळीचा तपास लागल्याने अनेक प्रकरणे उघडकीस येण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ( गृहराज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री. गुरुमुख जागवानी :सभापति महोदय, यह बहुत गंभीर मामला है. मुंबई शहर में बड़े अस्पतालों के बाहर अपने आपको आयुर्वेदिक डॉक्टर बताकर ठग लोगों की टोली गरीब लोगों को फँसा कर उनसे इलाज के नाम पर हजारों-लाखों रुपये ले रही हैं. इस वजह से गरीब लोगों की जान-माल का नुकसान हो रहा है. इस संबंध में मंत्री जी ने अपने निवेदन में कहा है कि मुख्य आरोपी ने 25-30 लोगों को फँसाया है. मैं यह जानना चाहता हूं कि आरोपी ने जिन 25-30 लोगों को फँसाया है, उनसे आरोपी ने कितने पैसे लूटे हैं और ठगे गए लोगों को उनका पैसा वापस दिलाने के लिए सरकार ने क्या कोई कार्रवाई की है, दूसरा मेरा प्रश्न यह है कि आयुर्वेदिक दुकान का मालिक राजेश शिर्के की दुकान आज चालू है या बंद है, अगर दुकार बंद नहीं की गई है तो उसकी दुकान बंद करने के लिए सरकार क्या कार्रवाई कर रही है, तीसरा मेरा प्रश्न यह है कि मुख्य आरोपी जेल में है या बाहर है ? मैं इसी सिलसिले में और एक बात कहना चाहता हूं कि आज-कल किसी न किसी पेपर में इस प्रकार का विज्ञापन छपता है कि अमुक दवा लीजिए. आज के पेपर में भी इस प्रकार का विज्ञापन छपा है- कुमार क्लीनिक. लेकिन इस विज्ञापन के नीचे यह नहीं लिखा है कि इस डॉक्टर के पास कौनसी डिग्री है. उसकी डिग्री के बारे में कोई जानकारी नहीं दी है. इसलिए सरकार क्या इस संबंध में यह पॉलिसी करने के बारे में विचार करेगी कि संबंधित न्यूज पेपर विज्ञापनदाता का प्रमाणपत्र देखने के बाद ही विज्ञापन छापे ताकि ऐसे ठग लोगों के चंगुल में लोग न फँसे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दिपाली पाटील या मुलीला किडनीचा विकार झाला होता. तिच्यावर हिंदुजा रुग्णालयात उपचार चालू होते. एक बोगस रोगी या रुग्णालयात गेला आणि त्याने या मुलीला सांगितले की, येथे इलाज करु नका. आमच्याकडे आयुर्वेदिक इलाज होऊन रोग बरा होईल असे सांगून तिला फसविण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला 15-20 हजार रुपये खर्च येईल असे सांगितले. नंतर 1 लाख 55 हजार रु. खर्च येईल असे सांगितले. रोग्याने चेक दिले नाहीत. आयुर्वेदिक दुकानाचा मालक राजेश शिर्के यांची काम करण्याची एक सिस्टीम होती. एक महिनाभर दुकान चालवायचे आणि एखादे गिऱ्हाईक फसले की दुसरीकडे निघून जायचे. आता त्याचे कुठे दुकान नाही. याप्रकरणी एकूण 7 आरोपींना अटक करण्यात आली आहे. या आरोपींना जामीन मिळालेला नाही. कारण त्याच्यामध्ये सॉल्वन्सी होती. त्याची पूर्तता न

..5



श्री. सिध्दाराम म्हेत्रे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यामुळे जामीन मिळाला नाही. यातील आरोपी राजेश शिर्के,शामसुंदर शर्मा आणि भाभी अल्लाप्पा वैदू जामिनास पात्र नाहीत. पेपरमध्ये जी जाहिरात येते त्याबाबत विचार-विनिमय करुन योग्य ती कारवाई निश्चितपणाने करण्यात येईल.

श्री. गुरुमुख जागवानी :सभापति महोदय, मैंने यह प्रश्न पूछा था कि इन ठगों की टोली ने 25 लोगों से कितने पैसे लूटे हैं और वे पैसे ठगों से हासिल करने के लिए सरकार क्या कार्रवाई कर रही है ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :सभापती महोदय, याप्रकरणामध्ये प्रत्यक्षात पैसे घेतले नाहीत. सुरुवातीस 15-20 हजार रुपये खर्च सांगितला. उपचारासाठी आमच्याकडे या. 15-20 हजार रुपयात औषधे देऊ असे आरोपीने सांगितले.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2.......... श्री.सिध्दाराम म्हेत्रे.....

नंतर बिल रु.1.55 लाखाचे केले. या मुलीने 2-3 वर्षापूर्वी हाच अनुभव घेतला होता, त्यामुळे तिला या व्यक्तीचा संशय आल्याने तिने पोलिसांशी संपर्क साधला आणि मग पोलिसांनी संबंधितांना अटक केली.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : आनंदवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील जेटी प्रकल्पाचे काम बंद पडणे

**मु. शी.** : आनंदवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथील जेटी प्रकल्पाचे काम बंद पडणे यासंबंधी श्री परशुराम उपरकर,वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"देशातील पहिलाच पायलट प्रकल्प (आनंदवाडी जेटी प्रकल्प) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात सुमारे ३६ कोटी रुपये खर्चून तयार करण्याच्या कामाचा झालेला शुभारंभ, या प्रकल्पाचे काम माहे जानेवारी, २००८ मध्ये महिनाभर चालू असतांना मध्येच केंद्र शासनाच्या कृषि खात्यातील स्टँडिंग फायनांस कमिटी (एस.एफ.सी.) यांची अंतिम मंजूरी न मिळाल्याने या प्रकल्पाचे काम बंद पडणे, या प्रकल्पाकरिता केंद्र शासनाकडून मिळणारा ५०% हिस्सा अद्यापही राज्य शासनास प्राप्त न होणे, यामुळे कोकणातील महत्वाकांक्षी प्रकल्प बारगळण्याची निर्माण झालेली शक्यता, याबाबत शासनाने ठोस पाऊल उचलून सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करावयाची उपाययोजना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही."

श्री.हसन मुश्रीफ ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील आनंदवाडी प्रकल्पाचा शुभारंभ झाल्यानंतर केंद्र शासनाच्या कृषि खात्यातील स्टँडिंग फायनान्स कमिटीची अंतिम मंजुरी न मिळाल्याने सुरु झालेले काम बंद करण्यात आले. केंद्र शासनाचा 50 टक्के हिस्सा अद्याप प्राप्त झालेला नाही. 1983 साली या प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला त्यावेळी दत्तमंदिर ते देवगड किल्ला अशा कार्यक्षेत्राला सीआयसीएफ. या बंगळुरुमधील भारत सरकारच्या संस्थेकडून मंजूरी मिळाली होती. परंतु ज्यांची घरे व जमिनी या प्रकल्पाच्या बुडित क्षेत्रात येत आहेत त्या मच्छिमारांना कोणतीही सूचना न देता, त्यांना विश्वासात न घेता आराखडयाला मंजुरी देण्यात आली. तेथील 290 मच्छिमारांनी मत्स्यव्यवसाय विकास आयुक्तांकडे या प्रकल्पाच्या आराखडयामध्ये सुधारणा करण्यासंबंधी निवेदन सादर केलेले आहे. त्या निवेदनाप्रमाणे प्रकल्पाच्या आराखडयामध्ये सुधारणा केली जाईल का? ज्यांच्या जमिनी व घरे बुडित क्षेत्रात जाणार आहेत त्यांना कोणताही मोबदला न देता हा प्रकल्प राबविण्यात येत आहे हे खरे आहे काय? संबंधित विस्थापितांना नोटीस दिली जाईल का? केंद्र शासनाचा 50 टक्के हिस्सा प्राप्त झाला आहे का? या प्रकल्पाचे काम सुरु होऊन ते कालांतराने बंद पडले हे खरे आहे काय? 1983 साली आनंदवाडी प्रकल्पाचा दत्तमंदिर ते देवगड किल्ल्यापर्यंतचा आराखडा 2008 मध्ये बदलण्यात आल्यामुळे या प्रकल्पामध्ये ज्यांची खाजगी घरे व जमिनी संपादित होणार आहेत ती घरे व जमिनी वगळण्यात येतील काय? मच्छिमार विस्थापित होणार नाहीत याची काळजी घेण्यात येईल काय? सर्व प्रकारची मंजुरी येण्यापूर्वी घाईघाईने सिंगल टेंडरने प्रकल्पाला कामाला मंजुरी देण्यात आली हे खरे आहे काय?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील आनंदवाडी येथे मत्स्य बंधारा विकसित केला जात आहे. दिनांक 22.7.2007 रोजी या प्रकल्पाच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी 50 टक्के राज्याचा हिस्सा आणि 50 टक्के केंद्र शासनाचा हिस्सा उपलब्ध होणार आहे व त्यानुसार हे बंदर विकसित करावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या मच्छिमारांची पुनर्वसनाबाबत तक्रार आहे असे म्हटले, ती बाब तपासून पाहण्यात येईल आणि मच्छिमारांचे नुकसान होणार नाही अशा पध्दतीने बंदर विकसित केले जाईल. अर्थसहाय्यातून हा प्रकल्प तयार होणार असून त्यामध्ये अंदाजपत्रकीय आराखडा, मॉडेल स्टडी, टीआयएफआरचा स्टडी रिपोर्ट, सीआयसीएफचा फिजिबिलिटी रिपोर्ट, पर्यावरणाची मंजुरी, संयुक्त अंदाजपत्रक, केंद्र

..4..



SGB/ SBT/ KGS/ KTG/ 13:55

शासनाची वित्त मंजुरी या सर्व बाबी मंजूर झाल्या असून रु.2.69 कोटी इतके यावर्षी बजेट निश्चित केले असून पुढील वर्षासाठी रु.10 कोटी प्रस्तावित केले आहेत.

श्री.प्रकाश शेंडगे : या प्रकल्पावर आतापर्यंत किती कोटी रुपये शासनाचे खर्च झाले आहेत?

श्री.हसन मुश्रीफ : या कामाला 22.7.2007 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली असून रु.2.69 कोटी इतके बजेट केलेले आहे.

श्री.परशुराम उपरकर : ठेकेदाराने या प्रकल्पाचे काम सुरु करुन ते बंद केले होते का? त्याचप्रमाणे 2008 मध्ये मच्छिमारांना विश्वासात न घेता या प्रकल्पाचा नवीन आराखडा तयार करण्यात आला आहे का?

श्री.हसन मुश्रीफ : बंदरे विकसित करण्यासाठी जे जे आवश्यक असते त्याची माहिती दिलेली आहे. मच्छिमारांना विश्वासात न घेणे वगैरे अशा ज्या बाबी आहेत त्यासंबंधी मच्छिमारांची अडचण होणार नाही हे लक्षात घेतले जाईल.

----------

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: पर्यावरणाचे संतुलन म्हणून वाघांचे संरक्षण करणे

**मु.शी.**: पर्यावरणाचे संतुलन म्हणून वाघांचे संरक्षण करणे याबाबत सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, शरद रणपिसे, राजन तेली, रणजितसिंह मोहिते-पाटील वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील वाघांच्या संख्येत मोठया प्रमाणावर होत असलेली घट, आजच्या घडीला राज्यात १३८ पैकी केवळ १०३ एवढे वाघ शिल्लक असल्याची बाब १५ फेब्रुवारी, २००८ वा त्यासुमारास निदर्शनास येणे, बोरीवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबटे, वाघ भरकटत ठाण्यापासून विक्रोळी, गोरेगावच्या आधुनिक वसाहतींच्या संकुलात तसेच रहदारीच्या रस्त्यावर येणे, त्यांना दगडांनी मारले जाणे, वाहनांनी उडविले जाणे, एरंडवणा तसेच पिंपरी चिंचवड भागातही वाघ, बिबटे वाट चुकून येणे, वाघांच्या अस्तित्वासाठी संघर्ष सुरु असणे, वाघांचे रक्षण करण्यासाठी केंद्राने राज्याला सूचना करणे, पर्यावरणीय अन्नसाखळीमध्ये वाघांचे अनन्यसाधारण महत्त्व असणे, मात्र वाघांचे प्रमाण कमी होत असल्याने चिंता व्यक्त केली जाणे, पर्यावरणीय अन्नसाखळीचे संतुलन बिघडू नये यासाठी वाघांचे संरक्षण करणे, त्यांची संख्या वाढविणे, याकरीता तातडीने राज्यशासनाने करावयाची उपाययोजना आणि त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री. बबनराव पाचपुते (वन मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती आधीच सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : महोदय, आज सर्वत्र ग्लोबल वॉर्मिंग आणि एन्व्हायर्नमेंटल बॅलन्स मेंटेन करण्यावर चर्चा सुरु आहे. म्हणून याच विषयाशी निगडित "सेव्ह ऑफ द टायगर" संबंधी जे नॅशनल कॅम्पेन झाले त्यासाठी माननीय पंतप्रधानांनी स्वत: पुढाकार घेतला. त्या अनुषंगाने चर्चा उपस्थित करण्याची संधी मला दिल्याबद्दल मी प्रथम आपला आभारी आहे. माननीय वन मंत्री निसर्गप्रेमी आहेत कारण त्यांनी निवेदनाच्या माध्यमातून सविस्तर असे उत्तर दिलेले आहे. या अनुषंगाने मला आणखी तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यातील पहिला प्रश्न म्हणजे पर्यावरणीय अन्न साखळीचे संतुलन बिघडू नये म्हणून वाघांचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांची संख्या वाढविण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणते प्रयत्न केले जात आहेत ? सध्याच्या काळात ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट लँड असलेल्या भागात बिबटयांवर घात ही प्रकरणे खूप वाढलेली आहेत व त्याची दखल शासनाने घेतली आणि प्रयत्न देखील केले आहेत. या अनुषंगाने काही जिल्हे तसेच शहरांच्या भागातही पुनर्वसनाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत पण त्यात राज्यशासनाचा आणि केंद्रशासनाचा वाटा किती आहे ? तसेच राज्यशासनाची याबाबत कोणती भूमिका राहणार आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. देशात एकंदर चर्चेचा विषय कोणता असेल तर तो म्हणजे अस्तित्वात असलेले व्याघ्र प्रकल्प व त्यासंबंधी चिंतेचे वातावरण तयार झालेले आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि वन्यजीव विशेष करुन वाघांच्या संख्येबाबत चिंता होत आहे. वाघ हा जंगलातील सर्वात कळसावरती असलेला उच्च असा प्राणी आहे व त्यानंतर ही साखळी खाली चालत राहते. महाराष्ट्रामध्ये एकूण तीन व्याघ्र प्रकल्प असून ते प्रामुख्याने ताडोबा, पेंच आणि मेळघाट या ठिकाणी आहेत. या तिन्ही प्रकल्पांमधील वन्यजीवांचे संरक्षण, संवर्धन आणि वाढ, अशा तिन्ही बाबतीत केंद्रशासनाने लक्ष केंद्रीत केले आहे. त्यातील ताडोबा प्रकल्पात 6 गांवे, पेंच प्रकल्पाच्या भागात 1 आणि मेळघाट मध्ये 29 अशी एकूण 36 गांवे पुनर्वसित करावयाची आहेत. बाकीच्या सर्व भागात वनात असलेली गांवे बाहेर काढावयाची त्यांची संख्या 174 असून 7779 कुटुंबे आहेत हा प्रश्न वेगळा आहे. या गावांचे पुनर्वसन करुन त्यांना जंगलातून बाहेर काढावे यासंबंधी केंद्रशासनाकडे मदत मागितली असता आतापर्यंत 1 लाख रुपये देण्यात येत होते परंतु शासनाने ही मदत वाढवून देण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठविला होता व ही मदत 10 लाख रुपये करावी अशी

अस्पष्टीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते .........

मागणी केली. त्यानुसार केंद्रशासनाने मान्यता दिलेली आहे. तशा प्रकारचा जी.आर. देखील येत आहे. या ठिकाणी व्याघ्र प्रकल्पातील इतर कामे, ज्यात पाणी साठा, मनोरे वगैरे तयार करणे, त्यानंतर क्षेत्र वाढविणे याचा उल्लेख या प्रस्तावात केला होता. त्यासाठी केंद्रशासनाकडून भरीव मदत करण्यात आली आहे. त्याचबरोबर संरक्षित वन्य आणि बाहेरचे वन्य प्राणी असलेल्या ब्रम्हपुरीसारख्या भागात असलेल्या वाघांवर नियंत्रण व संरक्षण करण्यासाठी सध्या वन्य जीव विभागामार्फत स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ प्रथम श्री. खर्चे...... 14:05

श्री. बबनराव पाचपुते...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बिबटयाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आता बिबटयांच्या संख्येत आता मोठया प्रमाणात वाढ होत आहे. नॅशनल पार्क, नाशिक, अहमदनगर, पुणे या चार जिल्हयात बिबटे मोठया प्रमाणात मानव वस्तीत येत आहेत परंतु त्यांना पकडण्याचे काम जोरात सुरु असून पकडलेल्या बिबटयांना जंगलामध्ये सोडण्याचे काम सुध्दा करण्यात आलेले आहे. साधारणत: गवत खाणारे प्राणी आणि मांस खाणारे प्राणी अशा प्रकारची सायकल असते. परंतु या चार जिल्हयात ऊसाचे क्षेत्र मोठया प्रमाणात वाढलेले असल्यामुळे बिबटया ऊसाच्या क्षेत्रात येतो. तेथे बिबटयाला शिकार करण्यासाठी पाळीव प्राणी, कुत्रे सहजासहजी उपलब्ध होत असतात परंतु हे प्राणी बिबटयाला मिळाले नाही तर तो मानव वस्तीतीत हल्ले करतो. आतापर्यंत आपण 107 बिबटयांना पकडले असून त्यांना जंगलामध्ये देखील सोडण्यात आलेले असून काही बिबटयांना रेस्क्यू सेंटर मध्ये सोडण्याची व्यवस्था कराण्यात आलेली आहे.केंद्रसरकारबरोबर राज्यसरकारने सुध्दा वाटा उचलावा यासाठी राज्यशासनाकडे जरुर मागणी करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, ताडोबा आणि पेंच जंगलात वन रक्षकांची संख्या कमी आहे हे खरे आहे काय? तसेच या ठिकाणी पेट्रोलिंग करण्यासाठी जिप्स्ची संख्या कमी आहे काय? वन रक्षकांची संख्या आपण कृती आराखडया प्रमाणे केलेली नाही. वाघाचे रक्षण करण्यासाठी जेवढा फोर्स पाहिजे तेवढा फोर्स आपल्याकडे नाही.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, वन खात्यामध्ये अनेक वर्षापासून भरती झाली नव्हती परंतु "मे" महिन्यापर्यंत भरतीची सर्व प्रक्रिया पूर्ण होणार आहे. वन्य जिवाला आपण प्राधान्य दिलेले असल्यामुळे वन कर्मचा-यांची संख्या रिक्त राहू नये यासाठी खास प्रयत्न केले जातील. तसेच सन्माननीय सदस्यांनी पेट्रोलिंगसाठी जिप्सची संख्या कमी आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जिप्सच्या संदर्भात या बजेटमध्ये व्यवस्था करण्यात आलेली असल्यामुळे आता वाहने आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकतील. तसेच जप्त केलेली वाहने कोर्टाच्या परवानगीने वन्य जीवनाच्या संरक्षणासाठी वापरण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

--------------

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत अभिन्यास नियमित करणे

**मु. शी.** : नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रातील अनाधिकृत अभिन्यास नियमित करणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, व. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी ( नागपूर विभाग पदविधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर शहरातील नागपूर सुधार प्रन्यास द्वारा संपादित, नागरी जमीन कमाल धारणा विभागाकडून ताबा मिळालेल्या व संपादनाधिन जागेवरील अनधिकृत अभिन्यासातील भुखंडावरील अनधिकृत बांधकामे काढणे सद्य:स्थितीत शक्य नसणे, जर सदर भुखंड नियमित केले नाही तर अनधिकृतपणे विकत घेतलेले भुखंड धारक त्या भुखंडावर वास्तव्य करुन राहतील व यापोटी नागपूर सुधार प्रन्यासला मिळणारा महसूल प्राप्त होणार नाही त्यामुळे सदर भुखंड नियमित करुन द्यावा अशी मागणी भुखंड धारकाने केली असणे, या संदर्भात शहरातील नागरीकांचे सार्वजनिक हित लक्षात घेवून नागपूर सुधार प्रन्यासने दिनांक २२ जून, २००६ रोजी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अनुसार अनधिकृत अभिन्यासातील भुखंडाचे नियमितीकरण करण्यासाठी शासनाकडे शिफारशीसह प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास गेल्या एक वर्षापासून शासनाने मंजूरी दिली नसणे, त्यामुळे शहरातील अनधिकृत अभिन्यासामध्ये राहत असलेल्या नागरीकांवर होत असलेला अन्याय, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व त्यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूर शहराचा गेल्या अनेक वर्षापासूनचा हा प्रलंबित प्रश्न आहे. खरे म्हणजे भुखंड नियमित करण्याचे आदेश काढून सात वर्षे झालेले असून अद्यापपर्यंत सर्व ले-आऊट काही नियमित झालेले नाहीत. या ठिकाणी आरक्षणाची अडचण आहे. त्यामुळे एन.आय.टी..ने तुम्हाला पत्र पाठविणे आणि तुम्ही एन.आय.टी.ला पत्र पाठविणे आणि आपले अंडर सेक्रेटरी आणि डेक्स ऑफिसर एवढाच काय तो पत्रव्यवहार सुरु आहे. खरे म्हणजे तुम्हाला प्रश्न सोडवायचेच नसून खुट्टया मारण्याचे काम चालले आहे. प्रश्न कशा पध्दतीने सोडवायचे नाहीत यासंदर्भात तुमच्याकडे मंत्रालयात वाकबगार लोक आहेत. हे लोक तर माननीय मुख्यमंत्र्यांचे सुध्दा ऐकत नाहीत. त्यामुळे माझी यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, अनाधिकृत ले-आऊटचा प्रश्न सोडविण्याकरिता आपल्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करुन, ले-आऊटचा अभ्यास करुन, एन.आय.टी.ला विश्वासात घेऊन, त्यामध्ये आरक्षणाचे जे काही बदल आहे ते सर्व लक्षात घेऊन हा प्रश्न एक वर्षाच्या आत पूर्णपणे सोडवाल का हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर महानगरपालिकेच्या महापौरांची चर्चा झाली होती. या चर्चेच्या वेळी आपले अधिकारी उपस्थित होते. या अनाधिकृत ले-आऊटमध्ये आमदार, खासदार काम करतात परंतु नगरसेवक आपल्या वार्डात पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल करु शकत नाही किंवा पाईप लाईन्स देखील टाकू शकत नाहीत. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी विचारले की, हा काय प्रकार आहे ? आमदार, खासदार कामे करु शकतात तर नगरसेवकांना का अडवतात? त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, यासंदर्भात ताबडतोब आदेश काढतो. या चर्चेच्या वेळी माननीय मुख्यमंत्री, माननीय मुख्यमंत्र्यांचे सचिव, महापौर तसेच मी सुध्दा उपस्थित होतो. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा ताकदवान येथील डेक्स ऑफिसर आहेत त्यामुळे ते माननीय मुख्यमंत्र्यांचे सुध्दा आदेश पाळत नाहीत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी..

माननीय मुख्यमंत्र्यांनी जो आदेश दिला होता त्याप्रमाणे नगरसेवकांना त्या ठिकाणी काम करण्याचे अधिकार हे अधिवेशन संपण्याच्या आत प्राप्त होतील काय ? सन्माननीय नगर विकास राज्यमंत्री नागपूरच्या अधिवेशनामध्ये नागपूरला उपस्थित होते त्यावेळी एन.आय.टी.बद्दल तक्रारी घेऊन अनेक लोक आपल्याला भेटण्यासाठी येत होते त्यांचा हा त्रास आपण भोगलेला आहे. त्यामुळे आपल्याला या विषयासंबंधीची पूर्ण माहिती आहे. तेव्हा हा प्रश्न सोडविण्यासाठी आपण नागपूरला किंवा मुंबईला एकदा बसून या सर्व लेआऊटसच्या बाबतीत निर्णय घ्यावा.हे फार मोठे प्रकरण असून सर्व लोक कंटाळलेले आहेत. त्या ठिकाणी जवळजवळ 47 हजार प्लॉटस असून 5 लाख लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे.तेव्हा या प्रश्नाबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या ठिकाणी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.तो प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.त्या संदर्भात मी त्यांना एवढेच सांगू इच्छितो की, एका लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून दिनांक 22 जून 2006 रोजी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्या ठिकाणच्या 143 ले आऊटसला राज्य शासनाने मान्यता दिली होती त्यापैकी 53 ले आऊटस आता पर्यंत नियमित करण्यात आलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी : त्या ठिकाणी एकूण 4 हजार प्लॉटस आहेत.

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, त्या ठिकाणी एकूण 3 हजार 593 ले आऊटस असून त्यापैकी आतापर्यंत 1353 वर कार्यवाही झालेली आहेत आणि 2240 ले आऊटसच्या बाबतीत कार्यवाही व्हावयाची आहे. त्यापैकी मार्च 2008 पर्यंत 500 वर कार्यवाही करावी आणि डिसेंबर 2008 पर्यंत उरलेल्या ले आऊटसच्या बाबतीत कार्यवाही करावयाची असे टारगेट ठरवून दिलेले आहे. या बाबतीत मी स्वत: एन.आय.टी.चे सभापती आणि एच.ओ.डी. यांची एक बैठक घेऊन त्यांना हे टारगेट ठरवून दिलेले आहे. त्यामुळे मार्च 2008 पर्यत 500 ले आऊटसच्या बाबतीत कार्यवाही करण्याचे टारगेट पूर्ण केले जाईल व त्यानंतर जे 1740 ले आऊटस राहणार आहेत त्या बाबतीत सुध्दा डिसेंबर 2008 पर्यंत कार्यवाही करण्यात येणार आहे म्हणजे डिसेंबर 2008 पर्यंत

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे .....

हा विषय संपला पाहिजे या दृष्टीकोनातून नगरविकास विभागाच्या वतीने पावले उचलली जात आहेत. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी सांगितले की, या कामासाठी माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करावी. मी त्यांना सांगू इच्छितो की या प्रश्नाच्या बाबतीत मी सातत्याने बैठका घेतल्या आहेत. मी नगरविकास खात्याचा राज्यमंत्री असून सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांची इच्छा असेल तर .......

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, काही बाबी एन.आय.टी.च्या अध्यक्षांच्या अधिकाराच्या बाहेर आहेत. त्या बाबी राज्य शासनाशी संबंधित आहेत. आरक्षण बदलण्याचा विषय हा राज्य सरकारकडे आहे.एन.आय.टी.कडून शिफारस करुन प्रकरण शासनाकडे पाठविले जाईल. परंतु त्या बाबतीत लवकर निर्णय घेतला जाणार नाही. तेव्हा मंत्रालयात बसून माननीय मंत्री महोदयांनी जेव्हा छाननी करुन, प्रकरणांचा अभ्यास करुन प्रश्न सोडविण्याचे ठरविले तरच हे प्रश्न सुटू शकतील .अन्यथा एन.आय.टी.कडून शासनाकडे फक्त पत्रव्यवहार केला जाईल व अहवाल पाठविण्याचे काम केले जाईल .त्यातून प्रश्न सुटणार नाही. म्हणून मी माननीय राज्यमंत्री महोदयांना विनंती केली होती.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांचा विचार मला मान्य आहे. त्यामुळे नागपूरला आणि मुंबईला अशा प्रकारच्या बैठका घेऊन हा प्रश्न 100 टक्के मार्गी लावण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाईल. सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे मी उत्तर दिलेले आहे.सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, त्या ठिकाणच्या अनधिकृत ले आऊटसमध्ये नगरसेवकांना काम करण्याची परवानगी नाही. या बाबतीत मी थोडीशी माहिती घेतली होती. त्यानुसार 176 ले आऊटसच्या ठिकाणी काम झालेले आहेत ते ले आऊटस नागपूर महानगरपालिकेकडे ट्रान्सफर झाले पाहिजे. परंतु नागपूर महानगरपालिका हे ले आऊटस अजून ट्रान्सफर करुन घेत नाहीत.त्या संदर्भात देखील शासनाच्या वतीने त्यांना निदेश दिले जातील की,सगळया पध्दतीने जर हे ले आऊटस विकसीत झालेले असतील तर ते ले आऊटस नागपूर महानगरपालिकेने ट्रान्सफर करुन घेतले पाहिजेत आणि त्यांनी त्यांचा मेन्टेनन्स केला पाहिजे. परंतु अनधिकृत ले आऊटसच्या ठिकाणी नगरसेवकांना बांधकाम करु द्यावयाचे असेल किंवा त्यांचा निधी खर्च करु देण्यास परवानगी द्यावयाची असेल तर त्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना


VTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 14.10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिल्याप्रमाणे त्यासंबंधीची कार्यवाही करण्याच्या बाबतीत विभागाकडून लवकरच आदेश निर्गमित केले जातील..

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या अनधिकृत ले आऊटसचा जन्मदाता नागपूर इम्प्रुव्हमेन्ट ट्रस्ट आहे. त्यांनी गरीब लोकांसाठी स्वस्तात प्लॉटस आणि घरे उपलब्ध करुन दिली असती तर अनधिकृत ले आऊटस तयार झाले नसते . आता चार हजार अनधिकृत ले आऊटस तयार झालेले आहेत परंतु या ट्रस्टच्या भ्रष्ट कारभारामुळे अजून नवीन ले आरुटस तयार होत आहे व हे शहर वाढत आहे तेथील लोकसंख्या वाढत आहे. जर प्लॅन तयार करुन प्लॉटस डेव्हलप केले आणि तेथे गरीब लोकांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन दिली तर अशी वेळ येणार नाही. परंतु या संदर्भात नागपूर इम्प्रुव्हमेन्ट ट्रस्टची कोणतीही योजना नाही. त्यांच्या अर्थसंकल्पात यासाठी कोणतेही व्हिजन नाही. त्यामुळे ग्रीन बेल्टवर चुन्याच्या रेषा मारुन तेथील लोक प्लॉटस विकत आहेत आणि लोकांच्या दबावामुळे हे प्लॉटस नियमित करण्यात यावेत असे आम्ही शासनाला सांगतो. अशा प्रकारे हे शहर वाढत चालले आहे हा प्रकार जर आपल्याला थांबवावयाचा असेल तर एका बाजूला हे ले आऊटस नियमित केले पाहिजेत आणि पुन्हा नव्याने अनधिकृत ले आऊटस होऊ देता कामा नये या दृष्टीने धोरणामध्ये प्लॉटस आणि घरे उपलब्ध करण्यासाठी योजना आखून गरीब माणसांना स्वस्तात घरे उपलब्ध करुन दिली पाहिजेत. मुंबईमध्ये म्हाडा काही प्रमाणात हे काम करीत आहे परंतुं एन.आय.टी.ने मात्र हे काम बंदच केलेले आहे तेव्हा गरीब माणसासाठी, मध्यमवर्गीय माणसासाठी घरे आणि प्लॉट उपलब्ध करुन देण्यासाठी एनआयटीने योजना हातात घेतली तर या लोकांना घरे उपलब्ध होण्याची संधी मिळेल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ...

उलट ती योजना केल्यानंतर तेथे होणाऱ्या इतर योजना असतात त्याही अडवितात. नियमित प्लॉटस् मिळत नाहीत. म्हणून याबाबत आपण एनआयटीला विशेष सूचना देणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एनआयटी ही प्लॅनिंग ॲथॉरिटी म्हणून आपण निर्माण केलेली आहे. म्हणजे नागपूर बाहेरची एरिया साठी ही ॲथॉरिटी करण्यात आलेली आहे. त्यामुळे तेथे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने लेआऊट करून घरे बांधण्याच्या दृष्टीने योजना करण्याच्या सूचना एनआयटीला दिल्या जातील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण यासाठी जी समिती करणार आहात त्या समितीत नागपूरच्या आमदारांना देखील आपण बोलवावे, जेणे करून त्यांच्याही अनुभवाचा आपणास फायदा मिळू शकेल. मात्र हे आपण ताबडतोब करावे. सभागृहामध्ये आश्वासन दिल्यानंतर आता तुमचे अंडर सेक्रेटरी वा डेप्युटी सेक्रेटरी काही हालचाल करतील अन्यथा ते याबाबत काहीच करणार नाही. तुमच्या मंत्रालयात काय चालते याची मला चांगली माहिती आहे म्हणूनच मी हे बोलतो आहे. तुमच्या या अधिकाऱ्यांच्या विरूद्ध तुम्ही काही कारवाई देखील करीत नाही. असो. तेव्हा ही जी समिती आहे तिचे आदेश आपण हे अधिवेशन संपण्यापूर्वी काढणार काय आणि हे अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसात तिची बैठक बोलाविणार का ? माननीय मुख्यमंत्र्यांकडे हे खाते आहे पण त्यांच्याकडे अगोदरच व्याप जास्त आहे त्यामुळे त्यांना याकडे लक्ष देता येऊ शकत नाही. म्हणून आपणच खात्याचे राज्यमंत्री म्हणून याबाबत लक्ष घालावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या सूचनांच्या बाबतीत कोणीही अंडर सेक्रेटरी, डेप्युटी सेक्रेटरी कोठलेही गडबडीचे काम करीत नाही आणि तशा पद्धतीने त्यांनी कोणी केले तर ते निश्चितपणे खपवून घेतले जाणार नाही हे मी मुद्दामहून सांगू इच्छितो. आता या ठिकाणी ज्या पद्धतीने सन्माननीय सदयांनी अपेक्षा व्यक्त केली त्या समितीच्या संदर्भात हे अधिवेशन संपण्यापूर्वी आदेश निर्गमित केले जातील आणि सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणेच अधिवेशन संपल्यानंतर लवकरच समितीची बैठकदेखील घेतली जाईल.

. . . BB 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, अनधिकृत ले आउट को अधिकृत करने का कार्यक्रम यहां पर माननीय मंत्री महोदय ने बताया है. पहले वे लोग अनधिकृत रुप से कब्जा करें और फिर हम उसको नियमित करने की प्रोसस करें, यह बात ठीक नहीं है. इसलिए मैं उनसे सिर्फ एक बात पूछना चाहता हूँ कि क्या एन.आई.टी. या महानगरपालिका के अन्तर्गत गरीबों को प्लॉट देने की कोई योजना है ? मंत्री महोदय ने एक कमेटी बनाने के बारे में कहा है. क्या इस कमेटी में स्थानीय आमदारों को शामिल किया जाएगा ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले आहेत. त्यामध्ये आज प्लॉट अलोटमेंट नव्याने करण्याच्या दृष्टीने आज योजना नसली तरी ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अशी योजना यापूर्वी होती. इकॉनॉमिकली विकर सेक्शनसाठी म्हणजेच कामगारांसाठी, ज्यांच्याजवळ जमीन नाही त्यांच्यासाठी ही योजना होती. परंतु नंतर एनआयटी ही पूर्णत: व्यापारी संस्था बनली. खरे तर एनआयटीचा उपयोग हा गरीब माणसाला, घर नसणाऱ्याला, भूमिहीनाला झाला पाहिजे. त्या दृष्टीनेच पूर्वी योजना होती पण ती नंतर बंद केली. आता एनआयटी केवळ प्लॉटस्‌चा लिलाव करते. तेही ते बरोबर करीत नाही. मागे यासंबंधात बेडगे समिती स्थापन केली होती. त्यानंतर याबाबत कोणीही लक्ष घातले नाही. म्हणून माझी विनंती आहे की, एनआयटीला आपण सूचना द्याव्यात की, त्यांनी गरीब, घरे नसणाऱ्या माणसांसाठी योजना करावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी मी तेच सांगत होतो. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी आणि श्री.सय्यद जामा यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मला सांगावयाचे आहे की, आज रेग्युलरायझेशनचे काम एनआयटीच्या माध्यमातून केले जाते आणि ते मोठे काम आहे. शेवटी या एनआयटीचे काम हे प्लॅनिंग करणे आहे. त्यातून गरीब आणि गरजू माणसांना घरे उपलब्ध झाली पाहिजेत या दृष्टिकोनातून नव्याने प्लॅनिंग करून भूखंड निर्माण करून नवी योजना आखण्यासाठी एनआयटीला सूचना देण्यात येतील. तसेच स्थानिक आमदारांना विश्वासात घेऊन त्याबाबतचे नियोजन केले जाईल.

***

( यानंतर श्री.सरफरे ....बीबी 1 ...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ.शी.**: राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील रोजंदारीवरील शेकडो कामगारांना कामावरुन कमी करणे

**मु.शी.**: राहूरी (जि.अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शेकडो रोजंदारी कामगारांना कामावरुन कमी करणे याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"सभापती महोदय, राहुरी (जिल्हा अहमदनगर) येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठातील शेकडो रोजंदारीवरील कामगारांना कामावरुन कमी करण्यात आले आहे. कृषी विद्यापीठांवरील संपूर्ण नियंत्रण शासनामार्फत होते. शासनाने 2001 मध्ये महाराष्ट्रातील तीनही कृषी विद्यापीठामधील जमीन अतिरिक्त झाली म्हणून 7444 कामगारांची सक्तीने कपात केली. त्याप्रमाणे राहूरी कृषी विद्यापीठातील कामगारांना कमी करण्यात आले आहे. याबद्दल मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, पंजाबराव कृषी विद्यापीठ अकोला, आणि कोकण कृषी विद्यापीठ या तिन्ही कृषी विद्यापीठांमध्ये रोजंदारी आस्थापनेवर रिट्रेंच केलेल्या मजुरांना पुन्हा कामावर घेतले आहे. परंतु राहुरी कृषी विद्यापीठातील रोजंदारीवरील कामगारांना रोजंदारी आस्थापनेवर नियमितपणे व सेवा ज्येष्ठतेनुसार कामे दिलेली नाहीत. आणि म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे मी आपले लक्ष वेधत आहे."

सभापती महोदय, आमची अपेक्षा आहे की, या विशेष उल्लेखांना शासनाकडून अनुल्लेखाने मारले जात आहे. शासनाकडून आम्हाला लेखी उत्तर दिले जात नाही आणि कोणतीही कारवाई देखील होत नाही.

**उपसभापती** : आपण याबाबत मागणी करण्याची काहीही गरज नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी विशेष उल्लेखासंबंधी माझे मत मांडले आहे. हीच व्यथा सर्व माननीय सदस्यांची देखील आहे...

**उपसभापती** : हा विषय आपण दरवेळी उपस्थित करीत असतो....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मी विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत उदाहरण देतो. मी कामगार खात्याबाबत निरनिराळया अधिवेशनामध्ये आतापर्यंत तीन विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या आहेत. परंतु त्याबाबत शासनाकडून उल्लेख करण्यात आलेला नाही आणि उत्तरही देण्यात आले नाही.

**उपसभापती** : शासन अधिक उदासीन असेल तर आपण विशेष उल्लेखाची सूचना मांडू नका.

श्री. मधुकर सरपोतदार : मी आपणास कामगार खात्याचे उदाहरण देतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विशेष उल्लेखाची सूचना मांडू नका असे आपले मत आमच्यावर अन्याय करणारे आहे. ज्यावेळी लोक आमच्याकडे प्रश्न मांडतात त्यावेळी ते या सभागृहामध्ये मांडणे हा आमचा अधिकार आहे. हा आमच्या संरक्षणाचा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या सर्वोच्च स्थानावरुन आम्ही आपणाकडे संरक्षण मागत असतांना आपली हतबलता पाहिली आणि आम्हाला खूप दु:ख झाले...

**उपसभापती** : ही वाक्ये वारंवार ऐकून मी सुध्दा हैराण झालो आहे...

श्री. दिवाकर रावते : आपण जर असे हतबल होणार असाल तर सध्याच्या परिस्थितीत हे सरकार काय करु शकेल हे सांगता येत नाही....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आपण सर्वोच्च अशा स्थानावर बसलेले आहात. या सार्वभौम सभागृहाचे आपण सभापती म्हणून त्या स्थानावर बसलेले असतांना आपण हतबल होऊ शकत नाही. कामकाज करण्याच्या पध्दतीमध्ये काही कमी जास्त होत असेल परंतु आपण ज्या दिवशी हतबल व्हाल त्या दिवशी या सभागृहाचे कामकाज संपले असे मी मानेन.. त्यामुळे आपण कोणत्याही प्रकारे हतबल होता कामा नये. अशी या सभागृहाची शेवटपर्यंत भूमिका राहील.

श्री. नितीन गडकरी : ही भूमिका माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांची आहे, राष्ट्रवादी कॉंग्रेसची नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मी कोणत्याही वादामध्ये जाऊ इच्छित नाही...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. हे विधीमंडळाचे अधिवेशन सुरु झाल्यापासून अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. आजपर्यंत कधीही घडले नाही असे या सदनामध्ये

अस्सुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

DGS/ KGS/

श्री. दिवाकर रावते....

घडले आहे. माननीय सदस्य श्री. गुरुनाथजी कुलकर्णी आपणास सांगू इच्छितो की, काल या ठिकाणी पीठासीन अधिकाऱ्यांची हतबलता होती. काल सभागृहामध्ये आम्ही मौन स्वीकारले असतांना त्याचा परिणाम असा झाला की, काल सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे कुणीही सदस्य ऑब्जेक्शन घेण्यास तयार नाही. सभागृह स्थगित करण्याबाबत कुणीही मागणी करावयास तयार नाही. कुणीही याबाबत माननीय सभापतींना विचारावयास तयार नाही. अशापरिस्थितीत सात मिनिटे स्मशान शांतता कशी असते ती या सदनाने अनुभवली आहे. काल कुणीही मागणी करु शकत नाही आणि माननीय सभापती निर्णय देऊ शकत नाही अशी दुर्दैवी ऐतिहासिक घटना घडली. इतिहास चांगल्या गोष्टींकरिता घडतो. परंतु माननीय सभापतींची हतबलता या सदनाने काल अनुभवली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:25

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हे प्रश्न राखून ठेवावा म्हणून आकांडतांडव करतात ? हा या सदनाचा विषाद आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय . . . .

श्री.दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आधी मला बोलू द्यावे. मग सन्माननीय सदस्यांनी बोलावे. तुम्हाला काय उत्तर द्यावयाचे असे ते द्यावे. तुम्हाला काय वकिली करावयाची आहे ती करा. पण मला अगोदर बोलू द्यावे. मग तुम्ही उत्तर द्यावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मध्येच उठून कशासाठी बोलत आहेत ? नंतर त्यांनी काय ते उत्तर द्यावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्यांना वकीलपत्र दिलेले आहे काय ? हा राष्ट्रवादी पक्षाचा प्रश्न आहे काय ? हा राष्ट्रवादी पक्षाचा प्रश्न नाही. हे बरोबर नाही.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी शांतता पाळावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे बरोबर नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांना शासनाकडून उत्तर देण्यात यावे असे आपण शासनाला सांगावे एवढीच आमची कळकळीची विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

. . . .2डी-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शाळेला जोडून असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र प्राचार्य देण्याबाबत

मु.शी.: शाळेला जोडून असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र प्राचार्य देण्याबाबत श्री.विक्रम काळे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये मोठया प्रमाणात कनिष्ठ महाविद्यालये ही खाजगी शिक्षण संस्थांमार्फत चालविली जातात. शासकीय कनिष्ठ महाविद्यालये ही अत्यंत कमी आहेत. त्यांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यातच ही कनिष्ठ महाविद्यालये ही माध्यमिक शाळांना जोडून आहेत. म्हणजे जेथे इयत्ता 5 वी ते 10 वी चे वर्ग आहेत. त्याठिकाणी इयत्ता 5 वी ते 12 वी पर्यंत एकच मुख्याध्यापक हे प्राचार्य म्हणून काम पाहतात. बऱ्याच ठिकाणी इयत्ता 11 वी व 12 वीची विद्यार्थी संख्या मोठी असते. तिथे शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा जास्त असते. अशा ठिकाणी मुख्याध्यापक प्राचार्य हे फक्त शाळेचे कामकाज पाहतात. त्यांना इयत्ता 11 वी व 12 वीचे कामकाम जे जास्तीचे वाटते. ते त्याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे तिथले सर्व कार्यालयीन कामकाज हे तिथल्या एका इयत्ता 11 वी व 12 वी च्या वर्गाला शिकविणाऱ्या ज्येष्ठ शिक्षकाला करावे लागते. तेव्हा अशा जास्त विद्यार्थी संख्या असलेल्या व शाळेला जोडून असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयांना स्वतंत्र प्राचार्य द्यावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडत आहे. धन्यवाद.

----

. . . .2 डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शासनाने सुपारी पिकावर हेक्टरी जादा आकारणी
करुन उत्पादकांवर केलेला अन्याय

मु.शी.: शासनाने सुपारी पिकावर हेक्टरी जादा आकारणी
करुन उत्पादकांवर केलेला अन्याय याबाबत
श्री.संजय केळकर,वि.प.स.यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, शासनाने राज्यातील सुपारी उत्पादकावर लावलेला शिक्षण व रोजगार हमी कर अन्यायकारक असल्याची शासनाची खात्री पटल्याने गेल्या वर्षी डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये हा उपकर रद्द करण्यात आला होता. यामुळे नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या सुपारी उत्पादकांना दिलासा मिळाला होता. परंतु शासनाने पुन्हा सुपारी उत्पादकांना सन 1985 पासूनच्या उपकराच्या थकबाकी वसुलीच्या नोटीस दिल्याने सुपारी उत्पादकात प्रचंड असंतोष पसरला आहे. सुपारी हे केळी किंवा ऊसासारखे सलग पट्टयात घेण्यात येणारे पीक नाही. तसेच सुपारीची लागवड केल्या नंतर सुमारे 10 ते 15 वर्षानंतर येणारे अल्पसे उत्पन्न, त्यामुळे शिक्षण व रोजगार हमी कर लावताना ऊस व कापूस हया नगदी पिकाबरोबर तुलना करुन दरवर्षी रोख पैसे देणाऱ्या नगदी पिकापेक्षा लागवडीनंतर 15 वर्षांनी अल्पसे उत्पन्न हातात येणाऱ्या पिकावर हेक्टरी जादा आकारणी शासनाने करणे हेच मुळी अन्यायकारक आहे.सुपारी उत्पादकात निर्माण झालेला असंतोष शासनास कळावा यासाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. त्यामुळे आपण मला हा विशेष उल्लेख सादर करण्यासाठी परवानगी द्यावी अशी विनंती आहे. धन्यवाद.

-----

. . . .2डी-4



पृ.शी.: शिक्षण सेवकांना पूर्वीची निवृत्ती योजना लागू करण्याच्या

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

निर्णयाची अंमलबजावणी न होणे

मु.शी.: शिक्षण सेवकांना पूर्वीची निवृत्ती योजना लागू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"1 नोव्हेंबर 2005 नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना शासनाने अंशदायी पेन्शन योजना लागू केली असून तत्पूर्वी सेवेत आलेल्यांना ही योजना लागू नाही असे शासनाने मान्य करुनही जी.आर.न काढल्याने अंमलबजावणीस येणाऱ्या अडचणी."

सभापती महोदय, शासकीय आणि निम शासकीय कर्मचाऱ्यांसाठी अंशदायी पेन्शन योजना सुरु केलेली आहे. या संदर्भात 2007 च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित करण्यात आली होती. जे कर्मचारी 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी नियमित कर्मचारी किंवा शिक्षण सेवक म्हणून सेवेत आलेले आहेत, त्यांना ही अंशदायी पेन्शन योजना लागू रहाणार नाही. 1 नोव्हेंबर 2005 पूर्वी ते सेवेमध्ये आलेले असले आणि 2005 नंतर जरी ते नियमित झालेले असले तरी सुध्दा त्यांना पूर्वीचीच 1982 ची निवृत्ती वेतन योजना लागू राहील अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आले होते. त्या संदर्भात शासनाने मला लेखी स्वरुपामध्ये एक पत्र दिलेले आहे. तथापि आज राज्यामध्ये 2005 पूर्वी लागलेले हजारो शिक्षण सेवक असून ते नंतर नियमित झालेले, कायम झालेले, वेतनश्रेणीमध्ये आलेले आहेत, त्यांना अद्यापही ही पेन्शन योजना लागू करण्यात आलेली नाही. त्यांना भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्यासही परवानगी देण्यात आलेली नाही. म्हणून या संदर्भात शासनाने तातडीने जी.आर.काढणे आणि या सर्व कर्मचाऱ्यांना पूर्वीचीच पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना माहिती देणे, निर्देश देणे गरजेचे आहे. म्हणून मी आपल्या अनुमतीने या विषयाच्या संदर्भात येथे विशेष उल्लेख मांडत आहे. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.बरवड . . . .



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई, ठाणेसह राज्यातील ठिकठिकाणच्या वन जमिनी शासनाने ताब्यात घेण्याबाबत माननीय उच्च न्यायालयाने दिलेला आदेश

**मु. शी.** : मुंबई, ठाणेसह राज्यातील ठिकठिकाणच्या वन जमिनी शासनाने ताब्यात घेण्याबाबत माननीय उच्च न्यायालयाने दिलेला आदेश याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" मुंबई, ठाणेसह राज्यातील ठिकठिकाणी 2006 साली राज्य सरकारने खाजगी वनसंपदा कायदा कलम 35 च्या नोटिसा सदर खाजगी वन जमिनी ताब्यात घेण्यासाठी दिल्या होत्या. त्यानंतर दि. 24.3.2008 रोजी मा. उच्च न्यायालयाने सदर जागा ताब्यात घेण्याबाबत आदेश दिलेला आहे. परिणामी मुंबई, ठाणे परिसरातील घोडबंदर, बोरिवली, नाहूर, भांडूप परिसरातील सुमारे दीड लाख रहिवाशांवर टांगती तलवार आहे. खाजगी बिल्डरने बांधलेल्या येथील इमारतीतील घरे आयुष्याची पुंजी लावून व कर्ज घेऊन लाखोच्या किमतीला घेतलेली आहेत. परिणामी त्यांचे जीवन उद्‌ध्वस्त झाल्याची भावना त्यांच्यात निर्माण झाली आहे. न्यायालयाच्या निर्णयाने भयग्रस्त झालेल्या जनतेला सहानुभूतीपूर्वक भूमिका घेऊन संरक्षण देण्याची व त्यासाठी मा. उच्च न्यायालयात आवश्यक ते निवेदन करण्याची आणि योग्य ती पावले उचलण्याची गरज आहे. या महत्वाच्या विषयाबाबत मी विशेष उल्लेख करीत आहे."

सभापती महोदय, हा विषय शासनाने गांभीर्याने घेण्याबाबत आपण शासनाला सूचना द्याव्यात अशी मी आपणास विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय वन मंत्री श्री. बबनराव पाचपुते यांना सांगू इच्छितो की, हायकोर्टाचा जो निर्णय लागलेला आहे त्याचा निश्चितपणे गांभीर्याने विचार करावा लागेल. याचे कारण असे की, मध्यमवर्गीय लोकांनी त्या ठिकाणी घरे घेतलेली आहेत. वन खात्याच्या मनात आले आणि एका फटक्यात निर्णय घेतला आणि कारण नसताना त्याचा फटका नागरिकांना बसलेला आहे. कोर्टाला देखील याबाबत अवगत करावयास पाहिजे, नाही तर लोक आत्महत्या करतील. शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या तशा मध्यमवर्गीयांच्या आत्महत्या होतील.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, कोर्टाचा निकाल कालच लागलेला आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, याबाबतीत लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

**सभापती** : याबाबतीत शासनाने तातडीने कारवाई करावी.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, या ठिकाणी जो विशेष उल्लेख केलेला आहे त्याची नोंद घेतलेली आहे. यासंदर्भात काय करावयाचे ते लवकरच ठरविले जाईल.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : तलवाडा (जि.बीड) गावात खांबावरुन विजेच्या तारा लोंबकळत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला निर्माण झालेला धोका.

**मु. शी.** : तलवाडा (जि.बीड) गावात खांबावरुन विजेच्या तारा लोंबकळत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला निर्माण झालेला धोका याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

" तलवाडा (जि.बीड) गावात विजेचे खांब बसविलेल्या घटनेला 45 ते 50 वर्षे झाली असून अद्याप सदर गावास करण्यात येत असलेला विद्युत पुरवठा सदर खांबावरुन करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर खांब हे मध्य भागातून वाकलेले असून सदर खांबावरील तारांच्या घर्षणाने ठिणग्या पडणे, तारा तुटण्याचे प्रकार घडणे, जिल्हा परिषदेच्या शाळेसमोरच तारा लोंबकळत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. याबाबत वीज वितरण कंपनीतील अधिकारी कर्मचारी यांचेकडे सातत्याने तक्रारी करुन तारा बदलण्याबाबत अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करणे, याबाबत चौकशी करुन उक्त प्रकरणी तातडीने करावची कार्यवाही व उपाययोजना या बाबत हा विशेष उल्लेख करीत आहे"

----

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

**पृ. शी.** : दि. 18 मार्च, 2008 रोजी मांडवा येथून "गेट वे ऑफ इंडियाकडे" येणाऱ्या लाँचचा शाफ्ट तुटल्याने भर समुद्रात लाँच बंद पडणे

**मु. शी.** : दि. 18 मार्च, 2008 रोजी मांडवा येथून "गेट वे ऑफ इंडियाकडे" येणाऱ्या लाँचचा शाफ्ट तुटल्याने भर समुद्रात लाँच बंद पडणे याबाबत श्री. अरविंद सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री. अरविंद सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. अरविंद सावंत ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" दि. 18.3.2008 रोजी मांडवा येथून "गेट वे ऑफ इंडियाकडे" येणाऱ्या लाँचचा शाफ्ट तुटल्याने भर समुद्रात लाँच बंद पडली, यामुळे यातील प्रवाशांमध्ये घबराट पसरली. यापूर्वीही अनेकदा अशा प्रकारे प्रवासी वाहतूक करणाऱ्या लाँचचे सर्वेक्षण न करताच नेत असल्याने त्यातील प्रवाशांच्या जीवावर बेतणे, या लाँचचे सर्वेक्षण घाईगडबडीत व अर्थपूर्ण व्यवहार करुन करीत असल्याने अशा प्रकारच्या घटना घडतात. तरी शासनाने याबाबत कडक उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने निवेदन करावे"

सभापती महोदय, भारताच्या मुंबईतील प्रवेशव्दारावरुन रोज मांडव्याला लाँचेस जात असतात. या लाँचच्या बाबतीत मध्यंतरी एक प्रकरण असे घडले की, दुपारी 3.15 वाजता मुंबईहून सुटलेली लाँच भर समुद्रात अडकली. लाँच समुद्रात अडकल्यानंतर अनेक प्रवाशांची घाबरगुंडी उडाली. हा विषय फार गंभीर आहे. मुंबईहून अनेक लाँचेस रोज रेवस, मांडवा येथे जात असतात. या लाँचेसचे सर्वेक्षण होत नाही. जसे गाड्यांचे सर्टिफिकेशन होते तसे त्यांचे सर्टिफिकेशन होत नाही. अडकलेले प्रवासी एकदम घाबरले. सायंकाळी 5.15 वाजता दुसरी लाँच गेली आणि त्या प्रवाशांची सुटका करण्यात आली. अजंठा लाँच सर्व्हिसच्या लाँचेस गेल्या वर्षभरात 16 वेळा मुंबईच्या भर समुद्रात अडकल्या आणि अनेकवेळा प्रवाशांची घाबरगुंडी उडाली.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

यापूर्वी समुद्रामध्ये रामदास बोट बुडालेली आहे, त्याची प्रवाशांना आठवण होते. एखादा अपघात घडल्यानंतर शासनाकडून कार्यवाही सुरु होण्यापेक्षा शासनाने तातडीने लक्ष घालावे. सुर्दैवाने माननीय मंत्रिमहोदयांनी यासंबंधी एक बैठक घेतलेली आहे. परंतु त्या बैठकीनंतरही सुधारणा झ ाली नाही असे लोकांचे म्हणणे आहे. म्हणून मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधले आहे. आपण मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास परवानगी दिल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/

**पृ.शी.**: मौजे रामघाट (जि.गोंदिया) येथे अवैध खडी उत्खनन करताना खाण खचण्याने एका व्यक्तीचा दबून झालेला मृत्यू

**मु.शी.**: मौजे रामघाट (जि.गोंदिया) येथे अवैध खडी उत्खनन करताना खाण खचण्याने एका व्यक्तीचा दबून झालेला मृत्यू याबाबत श्री.केशवराव मानकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

'गोंदिया जिल्हयातील मोरगांव अर्जुनी तालुक्यात मौजा रामघाट (निलज) येथे दि.17.3.2008 रोजी अवैध खडी उत्खनन करताना यशवंत ढेलू मेश्राम याचा खाण खचण्याने दबून झालेला मृत्यू, सदर खोदकामास अधिकृत मान्यता नसणे, तरी बेकायदेशीरपणे खोदकाम सर्रास चालू असूनही त्याकडे शासनाचे वारंवार होणारे दुर्लक्ष, त्यामुळे परिसरात अशाप्रकारे होणारी अवैध खोदकामाची प्रकरणे आणि त्यामुळे परिसरातील अनेक नागरिकांवर खाणीत दबून मृत्यू ओढवण्याची शक्यता व त्यामुळे परिसरात पसरलेली दहशत लक्षात घेता शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.' या घटनेमध्ये यशवंत ढेलू मेश्राम या व्यक्तीचा मृत्यू झाल्यामुळे शासनाने त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याची आवश्यकता आहे, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

--------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शहापूर तालुक्यात निकृष्ट दर्जाचे काँक्रीटचे बांधलेले बंधारे

**मु.शी.**: शहापूर तालुक्यात निकृष्ट दर्जाचे काँक्रीटचे बांधलेले बंधारे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील डोळखांब परिसरात रानविहिर व हिंगळुद हद्दीत आदिवासी योजनेंतर्गत वन विभागाने दोन काँक्रीट बंधारे बांधले आहेत व त्यासाठी शासनाने रु.10 लाख खर्च केला आहे. परंतु बंधारे बांधताना काँक्रीटीकरण करताना डांबराचा जास्तीत जास्त व सिमेंटचा कमीत कमी वापर केल्याने सर्व कामच एकदम निकृष्ट दर्जाचे होऊन बंधा-यातून पाणी पूर्णपणे झिरपत आहे. त्यात पाणी टिकतच नाही. शासनाच्या नियमानुसार मृदसंधारण व जलसंधारणाच्या बंधा-यातील पाण्याचा वापर शेतीसाठी होणार नसल्याने व सततच्या झिरपण्यामुळे सदर पाण्याचा पिण्यासाठीही उपयोग होणार नसल्याने शासनाचे रु.10 लाख निकृष्ट दर्जाच्या कामामुळे वाया गेलेले आहेत. याबाबत वन विभागाकडे लेखी चौकशीची मागणी करुनही काहीही उपयोग झालेला नाही म्हणून शासनाचे जे रु.10 लाख वाया गेले आहेत त्याची दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून चौकशी होऊन शासनाचा वाया गेलेला पैसा गैरव्यवहार करणा-याकडून वसूल व्हावा म्हणून सदरची बाब विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणत आहे."

------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी त्यावर बांधण्यात येण्या-या बांधकामास महापालिकेने आळा घालण्याबाबत

**मु. शी.** : पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी त्यावर बांधण्यात येण्या-या बांधकामास महापालिकेने आळा घालण्याबाबत

श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी ए□ विशेष उल्ले□ची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूचन्रा मांडतो.

"जमिनीखालील पाण्याची पातळी वेगाने खाली जात असताना तलाव, नद्या असे नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवणे, शासनाला आवश्यक आहे. मुंबइतील मालाड येथील शांताराम तलाव बुजविण्यात आला. त्याचबरोबर चारकोप येथील तलावही बुजविण्याचे प्रयत्न चालू आहेत व आता मालवणीतील अली तलाव बुजवून तेथे इमारत बांधण्याचे बिल्डर प्रयत्न करीत आहेत. शहरात विविध ठिकाणी टॉवर उभारण्याचे काम सुरु असल्याने तेथील रॅबीट अली तलाव बुजविण्याकरिता वापरण्यात येत आहे. अली तलावाचा परिसर सुमारे चारशे एकराचा असून काही ठिकाणी तलावाच्या जागेवर बंगले उभे करण्यात येत आहेत. तलाव बुजवण्याच्या या कारवायामुळे तलाव पूर्णपणे बुजत चालला आहे. यावर महानगरपालिकेचे संबंधित खात्याचे अधिकारीही डोळेझाक करीत आहेत.

सभापती महोदय, मालाड येथील मालवणी परिसरातील अली तलावात अनधिकृतरित्या भरणी केली जात असून, तो अतिक्रमणाच्या विळख्यात सापडला आहे. भरणी केलेली तलावाची आणि आसपासची जागा परस्पर कोटयवधी रुपयांना बेकायदेशीररित्या विकली जात असून, या रॅकेटकडे सरकारी यंत्रणेचे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. बेकायदेशीर भरणी करणारे ट्रक अहोरात्र ये-जा करीत असताना त्यांना कुणीही अटकाव करीत नाही. झोपडीदादा

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

जागा बळकावत असताना त्यांना कुणीही अडवत नसल्याचे दिसून येते. बळकावलेल्या जागेची भूमाफिया आपापसात खरेदी-विक्री करीत असून, हे व्यवहार कोटयवधीच्या घरात होत आहेत. कोणताही कागदोपत्री व्यवहार नसताना गुंडांना जागेवर ठेवून भूखंडांचा ताबा घेतला जात आहे. अली तलावाची छायाचित्रकार दत्ता खेडेकर यांना भूमाफियांच्या गुंडांनी धक्काबुक्की करीत त्यांचा कॅमेराही हिसकावून घेतला. या जागेचे मालक मेलरॉय ग्रेसेस असून, आम्ही त्याची माणसे आहोत. त्यांची भेट घेऊनच कॅमेरा परत घ्या, असे सांगत हातपाय तोडण्याची धमकीही दिली. ही धक्काबुक्की पाहून स्थानिक रहिवाशांनी पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला फोन केला.

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण ....

त्यामुळे काही वेळातच तेथे पोलीस व्हॅन पोहोचल्याने कॅमेरा टाकून गुंडांनी पलायन केले. अतिक्रमणात एका नगरसेवकाचा हात असल्याचे स्थानिक रहिवाशांकडून सांगण्यात येते. सरकारी जागा बळकावून त्या कोटयवधी रुपयांना विकणा-या नगरसेवकाविरुध्द अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असून त्याचा मुलगा अतिक्रमणासाठी दहशत पसरवित असल्याचे सांगण्यात येते. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>वस्तीशाळेसंबंधी निवेदन करण्याबाबत</u>**

**उपसभापती** : वस्तीशाळेसंबधी शासनाने आज सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन करावे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.40 ते 3.15 मध्यंतर)

------

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ 15:15

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**मु.शी.**: सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

**उपसभापती** : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेस प्रारंभ होईल. ही चर्चा दिनांक 25 व 26 मार्च, 2008 अशी एकूण दोन दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षांच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व अपक्ष सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या पक्ष प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी.

सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेस सुरुवात करावी.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेस मी सुरुवात करीत आहे. या राज्याचे अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी सलग दहा वर्षे या राज्याचा अर्थसंकल्प मांडून महाराष्ट्रात आपले कौतूक होईल, आपली वाहवा होईल अशी कदाचित त्यांची अपेक्षा असेल. एखाद्या शाळकरी मुलास गेल्या दहा वर्षाच्या अर्थसंकल्पांचे वाचन करावयास सांगून त्याला विचारले की, या अर्थसंकल्पामध्ये अर्थसंकल्पासारखे काय आहे हे शोधून काढ. त्याने ते अर्थसंकल्प वाचले तर त्यात 70 टक्के गोष्टी त्याच त्याच त्याच्या निदर्शनास येतील. सभापती महोदय, मला आठवते की, 22 मार्च, 1999 रोजी निवडणुकीपूर्वी माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडला होता. त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की, " सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं है. मेरी कोशिश है कि सूरत बदलनी चाहिए ". माननीय अर्थमंत्र्यांनी गेली दहा वर्षे अर्थसंकल्प मांडून महाराष्ट्रातील लोकांचे कसे मनोरंजन केले आहे हे मी सांगणार आहे. माननीय अर्थमंत्री श्री.जयंत पाटील यांनी 22 मार्च, 1999 रोजी निवडणुकीपूर्वी अर्थसंकल्प मांडला होता, त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की,...

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ 15:20

श्री. नितीन गडकरी ...

सभापती महोदय, या सरकारने काय केले ? " सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं है. मेरी कोशिश है कि सूरत बदलनी चाहिए ".ऐसा तत्कालीन वित्त मंत्री जी ने कहा था. मैं उनके इस वक्तव्य के बारे में यह कहना चाहूंगा कि, " उनकी कोशिश यह नहीं है कि सूरत बदलनी चाहिए. बल्कि हंगामा खड़ा करना उनका काम है." या सरकारने आपल्या कृतीतून हे सिध्द करुन दाखविले आहे. ज्यावेळी भाजप-सेना युती राज्यामध्ये सत्तेवर आली त्यावेळी राज्यावर साडेसोळा हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. ज्यावेळी युतीने सत्ता सोडली त्यावेळी राज्यावर 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. आमची सत्ता गेल्यानंतर काँग्रेसवाले गावागावात फिरले आणि युती शासनाने महाराष्ट्राला कर्जबाजारी केले असे सांगत सुटले. महाराष्ट्राचे दिवाळे पिटले,महाराष्ट्राची विश्वसनीयता समाप्त केली असे ताला-सुरात सगळे मंत्री भाषणे करीत होते. राज्याला कर्जबाजारी केले असे भाषणातून वारंवार सांगत होते. युती शासनाने राज्याचा विकास केला. राज्यामध्ये सिंचन प्रकल्प उभे केले. पूल बांधले, रस्ते बांधले. वरळी-वांद्रे सागरी पुलाचे आघाडी शासन सारखे कौतुक करीत आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी गेल्या 7 वर्षात आघाडी शासनाने काय केले ? बांधकाम मंत्री श्री. अनिल देशमुख हे लोखंडी टोपी घालून फिरतात आणि फोटो काढतात. खरे म्हणजे या पुलाचा जन्मदाता मी आहे. योजना आमच्या शासनाने तयार केली. आमच्या शासनाने ही योजना राबविण्यास सुरुवात केली. त्याबद्दल आघाडी शासन काही बोलत नाही. 420 कोटी रुपयांची ही योजना आम्ही सुरु केली. शिवसेनाप्रमुखांच्या हस्ते 1999 मध्ये याप्रकल्पाचे भूमीपूजन केले. 420 कोटी रुपयांना कंत्राट दिले. आघाडी शासनाने या प्रकल्पाची किंमत 1600 कोटी रुपयांवर नेली. असे हे कार्यक्षम सरकार आहे. म्हणजे ज्या प्रकल्पाचे काम 420 कोटी रुपयात पूर्ण झाले असते त्या प्रकल्पाचे काम आता 1600 कोटी रुपयात देखील पूर्ण झालेले नाही. गेल्या 5 अर्थसंकल्पात आमचे सरकार वरळी-वांद्रे सागरी पूल लवकरच पूर्ण करणार आहे याचा उल्लेख करीत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात देखील याचा उल्लेख असतो. 420 कोटी रुपयांचा प्रकल्प 1600 कोटी रुपयांवर गेला म्हणजे महाराष्ट्राच्या जनतेवर या आघाडी शासनाने 1200 कोटी रुपयांचा भुर्दंड टाकलेला आहे. अजूनही प्रकल्प पूर्ण होईल किंवा नाही याचा पत्ता नाही. या खात्याचे मंत्री श्री. अनिल देशमुख राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. त्यांच्या काळात 420 कोटी रुपयांचा प्रकल्प 1600 कोटी रुपयांवर गेलेला आहे. अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

सांगितले आहे की, मुंबई शहरातील वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी आणि या शहरास आंतरराष्ट्रीय शहर करण्यासाठी शासनाने अगोदरच वांद्रे-वरळी सागरी मार्ग हा प्रकल्प हाती घेतला आहे आणि याचा विस्तार पुढे नरीमन पॉईंटपर्यंत करण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रकल्प डिसेंबर 2009 मध्ये पूर्ण होईल. डिसेंबर 2009 में ये प्रकल्प पूरा हो जाएगा, ऐसा आप कह रहे हैं लेकिन इस प्रकल्प को आज 8 साल हो गए है, अभी भी काम पूरा नहीं हुआ. वर्ष 2009 में यह समुद्री मार्ग वरली तक भी पूरा होगा या नहीं, पता नहीं. अगर काम पूरा हुआ तो मैं कहूंगा कि यह आपने अच्छा काम किया. म्हणजे मूळ प्रकल्पाच्या 3 पट काम 2009 मध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. डॉ. सुनिल देशमुख हे पाटबंधारे खात्याचे राज्यमंत्री आहेत. त्यांनी सांगावे की हा प्रकल्प डिसेंबर 2009 मध्ये पूर्ण करणे शासनाला शक्य आहे काय ? अर्थसंकल्पीय भाषणात काहीही लिहिता काय ? कक्ष अधिकारी, अवर सचिव भाषण लिहून देतात आणि अर्थसंकल्प मांडला जातो. अर्थसंकल्प मांडला जात नाही तर तो वाचला जातो. अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम केलेला नसून अर्थसंकल्प वाचण्याचा विक्रम केलेला आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.............

या पुलाचे 25 टक्के काम होताना 420 कोटी रुपयावरुन 1600 कोटी रुपये खर्च झाला व उर्वरित वरळी ते नरिमन पॉईंट या मार्गाचे काम जे 4000 कोटी रुपयांचे आहे त्याबाबत शासन म्हणते की, एक वर्षात पूर्ण करु. कशाचाही पत्ता नाही आणि वरळी ते नरिमन पॉईंटपर्यंतचे काम 2009 पर्यंत पूर्ण करु असे अभिभाषणात सांगितले जात आहे. 2009 पर्यंत वरळी ते नरिमन पॉईंटपर्यंतचे काम पूर्ण झाले तर मी माझ्या आमदारपदाचा राजीनामा देईन आणि मंत्रीमहोदयांचे अभिनंदन करीन. राजकारण सोडून देईन. कशाला लोकांना मूर्ख बनवित आहात? जे तुम्हाला शक्य नाही असे आश्वासन का देत आहात? अर्थमंत्र्यांनी म्हटले होते की, सिर्फ हंगामा खड़ा करना मेरा मकसद नहीं है, मेरी कोशिश है सूरत बदलनीं चाहिए. लेकिन मुझे मालूम है की आपकी कोशिश सूरत बदलने के लिए नहीं है, सिर्फ हंगामा खड़ा करने के लिए है. महाराष्ट्र कर्जात बुडविला तुम्ही. महाराष्ट्राचा काळाकुट्ट इतिहास तुमच्या नावाने लिहिला जाईल. युती सरकारच्या काळातील 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज तुम्ही 1.56 लाख कोटी रुपयांवर नेले. युती सरकारच्या काळात कर्ज 20 हजार कोटी रुपयांनी वाढले होते. आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर अर्थमंत्र्यांनी श्वेतपत्रिका काढली. परंतु तुम्ही 39 हजार कोटी रुपयांचे कर्ज 1.56 लाख कोटी रुपयांवर नेले. आता कोणती पत्रिका काढता बोला? तुम्ही महाराष्ट्राचे वाटोळे केले आहे. गुजराथमध्ये लोडशेडिंग नाही. गुजराथ पहिल्या क्रमांकावर गेले आणि या राज्यामध्ये तुम्ही काय बोलता? एक गोष्ट मी खरोखर मान्य करतो. जर या राज्यामध्ये भाषणामधून आणि बोलण्यामधून वीजनिर्मिती करण्याचे संशोधन पूर्ण झाले असेल आणि ते लागू केले तर मुख्यमंत्र्यांच्या आजुबाजूला जेवढे जनरेटर बसले आहेत, त्यांच्यामुळे अख्ख्या महाराष्ट्राला आवश्यकता भासेल एवढी वीज निर्माण करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये आहे. दिवसभर ते पचर पचर करीत असतात. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी डान्सबार बंद केले ही चांगली गोष्ट केली. क्रिकेटच्या मॅचमध्ये तुमच्या नेत्यांनी नवीन प्रकार सुरु केला. एखाद्या खेळाडूने षटकार किंवा चौकार मारल्यानंतर अर्धनग्न मुली अश्लिल हावभाव करतात. पूर्ण कपडे घालणाऱ्या बारबालांवर बंदी आणली. मग या अर्धनग्न अवस्थेतील मुली जो प्रकार करतात त्याच्यावर बंदी घालणार का? माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना हा घाणेरडा प्रकार कधीच आवडणार नाही. सभापती महोदया, आपल्यालाही हा प्रकार आवडणार नाही. आता अवस्था अशी झाली आहे की, सहनही होत नाही

श्री.नितीन गडकरी............

आणि सांगताही येत नाही. असे काही वेळा घडते. आहे का हिंमत? ब्रेबॉर्न स्टेडियमवर 20-20 ओव्हरच्या मॅचमध्ये खेळाडूने चौकार किंवा षटकार मारल्यानंतर अर्धनग्न मुली नाचतात, अश्लिल हावभाव करतात, त्यांच्यावर बंदी घालण्याची हिंमत आहे का तुमच्यात?

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहात चुकीची चर्चा झाली असे होऊ नये म्हणून मी निदर्शनास आणू इच्छितो की, ब्रेबॉर्न स्टेडियमवर जेव्हा पहिली 20-20 ओव्हरची मॅच झाली त्या मॅचमध्ये एका विशिष्ट खेळाडूने चौकार किंवा षटकार मारला तर जल्लोषाचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून असा प्रकार केला गेला असेल तर स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असे सन्माननीय सदस्यांनी कायम आपल्या भाषणातून, चिंतनातून व्यक्त करु नये. जगाच्या पातळीवर जे बदल घडत आहेत त्याचा हा परिपाक आहे. बारबाला आणि त्यांचे कम्पॅरिझन करणे ही कोणती विद्वत्ता आहे? त्या स्त्रियांबद्दल असे बोलणे आणि इतिहासाचे विद्रुपीकरण करुन ते सादर करणे चुकीचे ठरेल.

(नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड .....

.......अडथळा......सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेब, बारबालांच्या अंगावर कपडे असतात की नाही, हे माझ्यापेक्षा जास्त कदाचित आपल्याला माहीत असावे. पण त्या स्त्रियांबद्दल असे बोलणे आणि विद्रुपीकरण करणे यासंबंधीचा उल्लेख करणे चुकीचे आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदया, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड साहेबांनी जे महनीय विचार मांडले आहेत ते शासनाचे विचार म्हणून मंत्र्यांच्या तोंडून निघाले असते तर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते फुले घेतील, मी निरांजन घेईन आणि माननीय मंत्री महोदय श्री. सतीश चतुर्वेदी साहेब कापूर घेतील और हम कहेंगे, " बहन, तुम देवी जैसी लग रही हो. " आपला मुद्दा मान्य करु..........अडथळा........कॉंग्रेस पक्षाचा यात संबंध नाही, हा फक्त राष्ट्रवादीचाच बाजार आहे आणि त्याची व्यथा माननीय प्रभा राव माझ्याकडे व्यक्त करतात. मैं उनको क्यों दोष दूं ? मैंने जो मुद्दा रखा है, उससे वे सहमत है. .....अडथळा......हा तर फक्त ट्रेलर आहे, फिल्म अजून सुरुच व्हावयाची आहे. "समर्थन" नावाची एक चांगली नावाजलेली संस्था असून त्यात विवेक पंडित दरवर्षी बजेटचे ॲनालिसीस करतात. यावेळी देखील "कसले आश्चर्य, कसली वाहवा" या सदराखाली श्री. विवेक पंडित यांनी एक कविता लिहिलेली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

"पांढरी टोपी, काळा कोट,
गुलाब खिशाला, सोग्यावर बोट,
गप्पा मारता शिलकीच्या,
तीन कोटीचे रिकामे पोट,
64 लाख हात कामाच्या शोधात,
रोजगार हमी निधी बिनदिक्कत खिशात,
कशाला आश्चर्य, कशाला वाहवा,
सुटली मद्य सम्राटांची हवा,
तोंडचा घास काढून घ्यावा,
ढेकर देणाऱ्यालाच द्यावा,
कोणाचे कल्याण, कोणाला न्याय,
झोपडीत उपाशी माझी माय

.....2

श्री. नितीन गडकरी ......

अशा प्रकारे अर्थसंकल्पाचे सार्थ वर्णन त्यांनी केले आहे. माननीय मंत्री महोदय श्री. सतीश चतुर्वेदी साहेब आजकाल आपण देखील काळा कोट वगैरे घालीत नाहीत. असे दिसत आहे की, सर्व मंत्री सुध्दा चिमले आहेत, फुले कोमेजून गेली आहेत. अगोदर बजेटच्या दिवशी वित्त मंत्र्यांमध्ये इतका उत्साह असायचा की ते शेरवानी वगैरे घालून येत व त्यांची फॅमिली प्रेक्षक गॅलरीमध्ये बसून त्यांचे भाषण ऐकत असत परंतु आता तर मंत्र्यांच्या फॅमिलीने सुध्दा अर्थसंकल्पाच्या भाषणावर बहिष्कार टाकल्याचे दिसते.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पाचे गुलाबाचे फूल गेले आणि फक्त काटेच उरले, शेरवानी पण गेली. जे उरले तेच फक्त आपल्यासमोर आहे.

"विकासाची कामे गेली, कर्जात बुडून योजनाही गेल्या साऱ्या हप्त्यात बुडून,
तिजोरीच लुटून गेली गुंडांचे राज्य, कुणाच्या खांद्यावरी कुणाचे ओझं"

असा शेर सांगून माननीय अर्थमंत्र्यांनी वाह-वाह मिळविली होती. बजेट सादर करतांना नेहमी बोलून दाखवित होते आता हाच शेर मी माननीय अर्थमंत्र्यांना भेट देतो, कारण त्यावेळी त्यांनी मला दिला होता. महाराष्ट्रावर 1,58,120 कोटी आजच्या परिस्थितीत कर्ज आहे. राज्यावरील कर्जाचा बोजा एवढा आहे. या राज्याचे स्थुल उत्पन्नाशी प्रमाण 24.02 टक्के एवढे आहे. आता हा कर्जाचा जो बोजा आहे तो 28.4 टक्के याप्रमाणे जोडला गेला आहे. त्यामुळे राज्यात खऱ्या अर्थाने मंत्र्यांच्या कार्यालयावर तसेच इतर शासकीय कार्यालयावर जप्ती आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

पोलीस स्टेशनची स्थिती अशी होती की, तेथील गाडयांमध्ये पेट्रोल, डिझेल भरण्यास पैसे नव्हते. मी त्यावेळेस विरोधी पक्ष नेता होतो त्यावेळची घडलेली सत्य घटना सांगतो. मी त्यावेळेस माननीय फुंडकर साहेबांच्या गावाला गेलो होतो. त्यावेळेस माझ्याकडे लाल दिव्याची गाडी होती. गाडीत पेट्रोल भरावयाचे होते म्हणून तहसिलदार पेट्रोलपंपावर माझी गाडी घेऊन गेले. पेट्रोल पंपावर गाडी गेल्याबरोबर तेथे एक छोटासा मुलगा होता त्याने माझ्याकडे पाहिले आणि म्हणाला "पेट्रोल नाही".मला वाटले टाकीतले पेट्रोल संपले असेल त्यामुळे पेट्रोल नसेल. तेवढयात एक फियाट गाडी आली आणि पेट्रोल भरुन निघून सुध्दा गेली. मला एकदम राग आला. मी पेट्रोलपंपावरील छोटया मुलाला विचारले, "पेट्रोलपंपावर पेट्रोल असतांना तू नाही का म्हणतोस"? त्यावेळेस तो मुलगा म्हणाला, "साहेब पेट्रोल आहे परंतु लाल दिव्याची गाडीत पेट्रोल भरले तर पैसेच मिळत नाही." मला त्या छोटया मुलाने बिगर पेट्रोलचे वापस पाठवले. जर माझ्या गाडीवर लाल दिवा नसता तर मला त्यावेळेस पेट्रोल मिळाले असते. त्यामुळे यासंदर्भात संत तुकारामाचा छोटासा अभंग सांगतो,

"दिवाळखोर नारायण, यावरी बहुतांचे ऋण.
उठताची उभे दारी, अवघी दे दे म्हणती हरी."

अशी या शासनाची हालत आहे. नियोजनाची तर ऐसी की, तैसी झालेली आहे. आपण पंचवार्षिक योजना पध्दत स्वीकारली आहे. सन 2008-2009 हे अकराव्या पंचवार्षिक योजनेचे दुसरे वर्ष आहे. अर्थसंकल्प सादर झाला तरी पंचवार्षिक योजना राज्यशासनाने विधीमंडळाला सादर केली नाही. पंचवार्षिक योजनेच्या माहिती अभावी शासन नियोजनानुसार विकास साधत आहे किंवा कसे याची छाननी विधी मंडळाला कशी काय करता येईल? कदाचित वित्त विभाग, नियोजन विभाग हे वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली विधीमंडळास काडीचेही महत्व देत नाहीत. राज्यपाल महोदयांच्या अनुपालन अहवाल दरवर्षी या सभागृहात नियम 93 अन्वये सूचना टाकून आम्हाला मिळवावा लागतो अशी परिस्थिती आहे. माहिती लपवून ठेवयाची, अहवाल द्यावयाचे नाहीत. कशाचे नियोजन आणि कशाचे प्लॅनिंग आणि कशाचे अर्थनियोजन अशी परिस्थिती आहे. योजनेच्या एकूण आकारमानापैकी 28.26 टक्के योजना अर्थसंकल्पित सुध्दा केली गेली नाही. पाटबंधारे क्षेत्रावर

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ...

नियतव्ययाच्या तुलनेत दुपट्टीपेक्षा अधिक खर्च करण्यात आला. ठीक आहे इरिगेशनला प्रायोरिटी द्यावयास पाहिजे. परंतु आपल्याला जे काही म्हणावयाचे आहे ते बजेटमधून एकदा बाहेर येऊ द्या. प्रगत महाराष्ट्र म्हणून ढोल पिटणा-या या सरकारने विज्ञान आणि तंत्रविज्ञानासाठी 55.25 कोटी रुपयांचा तुटपुंजा नियतव्यय देखील 50 टक्के सुध्दा खर्च झाला नाही. सगळा खर्च पुरवणी मागण्यांवर सुरु आहे. आता फक्त बजेट जेवढे आहे त्यापेक्षा जास्त पुरवणी मागण्या एवढाच काय तो या शासनाकडून विक्रम अपेक्षीत आहे. पुढील वर्षी तुम्हाला जमले तर हा विक्रम जरुर कराल याबद्दल मी तुम्हाला शुभेच्छा देतो, कारण तुमची पाऊले त्याच दिशेने सुरु आहेत. एकीकडे अर्थसंकल्प सादर करावयाचा आणि दुसरीकडे त्यातील निधी खर्च करावयाचा नाही. आणि पुरवणी माध्यमांतून सरकारी तिजोरी मोकळी करावयाची आणि जनतेचा पैसा लुटून खायचा असा हा प्रकार आहे.

सभापती महोदय, सन 2007-2008 मध्ये पुरवणी मागण्या 9927 कोटी 50 लक्ष 86 हजार एवढया रक्कमेच्या होत्या आणि मूळ अर्थसंकल्प आणि पूर्ण वर्षभरात करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये पुरवणी मागण्यांचे प्रमाण 10.41 टक्के आहे. त्यामुळे पुरवणी मागण्यांद्वारे मोठया प्रमाणात गैरवापर होत असल्याचे मागील वर्षी उघड झाले आहे. त्याची अनेक उदाहरणे आहेत परंतु ती उदाहरणे मी येथे देत नाही. या सरकारवर भारताचे नियंत्रण व महालेखा परीक्षक यांनी किती ताशेरे ओढलेले आहेत त्याची कोणी दखलच घेत नाही. आज सकाळी शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या त्यावेळेस शासनाने 150 कोटी रुपयांचे वाटप केले याबाबत चर्चा झाली होती त्यावेळी मी सांगितले होते की, आपण शेतक-यांना भाकड म्हशी वाटल्या, हेले वाटले. सभापती महोदया, हेले आता दूध कसे काय देणार आहेत? म्हशी म्हणून आणल्या आणि प्रत्यक्षात शेतक-यांना भलत्याच म्हशी वाटल्या. शासनातर्फे शेतक-यांना जे नांगर उपलब्ध करुन दिले होते ते पाहण्यासाठी माननीय रावते साहेब एकदा शेतक-याकडे गेले आणि त्यांनी तो फाळ हाताने वाकवून दाखवला.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

तो फाळ एवढा तकलादू होता की सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी तो वाकवला . असा फाळ शेतामध्ये कसे काय काम करु शकेल ? पंतप्रधानांच्या पॅकेजच्या नावाने आणि मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजच्या नावाने लूट केली जात आहे. " ना जात पर ना बात पर, सिर्फ खाओ और खिचो लक्ष्मीदर्शन " एवढाच कार्यक्रम सुरु आहे. त्या व्यतिरिक्त दुसरा कोणताही कार्यक्रम सुरु नाही.

सभापती महोदया, यानंतर मी कॅगच्या अहवालामधील एक परिच्छेद वाचून दाखवतो त्यात असे म्हटलेले आहे की, "दिनांक 31 मार्च 2006 रोजी संपलेल्या वर्षाच्या नागरी अहवालानुसार 72 हजार 216 कोटी 93 लाख रुपयांच्या मूळ मागण्यांच्या तुलनेत 19 हजार 714 कोटी 73 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्याच्या तरतुदीचे प्रमाण फक्त 27.30 टक्के होते. 38 प्रकरणात केलेली 1 हजार 115 कोटी 60 लाख रुपयांची पुरवणी तरतूद अनावश्यक होती. 54 प्रकरणात 10 हजार 833 कोटी 31 लाख रुपयांची आवश्यकता असताना फक्त 13 लाख 760 कोटी 2 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या होत्या. अशा परिस्थितीमध्ये हा अर्थसंकल्प कशासाठी सादर करण्यात येत आहे ? दरवर्षी अर्थसंकल्प मांडत असतांना गुलाबाचे फुल, शेरवानी आणि शेरो शायरी कशाला पाहिजे ? लोकांना दरवर्षी मूर्ख कशाला बनविता ? दरवर्षी शासनाने पुरवणी मागण्या मांडाव्यात आणि अर्थसंकल्पाच्या वेळी आम्हाला फायबर ग्लासच्या रिकाम्या बॅग्ज देण्यात याव्यात. काही जण त्यातील पुस्तके येथेच टाकून रिकाम्या बॅगा घेऊन जातात .अर्थात काही सन्माननीय सदस्य अभ्यास करणारे आहेत. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. अर्थसंकल्पाच्या वेळी आम्हाला बॅग्ज दिल्या की आमचे समाधान होते. त्यामुळे पुरवणी मागण्यांच्या आधाराने राज्य चालविण्यात यावे. अर्थसंकल्पाची सॅन्क्टिटी कशासाठी पाहिजे ?हे माझे मत नसून भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी हे मत दिलेले आहे.त्यांनी आपल्या अहवालात पुढे असे म्हटलेले आहे की, "9 प्रकरणात करण्यात आलेली पुरवणी मागणी अपुऱ्या रकमेची करण्यात आलेली असल्यामुळे 544 कोटी 74 लाख रुपये तरतुदीशिवाय खर्च झालेले आहेत. माननीय अर्थ राज्य मंत्र्यांना मी हे सांगू इच्छितो की, मी आता कॅगचे ताशेरे वाचून दाखविलेले आहेत. तरतूद नसतांनासुध्दा 544 कोटी 74 लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. हे अकाऊन्टंट जनरल यांनी आपल्या रिपोर्टमध्ये सांगितलेले आहे. तेव्हा हा काय प्रकार

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

सुरु आहे ? या संदर्भात आपल्याकडे कोणताही आधार नाही.

सभापती महोदया, लोकमत या वर्तमानपत्राने एक बातमी प्रसिध्द केली होती. लोकमत या वर्तमानपत्रानेच ही बातमी पहिल्या पानावर प्रसिध्द केली हे फार बरे झाले. त्याबद्दल त्यांचे कौतूक करावे तेवढे थोडेच आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, " 2007-2008 या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प 20 हजार 250 कोटी रुपयांचा होता त्यात अतिरिक्त अर्थसंकल्प 2 हजार 802 कोटी रुपयांचा होता म्हणजे एकूण 23 हजार 52 कोटी रुपयांचे एकूण बजेट होते. त्यापैकी 31 जानेवारी 2008 पर्यंत 9 हजार 619 कोटी 44 लाचा रुपये फक्त .खर्च करण्यात आले होते. म्हणजेच 44.5 टक्के खर्च जानेवारी 2008 पर्यंत करण्यात आला होता. त्यानंतर फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात उर्वरित निधी खर्च केला जाणार आहे. 31 मार्चच्या रात्री काही भागातील तरतुदी खर्च न करता ते पैसे दुसऱ्या विभागासाठी ट्रान्सफर केल्या जातील. ज्यांच्या गळयांवर सुरी फिरवावयाची आहे त्यांच्या गळयावर सुरी फिरवून ते पैसे त्यांच्याकडून काढून दुसऱ्या विभागात दिले जातील. तेव्हा फेब्रुवारी व मार्च मध्ये जो विभाग पैसे खर्च करु शकत नाही अशा विभागाचे बजेट रिॲप्रोप्रिएशन केल्यानंतर ते कोणत्या विभागाला ट्रान्सफर केले आहे या बाबतीत विधिमंडळाला आपण कधी माहिती दिली आहे काय ? एका विभागातील पैसे दुसऱ्या विभागात रिॲप्रोप्रिएट केले जातात त्याबाबतीत आपण काहीही सांगत नाही त्यामुळे आपल्या बजेटला काही अर्थ राहिला आहे काय ? या वर्षी बजेटच्या 41 टक्के फक्त खर्च केलेला आहे. 49 टक्के शेवटच्या आठ दिवसामध्ये एका विभागातील पैसे दुसऱ्या विभागात ट्रान्सफर करणार आहात तेव्हा या अर्थसंकल्पाच्या सॅन्क्टिटीला काही अर्थ राहिला आहे काय ? कशाकरिता ही नाटकबाजी सुरु आहे ? लोकांची दिशाभूल का करण्यात येत आहे ? मूळ अर्थसंकल्पाच्या 25 टक्यापेक्षा अधिक पुरवणी मागणी असता कामा नये असा नियम आहे. परंतु गेल्या आठ वर्षात किती पुरवणी मागण्या करण्यात आलेल्या आहेत ? या बाबतीत माननीय अर्थ राज्यमंत्री खुलासा करतील काय ? तुम्ही कोणताच नियम पाळत नाहीत.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



KBS/ KTG/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 15:45

श्री. गडकरी ....

तुम्हाला नियमांची चाड नाही. म्हणूनच तुम्ही 544 कोटी रूपये तरतूद नसतानाही अधिकचे खर्च करून टाकले आणि नंतर तुम्ही त्यासाठी विधीमंडळाची परवानगी मागता. तुम्हाला विधीमंडळाशी, कॅबिनेटशी आणि जनतेशीदेखील काहीही देणेघेणे नाही. हे किती मोठे असे बॉएलेशन आहे. हे मी सांगत नाही तर अकौंटंट जनरलच्या ऑडिटच्या आक्षेपांमध्ये हे सांगण्यात आलेले आहे. सभापती महोदया, मंत्र्यांच्या अंदाजपत्रकातील महसूली तूट शून्यावर आणता आली नाही. आता हे कोणाचे अपयश समजायचे ? कृषी खात्याची तरतूद कमी कमी होत गेली आणि कृषी उत्पादनदेखील खाली येत गेले. पण तरीही महाराष्ट्राचा जाणता राजा दिल्लीत कृषी मंत्री आहे असे म्हणत यांचे डमरू वाजविणे सुरूच आहे. या जाणत्या राज्याच्या इतिहासात, आजपर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये साखर कारखान्यांचे कंबरडे कधीही मोडले नव्हते एवढे मोडले आहे आणि हे कंबरडे मोडण्याचे काम कोणाच्या काळात झाले असेल तर ते या जाणत्या राजाच्या काळात झाले आहे. साखर कारखाने सारे लंबे केले. 560 रूपये भाव आला. .. सभापती महोदया, मी माननीय राज्यमंत्री श्री.हसन मुश्रीफ यांना सांगू इच्छितो की, मी जे काही सांगतो आहे ते चूक असेल तर आपण जरूर दुरूस्त करा. ..

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये यासाठी मला सांगितले पाहिजे की, याच जाणत्या राज्याच्या काळामध्येच साखर कारखाने चालायला लागले आहेत, अन्यथा त्यांना कुलुपे लागली असती. तीन गोष्टींचे निर्णय त्यांनी पहिल्यांदा घेतले. एक म्हणजे साखरेच्या दरामुळे जे शॉर्ट मार्जिन झाले त्याला हप्ता देण्याच्या दृष्टीने पहिला निर्णय घेतला गेला. आता एसएमपी देण्यासाठी दोन वर्षाची एक्साईज बिनव्याजी वापरण्यास दिले म्हणून ही साखर कारखानदारी सुरू आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : अहो त्यांचाही कारखाना त्यातूनच सुरू आहे की ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मला तुमच्या फुटक्या कवडीचाही फायदा झालेला नाही. वाटल्यास, तुम्ही येथे तुमच्याच सरकारातील वनमंत्री असलेल्या माननीय श्री.बबनराव पाचपुते यांना बोलावून विचारावे. ते खाजगी कारखान्यांच्या युनियनचे अध्यक्ष आहेत. श्री.बबनराव चौधरी, जे राष्ट्रवादी काँग्रेसचे जनरल सेक्रेटरी आहेत त्यांनाही वाटल्यास याबाबत विचारावे. आमच्याही फाईल्स गेल्या होत्या. पण आमच्या करंगळीवर देखील काही आले नाही. ..

...... एनएन 2 ...

25-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) NN 1

KBS/ KTG/ SBT/ श्री.गायकवाड नंतर --- 15:45

श्री. हसन मुश्रीफ : ते सहकारातील कारखान्यांसाठी दिले ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : बरोबर आहे, तुमचा तो स्वाहाकार आहे. ते फक्त स्वाहाकाराला सपोर्ट करतात. श्री.मुंडे साहेबांचा कारखाना वेगळा आहे. महाराष्ट्रात आज साखर कारखाने आणि सूत गिरण्याचा विषय हा अतिशय गंभीर विषय आहे. आजपर्यंत सहकाराचे पैसे घेऊन साखर कारखान्यांची परिस्थिती काय आहे ? याची माननीय राज्यमंत्री श्री.मुश्रीफ यांना कदाचित माहिती नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की, हे पवार साहेब, वर्षवर्ष पॅकेज जाहीर केल्यानंतरही हातात बुडखादेखील लागत नाही. तेव्हा मी आपल्याला विनंती करीन की, मागील वर्षीच्या पॅकेजचा पैसा आपल्या हातात लागला का ? ते तरी आपण येथे सांगावे. मी आपल्याला सांगतो की, पवार साहेबांनी थोरात साहेबांकडे मलाच पाठविले होते. आमची फाईल चिदंबरम् पर्यंत गेली होती. तेथील काम तर फारच पारदर्शक आहे. पवार साहेबांनी काहीही शिफारस केली तर ती रिजेक्ट होऊनच अगदी दोन दिवसातच परत येते. पवारांकडून काही फाईल आली तर ती लगेच रिजेक्ट करा असा आदेश मॅडमनी दिला किंवा काय याची मला कल्पना नाही. ..

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेब, सन्माननीय श्री.मुश्रीफ साहेब आपल्याला एवढेच सांगत आहेत की, साखर कारखान्यांच्या संदर्भात जाणता राजा केंद्रात कृषी मंत्री झाल्यानंतर ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मी माझे आरोप पुन्हा रिपिट करतो, अगदी आकडेवारीनिशी करतो. सभापती महोदया, 560 रूपये टन इतका भाव साखरेसाठी शेतकऱ्याला मिळाला आहे का ? मी देखील कारखाना चालवितो. 560 रूपये टनावर कधी वेळ आली होती का हे मला येथे बसलेल्या सन्माननीय सदस्य श्री.देशमुख साहेबांनी सांगावे. त्यांच्या परभणीमध्ये तरी कधी त्यांना 560 रूपये टन इतका भाव मिळाला आहे का ? जाणत्या राजाच्या काळात या वर्षी ऊसाला 560 रूपये टन इतका भाव मिळाला. ..

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य येथे चुकीचे बोलत आहेत....

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, मी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना सांगू इच्छितो की, आमचा तसा काही साखरेशी संबंध नाही. आणि आम्ही प्रामाणिकपणे ते मान्यही करतो. पण सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचे असे आहे की, कोठल्याही क्षेत्रात त्यांनी घुसावे. म्हणजे मग त्या क्रिकेटच्या मैदानातील पोरींपासून शेतातील बाईपर्यंत. अगदी कोठेही जावे,

...... एनएन 3 ...



श्री. आव्हाड ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या गडकरींचेच राज्य. आताच येथे माझ्या मागे बसलेले सन्माननीय सदस्य श्री.पोळ मला सांगत होते की, त्यांना साखरेसंबंधात थोडेफार कळते, तर ते सांगत होते की, यंदा 1400 रूपये भाव मिळाला.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मी तुम्हाला आज महाराष्ट्रातील 25 सहकारी साखर कारखान्यांची नावे सांगून विचारतो, वाटल्यास, तुम्ही माझे ते आव्हान आहे असे समजा आणि माझे ते आव्हान स्वीकारा, मी आता या महाराष्ट्रातील 560 रूपये टन भाव देणारे साखर कारखाने येथे जाहीर करतो. ...

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचे भाषण चालले आहे. परवाच्या दिवशी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेतदेखील त्यांनी येथे भाषण केले आणि त्यात त्यांनी केंद्रातील एकाही मंत्र्याचे नाव घेण्याचे सोडले नाही. पण त्या दिवशी त्यांचे भाषण येथील सगळ्यांनी हसण्यावारी, आनंद लुटण्यामध्ये घेतले. मात्र ज्यावेळेस या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील हे त्या चर्चेला उत्तर देण्यास उभे राहिले आणि त्यांनी त्यांच्या भाषणात केवळ एक दोन नावे घेतल्यानंतर समोरच्या बाजूची मंडळी उभी राहिली आणि त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, जी व्यक्ती या सदनाची सदस्य नाही त्यांचे नाव या सभागृहात घेता येणार नाही. कारण त्यांना त्याबाबत येथे येऊन खुलासा करता येत नाही. पण आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी हे वारंवार श्री.पवार साहेबांचे नाव घेत आहेत. आता ते बरोबर बोलत आहेत की चुकीचे बोलत आहेत हे सांगण्याचा आम्हीही प्रयत्न करीत आहोत. परंतु श्री.पवार हे आता या सभागृहाचे सदस्य नसल्यामुळे त्यांना येथे येऊन त्यांच्याबाबत खुलासा करता येणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे ....ओओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

त्यामुळे त्यांनी वारंवार त्यांचे नाव घेऊन त्यांना आव्हान देणे बरोबर नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मला एवढेच सांगावयाचे आहे की, महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही घडले नसतांना 560 रुपये पर टन इतका ऊसाला भाव देण्याची वेळ आली. मी याबाबत आपल्याला 25 साखर कारखान्यांची नावे सांगतो, मराठवाडयातील कारखान्यांची नावे सांगतो.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, मी मघापासून सांगत आहे की, एस.एम.पी. देण्याकरिता दोन वर्षाचे एक्साईज बीनव्याजी दिले आहे. जर एस.एम.पी. कमी असेल तर भाव कमी मिळतो. हे भाव साखरेच्या रिकव्हरीवर आधारीत आहेत, त्यामध्ये तोडणी वहातूक खर्च वजा केला जातो.

**तालिका सभापती (श्रीमती उषाताई दराडे)** :मी माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांना सांगू इच्छिते की, आपल्याला साखरेच्या मुद्यावर बोलावयाचे असेल तर जागतिक परिस्थिती आणि दिलेले पॅकेजेस हे विचारात घेतले पाहिजे. अर्धवट माहितीवर आपण बोलू नये असे मंत्रिमहोदयांचे म्हणणे आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, मी अर्धवट माहितीवर बोलत नाही. नागपूरच्या अधिवेशन काळात माननीय सभापती श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांच्या अँटी चेंबरमध्ये एक बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय श्री. गोपीनाथजी मुंडे, माननीय श्री. जयंत पाटील, माननीय श्री. विजयसिंह मोहिते पाटील, माननीय श्री. राजेश टोपे व मी स्वत: उपस्थित होतो. माननीय श्री. टोपे साहेबांनी बैठक चालू असतांना बाहेर जाऊन आपल्या वडिलांना फोन केला होता. त्यावेळी असे ठरले की, यावर्षी 560 रुपये भाव देऊन सुरुवात करावी. माननीय मुख्यमंत्र्यांसहीत सर्वांनी मिळून हे ठरविले आहे.

....2/

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, 650 रुपये भाव दिला होता. त्यावेळी साखरेचे दर उतरले होते. म्हणून त्यांना 2 वर्षाची एक्साईज बीनव्याजी दिली. आता साखरेला काय दर मिळत आहेत याबाबत माननीय सदस्यांनी लेटेस्ट माहिती घ्यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, आजही मराठवाडा आणि विदर्भामध्ये माननीय श्री. विनय कोरे यांचा आणि माननीय श्री. सुरेश देखमुख यांचा साखर कारखाना आहे. त्याचप्रमाणे मराठवाडयातील व नाशिक जिल्हयातील अनेक कारखाने आजही 560 रुपयांचा भाव देत आहेत. हे मी माहितीच्या आधारावर बोलत आहे. ही माहिती चुकीची असेल तर माननीय मंत्र्यांनी माझ्यावर हक्कभंग आणावा.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, माननीय श्री. विनय कोरे साहेबांनी चालवावयास घेतलेला कारखाना गेल्या वर्षी बंद होता. तरीसुध्दा त्याठिकाणी 650 रुपये भाव दिला गेला आहे. याबाबत माननीय सदस्य चुकीची माहिती सांगत आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, माननीय मंत्री श्री. विनय कोरे यांनी यवतमाळ येथील साखर कारखाना चालवावयास घेतला. आम्हाला 550 रुपये भाव द्या म्हणून तेथील शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्या आंदोलनाच्या वेळी दगडफेक झाली, लाठीचार्ज झाला. मला आमदारांचा फोन आला. त्यानंतर मी स्वत: माननीय श्री. विनय कोरे यांच्याशी बोललो. ते म्हणाले की, मी हा कारखाना चालवावयास घेतला आहे. मी शेतकऱ्यांच्या ऊसाला 550 ते 560 रुपये हा भाव देतो. तुम्ही सांगत आहात त्याप्रमाणे 850 ते 900 रुपये इतका भाव मी देणार नाही. मला तो कारखाना नको, मी परत जातो. पश्चिम महाराष्ट्रात काही ठिकाणी साखर कारखाने 2 हजारांचा भाव देत असतील. प्रश्न असा आहे की, मागासलेल्या भागात साखर कारखाने बंद पडलेले आहेत. आणि शेतकरी संघटनेचे भाव वाढीकरिता आंदोलन झाले आहे हे आपणास माहीत आहे. त्यानंतर फक्त 50 रुपये भाव वाढवून देण्यात आला. त्यांनी 1250 रुपये मागितले असतांना कारखान्याने 950 रुपये हमी भाव दिला पाहिजे असा निर्णय झाला. माननीय सदस्य सांगत आहेत की, विविध क्षेत्रातील कारखान्यांच्या गाळप क्षमतेप्रमाणे आणि आलेल्या उताऱ्याप्रमाणे भाव प्रक्षेपित होत असतो. परंतु शेतकऱ्यांना कमीत कमी इतका भाव मिळाला पाहिजे असे आपण सांगावे हा यामध्ये मुख्य मुद्दा आहे. भावाच्या बाबतीत प्रत्येकांनी कुठे ना कुठे मध्यस्थी केलेली आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, माननीय मंत्री श्री. विनय कोरे यांच्या जय किसान कारखान्यामध्ये आज भाव काय आहे हे सांगावे? फक्त कोल्हापूरच्या एखाद्या कारखान्याविषयी आपण बोलू नका.

सभापती महोदया, मी आता अर्थसंकल्पाच्या भाषणाकडे वळतो. या कार्यक्षम सरकारच्या मंत्र्यांनी कशाप्रकारे पैसे खर्च केले याची आकडेवारी आपण पहावी. उद्योग विभाग एकूण बजेट 50 कोटी, सुधारीत बजेट 50 कोटी, एकूण खर्च 21 कोटी 71 लाख, टक्केवारी 43.4 टक्के. ऊर्जा विभाग एकूण बजेट 1281 कोटी 55 लाख, सुधारीत बजेट 1323 कोटी 55 लाख, खर्च 354 कोटी 81 लाख, टक्केवारी फक्त 26.8 टक्के. शालेय शिक्षण विभाग एकूण बजेट 599 कोटी 78 लाख , सुधारीत बजेट 599 कोटी 78 लाख, एकूण खर्च 246 कोटी 78 लाख, टक्केवारी 41.2 टक्के. जलसंपदा विभाग, एकूण बजेट 4465 कोटी 61 लाख, सुधारीत बजेट 6042 कोटी 61 लाख एकूण खर्च 15 लाख, टक्केवारी फक्त 44 टक्के.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

कृषी विभागाचे एकूण बजेट 252 कोटी 20 लाख रुपये, सुधारित बजेट 364 कोटी 54 लाख, खर्च 87 कोटी 20 लाख म्हणजे फक्त 23.09 टक्के खर्च केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे एकूण बजेट 70 कोटी रुपये, सुधारित बजेट 70 कोटी, खर्च 17 कोटी 41 लाख रुपये असून फक्त 24.09 टक्के खर्च केलेला आहे. सामाजिक न्याय विभागाचे एकूण बजेट 1038 कोटी 80 लाख, सुधारित बजेट 1038 कोटी 80 लाख आणि एकूण खर्च 444 कोटी 93 लाख इतका केला असून 42.08 टक्के खर्च केलेला आहे. पर्यटन विभागाने 52.60 टक्के खर्च केला आहे, रोजगार हमी योजनेच्या बाबतीत एकूण बजेट 1100.04 इतके असून फक्त 54.02 टक्के खर्च केलेला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते) यामध्ये 58.02 टक्के इतका खर्च झालेला आहे. गृहनिर्माण विभागामध्ये 35.08 टक्के इतका खर्च झाला आहे. गृह विभागामध्ये 65.09 टक्के खर्च झाला आहे. महसूल विभागामध्ये 57.05 टक्के खर्च झाला आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर ते मेरिटमध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. या विभागाने 8.06 टक्के खर्च केलेला आहे. नियोजन विभागामध्ये 20.08 टक्के खर्च केलेला आहे आणि सहकार विभागामध्ये 16.09 टक्के खर्च केलेला आहे. म्हणजे जेवढे बजेट केले जाते, त्यातील केवळ 8 ते 9 टक्के, 20 टक्के रक्कम खर्च करण्यात येते. मग हे कसले बजेट आणि कसल्या गप्पा मारता ? माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी माझ्या बोलण्याकडे लक्ष द्यावे. मी काय सांगितले, ते तुम्ही ऐकले आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख (खाली बसून) : सन्माननीय सदस्यांची जी माहिती आहे, ती चुकीची आहे. इरिगेशन विभागाचा खर्च 17 टक्के झालेला आहे असे सांगितले. पण जानेवारी महिन्यामध्ये इरिगेशनचा सिझन असतो का ? तो सिझन केव्हा सुरु होतो ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, 9 टक्के, 20 टक्के, 31 टक्के जो खर्च झालेला आहे, तो जानेवारी अखेरपर्यंतचा आहे. पण पास होण्यासाठी 35 टक्के मार्क लागतात. पण त्यांचे असे म्हणणे आहे की, आम्ही वर्षभर शाळेला दांडी मारली तरी मार्च महिन्यामध्ये परीक्षेच्या वेळी कॉपी करु, काहीही करु आणि परीक्षेमध्ये पास होऊ. पण खर्चाच्या बाबतीत जानेवारीपर्यंत जेवढा प्रकाश पडलेला आहे,तेवढे मी सांगितले. माननीय वित्तमंत्री फार हुशार आहेत.त्यांच्या कार्यक्षमते-बद्दल बिरबलाला सुध्दा लाज वाटेल.

. . . .2 पी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : माननीय राज्यमंत्र्यांबद्दल काही म्हणत नाही ना ?

श्री.नितीन गडकरी : नाही. राज्यमंत्र्यांबद्दल नाही.

श्री.हसन मुश्रीफ (खाली बसून) : ते विदर्भातील असल्यामुळे काही अडचण नाही.

श्री.नितीन गडकरी : तुम्ही हा हेत्वारोप करीत आहात. आधीच कॅबिनेट मंत्री त्यांच्यावर आरोप करतात की, तुम्ही सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या सल्ल्याने काम करता. त्यांना उगाच कशासाठी बदनाम करीत आहात ?

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी सलग दहावा अर्थसंकल्प मांडलेला आहे. त्यांनी यामध्ये जी आकडेमोड केली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावयास पाहिजे. माननीय वित्तमंत्र्यांनी 2008-2009 या आर्थिक वर्षासाठी एकूण 25 हजार कोटी रुपयांच्या वार्षिक योजनांचे बजेट सादर केलेले आहे. या बजेटमध्ये मंत्री महोदयांनी फक्त आकडे फिरविलेले दिसतात. प्रत्यक्षात हे आकडे कुठे आहेत ? हे सांगणे फार कठीण आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या पहिला श्वेतपत्रिकेमध्ये शिलकी महसूल, कर्जाच्या व खर्चाच्या, अनुदानाच्या, शासकीय उपक्रमाच्या बाबतीत, तसेच व्यवस्थापकीय सुधारणा करण्यासाठी कठोर उपाययोजनांच्या आर्थिक ढाच्याचा आढावा घेतला होता. तसेच परकीय गुंतवणूकीच्या बाबतीत त्यांनी मान्य केले आहे की, गुजराथ राज्यानंतर या राज्याचा दुसरा क्रमांक लागतो. ही सगळी आकडेमोड सुरु आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करण्याचा हा प्रकार आहे. आपण मोठया आशेने बजेटकडे पाहतो. त्यापूर्वी पुरवणी बजेट असते. परंतु त्यापूर्वी तुम्ही 544 कोटी रुपये मंजूरीशिवाय खर्च करता, याबाबतीत ए.जी.यांनी रिपोर्ट दिलेला आहे आणि वरुन आकडयांची फिरवाफिरव करता. पुन्हा वरुन कोट लावून त्यावर गुलाबाचे फूल लावून टी.व्ही.वर झळकून आपली वाहवा करुन घेता. यावेळी धोतर-टोपी असा वेष होता. मला हे मान्य केले पाहिजे की, त्यांनी याच वर्षी टोपी घातली. याचे कारण त्यांना महाराष्ट्रातील जनतेला टोपी घालावयाची होती. त्यामुळे त्यांनी यावर्षी शेरवानी घातली नाही, टोपी घातली. बरोबर आहे, यावर्षी टोपी घालण्याचा प्रोग्रॅम सुरु आहे.

सभापती महोदय, कर्ज मुक्तीबाबत सांगावयाचे तर विदर्भामध्ये 15 एकर जमीन असलेला शेतकरी कधी कर्ज मुक्त होणार आहे, याची आम्ही वाट पहात आहोत. याबाबतीत घोषणा झाल्या आहेत. पण लबाडा घरचे आमंत्रण जेवल्याशिवाय काही खरे नाही. पण सध्या कर्जमुक्तीचे डमरु वाजविणे सुरु आहे, मेळावे घेणे सुरु आहे.

यानंतर श्री.खंदारे . . . .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

माननीय मंत्रिमहोदय डॉ.पतंगराव कदम यांनी चहापानाच्या कार्यक्रमाच्या वेळी असे म्हटले होते की, कर्जमाफी जाहीर झालेली आहे त्याचे श्रेय कोणाला द्यावयाचे असेल तर श्रीमती सोनिया गांधी आणि माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनाच आहे. बाकीचे लोक उगाच डमरु वाजवित फिरत आहेत. माननीय श्री.पतंगराव कदम हे प्रामाणिकपणे बोलतात. महाराष्ट्रातील जनता ही सोशिक, सहनशील आहे, राज्यातील जनता आजही मंत्र्यांना रस्त्यावर फिरु देते. त्यांच्यावर अंडे मारत नाही, त्यांना जोडे न मारता फिरु देते. राज्यामध्ये मोठया प्रमाणावर लोडशेडिंग असतानाही महाराष्ट्रातील जनता, शिवाजी महाराजांना मानणारी जनता फार सोशिक आहे, ती मंत्र्यांना अजूनही रस्त्यावर फिरु देते. याचा अर्थ राज्यातील जनता ख-या अर्थाने सोशिक आहे, असे गौरवोद्‌गार माननीय श्री.पतंगराव कदम यांनी काढले आहेत. ते सत्य बोलतात.

सभापती महोदया, सिंचनाच्या अनुशेषाबद्दलचा अनुपालन अहवाल सरकारने काल जाहीर केला आहे.

**तालिका सभापती ( श्रीमती उषा दराडे )** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगू इच्छिते की, आपण भाषण सुरु करुन 42 मिनिटे झालेली आहेत. आपण आता विषयाला सुरुवात केली आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे काय बोलतात ते समजण्यासाठी उद्याचा दिवस उजाडेल.

श्री.नितीन गडकरी : माननीय सदस्यांनी माझ्याकडून टयूशन घेतली तर त्यांना लवकर विषय समजेल.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना आणखी किती वेळ लागणार आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, मी असे ऐकले आहे की, आज संयुक्त समितीची बैठक बोलविण्यात आलेली आहे. माननीय सभापतींनी सत्र काळामध्ये समित्यांच्या बैठका घेण्यात येऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत. तरी सुध्दा समित्यांच्या बैठका सुरुच आहेत. याबाबत मी

2...



श्री.दिवाकर रावते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापतींना लेखी पत्र दिलेले आहे. जे काही कामकाज असेल ते उरकून घेण्याची सरकारला सवयच लागलेली आहे. संयुक्त समितीची आज होणारी बैठक रद्द झाल्याचे मला अजूनही कळविलेले नाही, त्यामुळे ती बैठक रद्द झाली आहे असे मी समजतो. तरी सुध्दा संयुक्त समितीची बैठक झालीच तर ती माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयाला अनुसरुन नाही. ती बैठक अवैध असेल असे मी नमूद करु इच्छितो.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात शपथेवर सांगावे की, शासनाने राज्यपालांच्या निदेशांचे पालन केले आहे का ? या वर्षासाठी 1400 कोटी रुपये ठेवले आहेत असे माननीय अर्थमंत्र्यांनी ठेवल्याचे म्हटले आहे. राज्यपालांच्या निदेशांचे पालन केले जाईल असे म्हटले आहे. परंतु हा निधी कोठून उभा करणार ? शासनाला 1400 कोटी रुपये कोण देणार ? महाराष्ट्र सरकारचे रेटिंग काय आहे हे माननीय मंत्रिमहोदय सभागृहात सांगू शकतील काय ? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी त्यांच्या उत्तरात द्यावे. केंद्र सरकारने देखील राज्य सरकारला कर्ज देताना बंधने घातलेली आहेत.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:05

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत**

या राज्याचे रेटींग फार खाली गेलेले आहे. असे असताना शासन सांगते की, राज्यपालांच्या निर्देशाप्रमाणे 1400 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी आम्ही उभा करुन देऊ. तेव्हा हा निधी शासन कशा प्रकारे उभा करणार आहे, हा देखील प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण संपविणार आहे. विजेच्या प्रश्नावर या महाराष्ट्राचे नाव इतिहासात नोंदले गेले आहे. विजेचा प्रश्न संपविण्यासाठी या शासनाने किती पोकळ घोषणा केलेल्या आहेत. एका खाजगी कंपनी बरोबर सह्याद्रीवर लेटर ऑफ इण्टेण्ट झाले. ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे पाटील यांनी विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी, राज्यात वीज निर्माण करण्यासाठी शासनाने 1400 कोटी रु.चे करार केलेले आहेत अशा प्रकारची घोषणा केली. परंतु आज हालत काय आहे ? विजेचा पत्ताच नाही. विजेची सगळीकडे बोंबा बोंब. टाटा आणि रिलायन्स पॉवर या कंपन्याना वीज प्रकल्पांसाठी एकच जागा दिली. त्यांचा वांदा झालेला आहे. रिलायन्स 4 हजार मेगावॅट, टाटा -1 हजार मेगावॅट, एसआर पॉवर-1500 मेगावॅट , स्पेक्ट्रम टेक्नॉलॉजी 500 मेगावॅट अशा प्रकारे हे प्रकल्प वीज निर्माण करणार आहेत. राज्यामध्ये एकूण 12500 मेगावॅट वीज निर्मिती होणार आहे असे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले. परंतु कशाचाच पत्ता नाही. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 6 हजार मेगावॅट विजेची टंचाई आहे. हे आघाडी शासन गेली साडेआठ वर्षे सत्तेवर आहे. मग महाराष्ट्रामध्ये जे लोडशेडिंग होते त्याला युतीचे शासन जबाबदार आहे काय ? मग तुम्ही 8 वर्षात काय दवे लावलेत ? या राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यानाच केवळ हे शासन जबाबदार नाही तर या राज्यातील विद्यार्थ्यांचे भवितव्य हे शासन उद्ध्वस्त करीत आहे. मार्च, एप्रिल या महिन्यामध्ये मुले अभ्यास करु शकत नाहीत. मराठवाडा, विदर्भामध्ये तर विजेची अत्यंत वाईट परिस्थिती आहे. आमच्या अमरावती जिल्ह्यामध्ये 12- 16 तास लोडशेडिंग असते. नागपूर जिल्ह्यामध्ये 12-14 तास लोडशेडिंग असते. सन्माननीय राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ हे कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. कोल्हापूरमध्ये किती तास लोडशेडींग असते हे त्यांनीच सांगावे. परंतु आता ते बोलणार नाहीत. ते काय आणि कोणत्या तोंडाने बोलणार ? सभापती महोदय, आता जनरेटर शिवाय एकही सभा होत नाही. मला

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी .....

तर जनरेटरचा आवाज ऐकल्या शिवाय भाषण सूचत नाही अशी सवय लागून गेली आहे. आता या सभागृहामध्ये देखील जनरेटर लावा. तेवढे तुमचे राहिलेले स्वप्न पुर्ण करा. सभापती महोदय, विजेच्या प्रश्नावर पूर्ण वाट लागलेली आहे. असे असताना हे शासन केवळ घोषणा करीत आहे. "परळी विस्तार", "खापरखेडा विस्तार", "भुसावळ विस्तार" अशा प्रकारच्या घोषणा केल्या जातात.परंतु कशाचा काही पत्ता नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:10

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे हे केंद्रात ऊर्जा मंत्री झाले. महाराष्ट्रात 6 हजार मेगावॅट वीजेचे शॉर्टेज आहे. माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी घोषणा केली की, केंद्राच्या हक्काची 100 मे.वॅ.जास्तीची वीज महाराष्ट्राला देण्यात येईल. "राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला" अशी त्यांनी घोषणा केली. महाराष्ट्राला 6 हजार मे.वॅ.ची गरज आहे आणि केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी 100 मे.वॅ.जादा वीज देण्याची घोषणा केली. सभापती महोदय, अशा प्रकारे या राज्याचा विकास चालला आहे. या राज्यात काय सुरु आहे हे मला कळत नाही. 100 मे.वॅ.जादा वीज देऊन या राज्याचा प्रश्न कसा सोडविला जाणार आहे यासंबंधीची माहिती राज्य सरकारने दिली पाहिजे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी साखर कारखान्यांच्या बाबतीत मघाशीच वक्तव्य केले आहे. मी राज्यकर्त्यांना विचारु इच्छितो की, या राज्यात इथेनॉल कोणी आणले ? या देशात एन.डी.ए.सरकारने इथेनॉल आणले. आज पश्चिम महाराष्ट्रात 65 सहकारी साखर कारखाने बंद पडलेले आहेत. सदर कारखाने बंद पडल्यामुळे 4 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक गड्डयात गेली आहे. तुमचे सरकार इथेनॉल घेण्यास तयार नाही. शेतक-यांनी तयार केलेल्या ग्रीन फ्यूएलला विकत घेण्यास सरकार तयार नाही. सरकारचे हित बघणारे हे सरकार आहे असे शासनकर्ते म्हणवून घेत आहे, परंतु शेतक-यांच्या हिताच्या बाबतीत हे शासन काहीही करीत नाही या गोष्टीचा मला राग येतो. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आमचे भारतीय जनता पक्षाचे नेते श्री. अटलबिहारी वाजपेयी आणि श्री. लालकृष्ण अडवाणी हे शेतकरी नव्हते. पण त्यांनी या देशात इथेनॉल आणले आणि 10 टक्के इथेनॉल पेट्रोलमध्ये मिक्स करण्याचा निर्णय घेतला. केंद्रात तुमचे सरकार आले. या सरकारमध्ये श्री. शरद पवार हे कृषि मंत्री झाले. या राज्यात तुमची सत्ता आली. केंद्रात आणि राज्यात सत्तेवर येऊन तुम्ही काय केले ? एक थेंब इथेनॉल राज्य शासनाने विकत घेतले नाही, त्यामुळे महाराष्ट्रातील सगळे व्यवसाय संपुष्टात आणले. या राज्यात इथेनॉलची परवानगी दिली असती तर अनेक साखर कारखान्यांनी साखर कमी निर्माण केली असती आणि साखरेच्या रसापासून इथेनॉल तयार केले असते तर या राज्यात साखर सरप्लस झाली नसती. पर्यायाने साखरेचे भाव कोडमडले नसते. परंतु इथेनॉलसाठी तुम्ही परवानगी दिली नाही. ती परवानगी का दिली नाही यासंबंधीचा खुलासा सभागृहात करण्यात यावा अशी माझी मागणी आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांच्या पोटावर तुम्ही लाथ मारली आहे. 60 हजार गिरणी कामगारांची लिगल देणी अद्यापपर्यंत दिली गेली नाहीत. या गिरणी कामगारांना त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीची रक्कम अद्याप दिली नाही, गिरणी कामगारांना घरे देण्याचे तुम्ही आश्वासन दिले होते, तुमच्या आश्वसनाप्रमाणे त्यांना तुम्ही अद्यापही घरे उपलब्ध करुन दिलेली नाहीत. आज सगळया गिरण्यांच्या जमिनींवर मोठ-मोठे शॉपींग मॉल उभे राहिले आहेत. गिरण्यांच्या जमिनींवर मॉल बांधण्यासाठी तुम्ही परवानग्या दिल्या. आज गिरणी कामगार आणि त्यांचे कुटुंब रस्त्यावर आले आहे. गिरण्यांच्या जमिनीवर मोठ-मोठे मॉल बांधून गिरणी मालक श्रीमंत झाले आहेत. परंतु गिरण्यांच्या जमिनींवर मॉल बांधण्याची परवानगी देऊन तुम्ही गिरणी कामगारांच्या पोटावर लाथ मारली आहे. मी या ठिकाणी जबाबदारीने आरोप करीत आहे की, मुंबईतला प्रत्येक बिल्डर हा एक तर प्रमुख नेत्याचा पार्टनर असेल तरच मुंबईमध्ये बिल्डरचा व्यवसाय करता येतो. तो बिल्डर जर प्रमुख नेत्याचा पार्टनर नसेल तर त्या बिल्डरला बिल्डरचा व्यवसाय करता येत नाही अशी मुंबईत आज परिस्थिती निर्माण झाली आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड (बसून) : आपले म्हणणे बरोबर आहे. श्री.लोढा साहेबांनी आपल्याला बरोबर माहिती दिलेली दिसते आहे.

श्री. नितीन गडकरी : माझ्या मताशी सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे सहमत झाले असल्यामुळे त्यांचे मी आभार मानतो. मला श्री. लोढा यांच्याकडून माहिती घेण्याची आवश्यकता नाही. तुमच्यात हिंमत असेल तर मुंबई शहरातील सगळया एस.आर.ए.प्रकरणांची चौकशी करा. मला या ठिकाणी बोलण्यास भाग पाडू नका. मी जर कुंडली उघडली तर सरकारचा संपूर्ण चेहरा उतरुन जाईल एवढे मी आवर्जून सांगू इच्छितो. मुंबई शहरात कोणत्याही बिल्डरला राजकीय आशिर्वाद असल्याशिवाय व्यवसाय करता येत नाही. मुंबई शहरात मोठ मोठे नामांकित बिल्डर्स आहेत. ते बिल्डर्स देखील कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्यांचा आशिर्वाद घेतल्या शिवाय व्यवसाय करु शकत नाहीत. पूर्वी टक्केवारीवर व्यवसाय चालावयाचा. आता मात्र पार्टनरशीपवर धंदा सुरु आहे. मुंबईतील सगळे बिल्डर्स पार्टनर झालेले आहेत. दिल्लीतील मोठ मोठे मंत्री, पोलीस अधिकारी, शासकीय अधिकारी, सत्तेतील मोठ मोठे मंत्री यांच्या कंपन्या तयार झालेल्या आहेत. प्रत्येकाने आठ-आठ, नऊ-नऊ कंपन्या काढलेल्या आहेत. त्या कंपन्यांचा दूरध्वनी क्रमांक

3...



ABG/ KGS/ प्रथम श्री. शिगम 16:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

एक आहे, त्या कंपन्यांचे कार्यालय एक आहे. अशा अनेक कंपन्यांची नावे माझ्याकडे आहेत.

श्री. भास्कर जाधव (बसून) : त्यात मराठी माणसाचा समावेश आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : यामध्ये मराठी माणसे फक्त पाच ते दहा टक्के एवढेच आहेत.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, या शासनाने गिरणी कामगारांचा सत्यानाश केला. गिरणी कामगारांना रेशनकार्ड देण्याची मागणी केली होती. ती मान्य झाली नाही. बीपीएल कार्ड देण्याची मागणी मान्य करुनही देण्यात आली नाहीत. गिरणी कामगारांची मुले-बाळे रस्त्यावर आली. गिरणी कामगारांना भविष्य निर्वाह निधी दिला नाही, आयुर्विम्याचे पैसे दिले नाहीत. एका कार्यक्रमात कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री श्री. प्रभाकर कुंटे आणि मी एकत्र होतो. त्यावेळी ते आपल्या भाषणात म्हणाले की, कामगारांचा गळा कापणारे या सरकार इतके दुसरे कोणतेही सरकार नाही. गिरणी कामगारांचा या सरकारने विश्वासघात केला. हे पाप आघाडी शासन कुठे भोगणार आहे ? गिरणी कामगारांचा अक्षरश: विश्वासघात केला.

सभापती महोदय, रोजगार हमी विधेयक मंजूर करण्याच्या बाबतीत सदनामध्ये गोंधळ झाला. हे विधेयक मंजूर करण्यापूर्वी 478 कोटी रोजगार हमी योजनेतून महाराष्ट्राच्या वाटयाला आले होते. त्यातील फक्त 78 कोटी रुपये शासनाने खर्च केले. याठिकाणी मला सांगावयाचे आहे की, रोजगार हमी योजनेत येणारा पैसा मध्यमवर्गीय आणि गरीब लोकांच्या पगारातून कापून घेतला जातो. हा पैसा त्यांच्याकडून याकरिता कापून घेतो की गरीब माणसाला रोजगार मिळेल या हेतून कापून घेतो. परंतु हा पैसा खर्च होत नाही. यावर्षी 1 लाख 61 हजार 682 कामगारांनी काम मागितले परंतु शासनाने फक्त 278 कामगारांना काम दिले. छोटे राजकुमार श्री. राहूल गांधी यांची ही योजना. त्यांच्या या योजनेची वाट लागली. 1 लाख 61 हजार 682 मजुरांनी काम मागितले आणि त्यापैकी फक्त 278 मजुरांना 100 दिवसांचे काम दिले. या आघाडी सरकारची ही नेत्रदिपक कामगिरी आहे. अभिमानास्पद कामगिरी आहे. महात्मा फुले, शाहू महाराज, गरीब माणूस हीच खरी कॉंग्रेस. शिक्षणमंत्री प्रा.वसंत पुरके यांची हालत तर वाईट झाली आहे. शिक्षकांच्या शिव्या खायच्या. स्वत:च्या पैशाने गाडीत पेट्रोल टाकतात. मुख्यमंत्री त्यांना कॉर्नर करतात. रोजगार हमी योजनेची पार वाट लागली आहे. रोजगार हमी योजनेचा निधीच रद्द केला. माझा प्रश्न आहे की, जर रोजगार हमी योजनेचा निधी रद्द केला तर सरकारी नोकरांकडून आणि गरीब माणसाकडून सरकार महिन्याला व्यवसाय करापोटी जे 50 रुपये किंवा 100 रुपये किंवा 250 रुपयापर्यंत जो व्यवसाय कर वसूल करते तो शासन रद्द करणार आहे काय ? व्यवसाय कर शासन रद्द करणार आहे काय याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी आपल्या भाषणात द्यावे.

.......2

SSK/ KGS/ 16:15

श्री. नितीन गडकरी ......

जर शासन रोजगार हमी योजनेचा निधी रद्द करते तर व्यवसाय कर सुध्दा रद्द करणार काय याचे उत्तर शासनाने द्यावे.

सभापती महोदय, महाराष्ट्र सर्व दृष्टींनी अडचणीच्या काळातून जात आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. पहिल्या नंबरवरील महाराष्ट्र आज सहाव्या नंबरवर गेला आहे. राज्यामध्ये 16/16 तासांचे लोडशेडींग होत आहे. रोजगार हमी योजनेमध्ये मजुरांना काम मिळत नाही. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचे मेळावे घेतले जात आहेत. परंतु खऱ्या अर्थाने त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळणार नाही. मर्सिडीज गाडी विकत घ्यायची झाली तर व्याजाचा दर 7.5 टक्के आणि शेतकऱ्याला ट्रॅक्टर विकत घ्यायचा असेल तर व्याजाचा दर 13 टक्के लावला जातो. या शासनाने सहकारी बँका लुटल्या आहेत. नांदेड जिल्हा बँकेत 275 कोटी रुपयांचा घोटाळा, उस्मानाबाद जिल्हा बँकेत 280 कोटी रुपयांचा घोटाळा, नागपूर जिल्हा बँकेत 150 कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ 16:20

श्री.नितीन गडकरी.........

तुम्ही बँका लुटल्या. सहकाराचे नाव स्वाहाकार केले. सूतगिरण्या, दूधसंस्था, साखर कारखाने, शिक्षणसंस्था लुटल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शाहू महाराजांचे नाव घेऊन लुटण्याचे काम केले. खाऊन खाऊन काय खावे तर शेण खाल्ले. 40 कोटी रुपयांचे शेण खाल्ले. मी आवाहन करतो. का माझ्याविरुध्द खटला दाखल करीत नाही? तुम्ही 40 कोटी रुपयांचे शेण खाल्ले. माझ्याविरुध्द खटला दाखल करा. मी सिध्द करतो. एकही जण पुढे यायला तयार नाही. 9 लाख जनावरे 8 महिने छावणीत होती. एका जनावराने एक ट्रॉली शेण दिले. 9 लाख जनावरांनी किती शेण दिले? 9 लाख ट्रॉली शेणाची किंमत काढा. आठ महिने 9 लाख जनावरांनी दिलेल्या शेणाची किंमत 40 कोटी रुपये होते. मंत्रीमहोदय म्हणतात आम्ही शेण खाल्ले नाही. किती साखर कारखाने, किती दूधसंस्था, किती पॉल्ट्री फॉर्म लुटले? आता खाऊन खाऊन काय खाता? शेण खाता? खाताना तरी दर्जा वाढवा. लालू प्रसादांनी चारा खाल्ला. तुम्ही शेण खाता? खाताना स्टॅण्डर्ड तरी मेंटेन करा. तुम्ही पश्चिम महाराष्ट्रात खाऊन खाऊन काय खाल्ले? शेण खाल्ले. माझ्याविरुध्द एकही जण पुढे येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी त्यांच्या नेत्यांना सांगावे. मी मर्दाची अवलाद आहे. मी मुख्यमंत्री महोदयांकडे माझी कामे करण्यासाठी कागद घेऊन गेलो नाही म्हणून मी बोलू शकतो. माझ्याविरुध्द खटला दाखल करा. एकही जण खटला दाखल करु शकत नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्राची स्थिती अत्यंत वाईट आहे. आर्थिक स्थिती खालावली आहे. गरीब माणसे आत्महत्या करीत आहेत. लोडशेडिंगमुळे संपूर्ण जनरेटर उद्ध्वस्त झाले. महालेखापालांच्या अहवालामध्ये म्हटले आहे की, शासनाकडून 544 कोटी रुपये बजेटशिवाय खर्च केले जात आहेत. जानेवारी महिन्यापर्यंतचा परफॉर्मन्स काय आहे? 9 टक्के, 12 टक्के, 24 टक्के परफॉर्मन्स आहे. महाराष्ट्राचे तुम्ही वाटोळे केले आहे. श्री.नरेंद्र मोदींनी गुजराथ राज्य पहिल्या क्रमांकावर नेले. आज आपण काय केले?....(अडथळा)....राजीव गांधी फाऊंडेशनने देशातील सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री म्हणून श्री.नरेंद्र मोदींना स्थान दिले. ज्यांच्या नावाने तुम्ही सतत बोटे मोडीत असता......(अडथळा).....

श्री.जितेंद्र आव्हाड : (जागेवर बसून) मध्यप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी काय केले?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : तुम्ही एफएसआय बदलून डेव्हलपमेंट प्लॅन करता. मध्यप्रदेशपेक्षा ते छोटे आहे? 5 डम्परची किंमत किती? 10 लाख रुपये आहे. ती चिल्लर गोष्ट आहे. 10 लाख रुपये कोणी मुख्यमंत्री खाईल का? राष्ट्रवादी पक्षाचा एखादा कार्यकर्ता बदलीचे प्रकरण मंजूर करण्यासाठी काय करतो ते विचारा. महाराष्ट्राची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. वेदनेला अंत नाही आणि शासनाला खंत नाही......(अडथळा)....त्यांची महाभारतातील द्रौपदीची भूमिका आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आमचे मित्र आहेत.

(नंतर श्री.खर्चे........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे उल्हासनगरमध्ये आमच्याबरोबर असतात तर ठाण्यात तुमच्याबरोबर असतात तर कधी मुंबईत सहाव्या मजल्यावर हितगुज करीत असतात, अशा प्रकारे ते सर्वांच्याच बरोबर आहेत. त्यांची भूमिका म्हणजे "रंगात रंगुनी रंग माझा वेगळा" अशी आहे.

महोदय, हे बजेट म्हणजे एक थोतांड आहे आणि या शासनाने या राज्याची वाट लावली आहे. आज आपल्या राज्याचे रेटिंग काय आहे ? कोठून एवढा पैसा उभा करणार आहात ? हॉं हिंमत असेल तर शासनाने जाहीर करुन दाखवावे, इतकी राज्याची स्थिती वाईट झालेली आहे. याराज्याला डुबविण्याचे काम, काळाकुट्ट इतिहास लिहिण्याचे काम या शासनाने केले आहे म्हणून भविष्यातील पिढी यांना कधीही माफ करणार नाही, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

---------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित सेवेत घेणे

**मु.शी.**: कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या शिक्षकांना नियमित सेवेत घेणे यासंबंधी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे निवेदन केले त्यावरुन दोन तीन प्रश्न निर्माण होतात. त्या अनुषंगाने मला विचारावयाचे आहे की, एकही वस्ती शाळा शिक्षक बाहेर जाणार नाही, याचे अभिवचन शासन देणार काय ? कारण त्यांनी या शाळांवर सात-सात वर्षे अतिशय त्यागाने काम केले आहे, कोणतेही शिक्षक त्या शाळांवर जात नव्हते अशा परिस्थितीत त्यांनी काम केले आहे. या शिक्षकांना अप्रशिक्षीत शिक्षकांची वेतनश्रेणी शासन देणार काय ? कारण त्याची आवश्यकता आहे. ही वेतनश्रेणी शासनाने व्हीजेएनटीला दिलेली आहे, त्यानुसार या शिक्षकांनाही लागू करणार काय ? सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे ती शासन घेणार काय ? कारण हे शिक्षक अतिशय गरीब घराण्यातील मुले आहेत. तिसरा मुद्दा असा आहे की, हे शिक्षक डी.एड. झालेले आहेत आणि दहा महिन्यांचा कॉन्ट्रॅक्ट त्यांच्याकडून करुन घेतला जातो व त्याऐवजी अकरा महिने काम करुन घेण्यात येते. या चार मुद्यांचा खुलासा मंत्री महोदय करतील काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, वारंवार सभागृहात आपण सांगितलेले आहे की, वस्ती शाळेचे शिक्षक कमी केले जाणार नाहीत. प्रश्न असा आहे की, या शिक्षकांना नियमित करावे, अशी मागणी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे हे करण्यात आपल्याला अडचणी आल्या. परंतु ज्या पध्दतीने एस.टी., व्ही.जे.एन.टी.चे अप्रशिक्षीत शिक्षक आपण नेमतो त्याप्रमाणे वस्ती शाळांमध्ये शिक्षक सुध्दा नेमावेत ही बाब शासन तपासून घेईल. त्यांना नियमित करणे हे शासनाचे कामच आहे पण कायद्याच्या अडचणीमुळे आपण ते करु शकलो नाही, यापुढे ते करावेच लागेल.

श्री. कपिल पाटील : महोदय, जे शिक्षक डी.एड. झालेले आहेत त्यांना अभ्यंकर समितीच्या शिफारशीनुसार आपण सुविधा देणार काय ? तसेच 11 महिन्यांचा करार करुन घेतला जातो त्या ऐवजी 10 महिन्यांचाच पगार त्यांनादिला जातो, याचाही विचार करणार काय ? तसेच सेवांतर्गत प्रशिक्षणाची जबाबदारी शासन घेणार काय ?

श्री हसन मुश्रीफ : पत्राद्वारे डी.एड.ची योजना शासनाकडूनच असते. सेवेत 10 महिनेच ठेवता येईल तसेच सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, या शिक्षकांना कायम करण्याचा प्रयत्न करीत आहोत परंतु कायद्याच्या अडचणीमुळे आपण थांबलेलो आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2008-2009 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा.

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. हा अर्थसंकल्प ऐतिहासिक आणि उत्तम प्रकारचा आहे या निष्कर्षाप्रत मी व्यक्तिश: आलेलो आहे. महाराष्ट्र शासनाने पाठपुरावा केला आणि केंद्रशासनाने 60 हजार करोड रुपयांची कर्ज मुक्ती महाराष्ट्रातील आणि देशातील शेतक-यांना केल्यामुळे शेतक-यानी दिवाळी साजरी केली. ही दिवाळी साजरी होत असतांना साक्षीदार राहण्याचा माझ्या आयुष्यात हा योग आला. मला या निमित्ताने कविवर्य विठ्ठल वाघ यांची एक कविता आठवते ती अशी आहे.

"तुया रुपाची नवरी कधी येणार म्हणून । माह्या डोयाची पालखी उभी सजून-धजून ।
तूवं हसन-बोलन जशी वाजती सनई । माह्या अंगोपांगी मंग होते साजरी दिवाई ।
आगासात चंद्र येते काय चाटावा लागते । तुहया वाचून पुनीव माही होणारच नाही ॥"

अशा प्रकारची पोर्णिमा साजरी करणारा महाराष्ट्रातील शेतकरी पाहिल्यानंतर त्यांच्या आयुष्यामध्ये पोर्णिमेच्या चंद्रापेक्षाही कर्ज मुक्तीचा चंद्र हा अविस्मरणीय आणि नयनमनोहर वाटला त्याबद्दल शेतक-यांच्या दुवा महाराष्ट्र शासन आणि केंद्रशासनाला मिळाल्याशिवाय राहणार नाही फक्त माझी माननीय अर्थमंत्र्यांना आणि राज्यशासनाला विनंती आहे की, 5 एकराच्या पुढील जे 15 एकरपर्यंतचे जे शेतकरी आहेत त्यांचाही आपण विचार करावा. कारण या देशाला संस्कृती दिली ती शेतक-यांनी, या देशातील प्रथम क्रमांकाचे ऋषी आणि मुनी होते ते स्वत:च्या शेतात तांदूळ पिकवित असत. व्यास, वाल्मिकीसारखा ऋषी स्वत:च्या शेतात तांदूळ पिकवित असे. उदरनिर्वाहाचे साधन म्हणून स्वत:च्या शेतीकडे पाहणारे ऋषी या देशामध्ये आणि महाराष्ट्रात होऊन गेलेले आहेत त्यामुळे या देशाला संस्कृती दिली ती शेतक-यांनी. त्यामुळे शेतक-यांचा विचार अग्रक्रमाने महाराष्ट्र शासनाने करावा अशा प्रकारची आग्रहाची विनंती मी करणार आहे. दुष्काळ पडल्यानंतर महाराष्ट्रातील शेतक-यांची चौथाई आणि त्यांचा शेतसारा माफ करणारे छत्रपती ज्या महाराष्ट्रात झाले आणि या महाराष्ट्रातील गोर-गरीब घटक हा माझ्या देव्हा-यातील देवता आहे हे समजून महाराजांनी महाराष्ट्रात काम केले. त्या महाराष्ट्रामध्ये आमचे राज्य शासन आणि अर्थमंत्री छत्रपती महाराजांचा आदर्श घेऊन महाराष्ट्राचा कारभार करतात, तेव्हा माझी आपणाला विनंती आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश नवले .....

या शेतक-यांचा आपण विचार करावा. संत तुकाराम महाराज आणि त्यानंतर भंडारा डोंगर, आळंदी, देहू आणि पंढरपूर या सर्व परिसराचा विकास महाराष्ट्र शासन करणार अशी घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. मला असे वाटते की, महाराष्ट्रातील लाखो वारक-यांना हा साष्टांग दंडवतच आहे. संत तुकाराम हे संतामध्ये वैज्ञानीक दृष्टिकोन ठेवणारे आणि महाराष्ट्रातील एका अर्थाने पुरोगामी विचारांचे संत होते. संत तुकाराम महाराजांनी सुलभ धर्माचरण लोकांसमोर ठेवले होते आणि सांगितले ,

अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । त्याच्या गळामाळा असो नसो ॥
आत्मा अनुभवी चोखाळील्या वाटा । त्याच्या माथा-जटा असो नसो ॥

सभापती महोदय, जटांची आवश्यकता नको तो धर्म सांगणा-यांना, कारण मी माझ्या आचारसंहितेमध्ये धर्म पाळतो त्यामुळे मला जटांची आवश्यकता नाही आणि स्वत:ची शुध्द आचारसंहिता ठेवत असतांना संत तुकाराम महाराजांनी सांगितले की,

पापाची वासना नको दाऊ डोळा त्याहूनी आंधळा बराच मी ।

पापांची वासना ज्यांच्या तन-मनामध्ये रुजलेली आहे हे फक्त अधर्म सांगण्याचे काम आणि लोकांच्या भावना भडकविण्याचे काम करतात त्यांच्या पासून महाराष्ट्राने सावध रहावे, अशा प्रकारची विनंती या निमित्ताने करावीशी वाटते. संत तुकारामांच्या नंतर संत ज्ञानेश्वर माऊलीचा परिसर महाराष्ट्र शासन सुशोभित करणार आहे, यासंदर्भात बजेटमध्ये सुध्दा उल्लेख करण्यात आलेला आहे. संत ज्ञानेश्वरांनी आयुष्यभर दु:खे सोसली, मी तर असे म्हणेन की, शिक्षण मंत्री येथे उपस्थित आहेत. सोशिकतेचा शिरोमणी म्हणून संत ज्ञानेश्वरांचा उल्लेख आपल्याला संताच्या मांदियाळीमध्ये करावा लागेल इतके त्यांनी आयुष्यभर सोसले. तरी त्यांनी प्रार्थना केली की,

"दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो ते लाहो, प्राणिजात ॥

लोकांना जे जे आवश्यक आहे ते ते सर्व आपण अर्थसंकल्पात दिले त्यासाठी मनापासून आपल्याला धन्यवाद द्यावेत तेवढे कमीच आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश नवले..

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी हे करमणूक करुन येथून गेल्या नंतर त्यांचा किल्ला कोण लढविणार आहे हा यानंतरचा प्रश्न आहे. परंतु मला माननीय अर्थमंत्र्यांना अशी विनंती करावयाची आहे की, या अर्थसंकल्पामध्ये ज्या काही थोडया फार तरतुदी केल्या नसतील तर त्या करण्यात याव्यात . यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे.पंढरपूर हे महाराष्ट्रातील सगळया लोकांचे महा दैवत आहे. चंद्रभागेच्या तीरावर त्या ठिकाणी आसनस्थ झालेल्या पांडुरंगाला आणि रुक्मिणीला पाहिल्यानंतर वारकऱ्यांचे हृदय भरुन आल्याशिवाय राहत नाही. त्या वारक-यांना या अर्थसंकल्पामध्ये संतुष्ट करण्याचा प्रयत्न या शासनाने केला आहे त्याबद्दल मी या शासनाला मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, आदिवासीच्या मुलांसाठी तरतूद करण्यात आली असल्याचा उल्लेख माननीय अर्थ मंत्र्यांनी अर्थसंकल्पात केलेला आहे. आदिवासी मुलानी शिकावे म्हणून या वर्षी जादा तुकडयांना मान्यता देण्यात येणार आहे आणि सैनिकी शाळा सुरु करण्यात येणार आहेत. या आदिवासींचा पूर्वज कोण होता हे जर आपण पाहण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला असे दिसून येईल की, आदिवासींचा पूर्वज हा एकलव्य होता. शाळेमध्ये आणि महाविद्यालयामध्ये शिकत असतांना आमचे शिक्षक आणि प्राध्यापक आम्हाला असे सांगावयाचे की, "एकलव्या प्रमाणे तुम्ही एकाग्रता धारण करण्याचा प्रयत्न केला तर आयुष्यात तुम्ही सर्व काही प्राप्त करु शंकाल." तेव्हा एकलव्यामध्ये जी एकाग्रता होती ती एकाग्रता आदिवासी मुलांमध्ये आहे. आदिवासी मुले शिक्षण घेत आहेत व त्यांच्याकडे निपुणता आहे. फक्त त्या बाबतीत चालना देण्याची आवश्यकता होती आणि ही चालना देण्याचे काम महाराष्ट्र शासन करीत आहे. या बाबतीत मी महाराष्ट्र शासनाचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, हे शासन 140 वसतीगृहे स्थापन करणार आहे आणि 36 हजार विद्यार्थी या वसतीगृहामध्ये राहणार आहेत. या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेत आणि वसतीगृहात आयुष्याची जी शिदोरी मिळणार आहे ती बाब महत्वाची आहे. त्यामुळे आदिवासींचा विचार करणारे हे महाराष्ट्र शासन पुरोगामी आहे फक्त महात्मा फुले यांचे नाव घेऊन चालणार नाही तर महात्मा फुले यांच्या वाटेवरुन जावे लागेल आणि एक नवीन वाट निर्माण करावी लागणार

..... एक्सएक्स 2 ...



VTG/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 16:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे तेव्हा अशा प्रकारे एक नवीन वाट निर्माण करणारे महाराष्ट्र राज्य कदाचित देशातील पहिले राज्य आहे म्हणून या बाबतीत महाराष्ट्र शासनाचे मी मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये दारिद्रय रेषेखालील आठवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या ज्या मुली आहेत त्यांना सायकल देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. मला अशी विनंती करावयाची आहे की, दारिद्रय रेषेखालील जी मुले शिक्षण घेणारे आहेत त्यांना देखील सायकल देण्याचा विचार करण्यात यावा. त्याचे कारण असे आहे की, एखाद्या दारिद्रय रेषेखालील कुटुंबामध्ये जर मुलीला सायकल देण्यात आली असेल तर माझी बहिण दारिद्रय रेषेखालील आहे म्हणून तिला सायकल दिली आहे परंतु मला मात्र दिली गेली नाही मी जर मुलगी असतो तर बरे झाले असते असा विचार या मुलाच्या मनामध्ये येण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे या मुलांना सायकल देण्याचा विचार करावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील विमान तळांचा विकास करण्यात येणार आहे. लातूर येथील विमानतळसुध्दा विकसित करण्यात येणार आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्याना विमानाने जाण्या येण्याची सोय होणार आहे. त्याबद्दल मला आनंद वाटतो. माननीय मुख्यमंत्री हे आमच्या शेजारच्या जिल्हयातील आहेत, ते आमचे नेते असून महाराष्ट्राचे नेतृत्व खंबीरपणे करीत आहेत या सगळया गोष्टींचा मला अभिमान आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, . परळी-बीड-अहमदनगर असा रेल्वे मार्ग सुरु करण्यात यावा अशी बीड जिल्हयाची गेल्या 50 वर्षापासून एक मागणी परंतु ही मागणी अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नाही. मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती की, "रोजगार हमी योजनेतून या कामासाठी महाराष्ट्र शासन काही वाटा उचलणार आहे.त्यानंतर केन्द्र शासन या रेल्वे मार्गाच्या भरीव निधीला मंजुरी देणार आहे." या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये केन्द्र सरकारने या रेल्वे मार्गासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तेव्हा राज्य शासनाने जर काही वाटा उचलला तर या रेल्वचे मार्ग पूर्ण होऊ शकेल . सहा वर्षाचा आमचा कालावधी आहे तेव्हा आमचा कालावधी संपण्याच्या अगोदर अधिवेशनासाठी रेल्वेत बसून आम्हाला येथे येता येईल. तेव्हा त्या दृष्टीने शासनाने विचार करावा अशी मी शासनाला आग्रहपूर्वक विनंती करीत आहे.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, आकाशाच्या छताखाली प्रसंगी अल्लाचे नामस्मरण करणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी नागपूर येथे हज हाऊस उभे करण्याचा शासनाने केलेला प्रयत्न म्हणजे महाराष्ट्रातील सर्व धर्मियाना आपण असा संदेश देत आहोत की, हे राज्य हिंदूचे, मुस्लिमांचे, ख्रिश्चनांचे तसेच बौध्दांचे आहे. अशा प्रकारे सर्व धर्मियांचे हे राज्य आहे असा संदेश देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न अत्यंत प्रामाणिक आहे. त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो व आभार मानतो.

सभापती महोदय, मालवणच्या पश्चिमेला ॲग्रिया बॅन्क हा टापू आढळून आला आहे.120 किलो मिटर्स अंतरावर समुद्रामध्ये हा टापू असून त्यांची लांबी 39 किलोमिटर्स , रुंदी 20 किलोमिटर्स व खोली 20मिटर्स एवढी आहे. ते ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून चांगल्या प्रकारे विकसीत करता येऊ शकेल. त्या ठिकाणी जगातील सर्व पर्यटक येऊ शकतात. त्यामुळे जगामध्ये मालवणचे नाव जाऊ शकते. या अगोदर महाराष्ट्रामध्ये आणि भारतामध्ये मालवणचे नाव गेलेले आहेच. मालवणी कोहिनूर हा देशाला आणि महाराष्ट्राला समजलेला आहे...... अडथळा .....कोकण हा महाराष्ट्रातच आहे हे सन्माननीय सदस्यांनी विसरता कामा नये. परंतु पर्यटनाच्या दृष्टीने जगाच्या नकाशावर मालवणचे नाव कोरले जाईल या दृष्टीने विचार केला पाहिजे तसेच यापूर्वी सुध्दा महाराष्ट्रामध्ये मालवणचे नाव मालवणी कोहिनूरने कोरुन ठेवलेले आहे. फक्त त्याबाबतीत एवढेच सांगणे आहे की , महसुलाचे कोंदण या मालवणी कोहिनूरला कमी पडत आहे, थिटे पडत आहे. एवढेच मी सभागृहाच्या निदशर्नास आणून देऊ इच्छितो.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले....

काँग्रेसचे राज्य सरकार आहे हे आम आदमीचे आहे. म्हणजे ज्या माणसासमोर भागवत आणि भगवंत आहे, त्याचे जे काही रूप आहे ते सर्वसामान्य माणसाच्या दृष्टीने पाहिले तर भाकरी, भागवत आणि तोच आमचा भगवंत. हे समजणारा सर्वसामान्य माणूस महाराष्ट्रात जगतो आहे. आणि या सर्वसामान्य माणसासाठी हे महाराष्ट्र शासन काम करते. त्यामुळे अशा शासनाच्या पाठीमागे पुढील 25-30 वर्षे आपणही उदार अंत:करणाने राहावयास हवे, पण एवढा मोठेपणा आपल्याकडे नसल्यामुळे तसे आपण राहू शकणार नाही याचीसुद्धा मला खात्री आहे. त्यामुळे सभापती महोदय, हे राज्य शेतकऱ्यांचे आहे. शेतकरी जगला पाहिजे या भावनेने काम करणारे हे सरकार आहे. मध्यंतरी आमच्याकडे एक आंदोलन झाले त्यासाठी एक नेते येऊन गेले आणि त्यावेळी काही सैनिकांनी त्यांच्या हाती आसूड दिला. सभापती महोदय, आपल्याला आश्चर्य वाटेल की, त्या नेत्यांनी तो आसूड उलटा धरला. शेवटी एका सैनिकाला सांगावे लागले की, साहेब, हा आसूड असा धरत नाहीत, असा धरावा लागतो. त्यानंतर त्यांनी मग जाहीर सभेमध्ये तो आसूड फडकावून सांगितले की, आम्ही या आसूडाने सडकून काढू. ज्यांना हातामध्ये आसूड धरता येत नाही. आसूड धरल्यानंतर यांच्या हाताला फोड येण्याची शक्यता आहे. कारण शेवटी उभे आयुष्य चमचा-काट्यांनी जेवण घेण्यात गेले, काळ्या मातीचा आणि त्यांचा कोठे दूरान्वये देखील संबंध आलेला नाही त्यांनी शेतकऱ्यांविषयी उच्च रवाने बोलावे यासारखी महाराष्ट्रातील शोकांतिका दुसरी कोठलीही असू शकत नाही असे मला वाटते. सभापती महोदय, या सभागृहामध्ये माझे विचार मांडण्याची जी आज संधी मिळते आहे ती आदरणीय आमच्या नेत्या श्रीमती सोनियाजी गांधी, आमचे आदरणीय नेते श्री.राणेसाहेब आणि राज्याचे माननीय मुख्यमंत्री या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये जो सामान्य माणूस आहे त्याचा संदर्भ सापडेल. या अर्थसंकल्पात जे ज्येष्ठ नागरिक आहेत त्यांचा अंतर्भाव आहे, निमआराम गाड्यांमध्ये त्यांना सवलत दिलेली आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प महाराष्ट्रातील सर्वसमावेशक लोकांचा आहे, या अर्थसंकल्पामध्ये आम आदमीची छबी डोळयासमोर उभी राहते. माझ्या मनात एक प्रश्न उभा राहतो की, आपण जे सांगितले की, 64.19 टक्के प्रशासकीय खर्च हा 2008-09 मध्ये वाढणार आहे. निवृत्ती वेतन, वेतन आणि व्याज या गोष्टींमुळे हा खर्च इतका वाढणार असेल तर साहजिकच

...... वायवाय 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवले .....

विकास कामांसाठी निधी हा कमी पडणार आहे. त्यामुळे हा प्रशासकीय खर्च थोडा कमी करण्याचा संकल्प सोडावा, त्यासाठी प्रयत्न करावेत अशी आग्रहाची विनंती करून पुन्हा एकदा महाराष्ट्र सरकारचे मी अभिनंदन करतो आणि कविवर्य सुरेश भटांची एक गझल सांगून माझे भाषण संपविणार आहे. सभापती महोदय, येथे इतके रसिक श्रोते असतील तर मी गझलांवर गझल गायला तयार आहे. असो.

मठोमठी मंबाजींना कीर्तने करू द्या ।
विठू काय बेईमानांना पावणार आहे ? ॥

जयहिंद, जय महाराष्ट्र ।

***

( यानंतर श्री. सरफरे ....झेडझेड 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माझ्या भाषणापूर्वी माननीय सदस्यांनी या अर्थसंकल्पाचे फार सुंदर वर्णन केले आहे. "शिमगा आल्यानंतर कवित्व येते". मालवणीमध्ये अनेक गावात अशी म्हण आहे की, "शिमगो इलो की, कवित्व येता" ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उच्चारलेले वाक्य बरोबर नाही. कवित्व ही फिलॉसॉफी आहे. जरी ती म्हण असली तरी त्या शब्दाचा अवमान होऊ नये अशी माझी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : माननीय प्रा. पुरके साहेब, आपण शिक्षण मंत्री असल्यामुळे आपण त्या शब्दाचे विश्लेषण करुन पहावे....

श्री. भास्कर जाधव : "शिमगा आल्यानंतर सोंगे येतात" अशाप्रकारची ती म्हण आहे...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी केलेल्या सुधारणेबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. त्यांनी या अर्थसंकल्पाला पोर्णिमेच्या चंद्राची अतिशय सुंदर उपमा दिली. शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये पोर्णिमेच्या चंद्राचा प्रकाश पडो, आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात पुन्हा एकदा दिवाळी साजरी होवो अशी भावना या सभागृहातील माननीय सदस्यांची आहे. परंतु दुर्दैव असे आहे की, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या अजूनही थांबत नाहीत. शेतकऱ्यांसाठी हजारो कोटी रुपयांचे पॅकेज दिले. यु.पी.ए. सरकारने सर्व काही दिले तरीसुध्दा त्यांच्या आत्महत्त्या थांबत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यापासून सत्ताधारी पक्ष दूर जाऊ शकत नाही. आज 5 एकराच्या आतील शेतकऱ्यांनी कर्जमाफी योजनेचा स्वीकार केला असला तरी शेतकरी 15 एकरापर्यंत जमिनीची मर्यादा वाढविण्याची मागणी करीत आहेत. 5 एकरापर्यंत शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या खिशामध्ये ज्या दिवशी पैसे जातील त्या दिवसाची ते वाट पहात आहेत. माननीय बॅ. अंतुले साहेब मुख्यमंत्री असतांना त्यांनी बँकेमार्फत शेतकऱ्यांना 10 हजार रुपयांची मदत दिली होती. त्यावेळी दिलेले पैसे पुन्हा मिळण्यासाठी त्या बँका आजपर्यंत कोर्टामध्ये खेटे घालीत आहेत. तरीही त्यांना पैसे मिळाले नाहीत. या वस्तुस्थितीपासून कॉंग्रेस सरकारने दूर जाता कामा नये. सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, आपण शेतकऱ्यांना पैसे देतो, ते देत असतांना त्यांची मानसिकता ओळखून घेणे गरजेचे आहे. खरे म्हणजे शेतकऱ्याचे दु:ख काय आहे? ते आत्महत्त्या कां करीत आहेत? उगीच कुणी आत्महत्त्या करीत नाही. ज्या दिवशी त्यांच्या भावनेचा कडेलोट होतो त्या दिवशी तो शेतकरी आत्महत्त्या करतो. आत्महत्त्या करण्यासाठी एका प्रोसेसमधून जावे लागते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

डॉ. दीपक सावंत....

"To be or not to be". आपण या गोष्टीला सामोरे जावयाचे की नाही याबाबतचा डिलेमा असतो. मी उद्या सकाळी उठल्यावर आत्महत्त्या करणार आहे याबाबत तो आदल्या रात्री विचार करु शकत नाही. त्याकरिता त्याला समुपदेशन करण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत राज्य शासनाने विचार केलेला नाही..

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांवर अनेक प्रसंग येतात. त्या प्रसंगामधून शेतकरी जात असतांना तो बँकेचे, सावकाराचे कर्ज घेतो. त्याने कर्ज घेतल्यानंतर त्याच्या वसूलीचा तगादा लावला जातो. अशावेळी त्याची मानसिकता ओळखली गेली पाहिजे. या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने माझी शासनाला सूचना आहे की, त्याच्या गावामधील त्याचा खरोखरचा मित्र त्याला जाणून घेईल. ज्याप्रमाणे अंगणवाडी सेविका आणि आरोग्यमित्र प्रत्येक गावामध्ये काम करीत आहेत. त्याप्रमाणे शेतकऱ्याचा मित्र त्याचे दु:ख जाणून घेऊन तो राज्य सरकारला सांगेल. त्याचे म्हणणे राज्य सरकारपर्यंत, रिस्पेक्टिव्ह ऑफिसरपर्यंत पोहोचवेल, तलाठी, तहसिलदार यांचेपर्यंत पोहोचवेल. आत्महत्त्याच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या शेतकऱ्याला शासनाने पाठीमागे आणले पाहिजे व त्याकरिता काहीतरी उपाय योजना केली पाहिजे अशी माझी सूचना आहे. सभापती महोदय, आपण जरुर पहावे की, आज दररोज 22, 27, 30 आत्महत्त्या होत आहेत. त्याच्या मागील कारण शोधण्यास राज्य सरकारला अपयश आले आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामधून मुंबईसाठी काय मिळाले आहे? मुंबईला काहीच मिळाले नाही असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. मुंबईमध्ये मध्यमवर्गीयांकरिता 10 लाख घरे देण्याची फार मोठी घोषणा केली. त्याकरिता चटईक्षेत्र निर्देशांकामध्ये 1.33 टक्क्यापर्यंत वाढ केली.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

सभापती महोदय, ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी घरे प्रस्तावित केलेली आहेत. शहरी भागातील लोकांची, तसेच झोपडपट्टीमध्ये रहाणारे जे लोक आहेत, त्यांची मानसिकता असते.आतापर्यंत आपण अनेक योजना राबविल्या आहेत आणि त्यावेळी असे दिसून आले आहे की, अतिशय गरीब कुटुंबातील माणसाला घर दिले तरी त्या घराचा मेन्टेनन्स, इतर बिले वगैरे देण्याची क्षमता त्यांच्यामध्ये नसते आणि आपण सर्वांनी या वस्तुस्थितीला सामोरे गेले पाहिजे. मग काही दिवसांनी तो माणूस ते घर विकतो आणि पुन्हा झोपडीमध्ये येऊन राहू लागतो. परंतु त्याचे घर कोण विकत घेतो ? तर आपल्यापैकीच धनदांडगे किंवा त्याच सोसायटीतील धनदांडगे ते घर विकत घेतात. त्या लोकांचा मात्र उत्कर्ष होतो. पूर्वी जो माणूस गेली दहा वर्षे झोपडीमध्ये रहात होता, तो केवळ सहा महिने दोन खोल्यांच्या घरामध्ये राहिल्यानंतर पुन्हा झोपडीमध्ये रहावयास जातो अशी मुंबई शहरातील परिस्थिती आहे. याबाबतीत आपण काय करणार आहात ? आज शासन शहरी भागातील झोपडपट्टीवासियांना, कमी उत्पन्न गटातील लोकांना प्रदीर्घ आशावाद देत आहात. परंतु यामधून बिल्डर लोकांचेच फावणार आहे. बिल्डर 225 स्वे.फू.च्या दोन सदनिका तयार करुन त्या झोपडपट्टीवासियांसाठी बांधलेल्या आहेत असे शासनाला दाखविण्यात येईल. पण नंतर 225+225 या दोन सदनिका जॉईंट करतील, मधली भिंत काढून टाकतील आणि 450 स्वे.फू.घर मध्यमवर्गीय माणसांना किंवा उच्च मध्यमवर्गीय माणसांना विकतील. परंतु अशा वेळी संबंधित माणसाने ते घर कधी विकावे? त्याचा मेन्टेनन्स काय रहाणार आहे ? त्या माणसाला घरासाठी दर महिना किती पैसे मोजावे लागणार आहेत ? यासंदर्भात आपण कोणते निकष लावणार आहात ? गरीब माणसाच्या खिशातून जाणारा हा पैसा आहे आणि तेवढा पैसा तो माणूस खर्च करु शकेल काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. जर तो माणूस हा पैसे खर्च करु शकला नाही तर ही योजना नुसतीच आशावादी राहील आणि आपण देखील खुशीत गाजर खात रहाल की, आपण लोकांसाठी एक चांगली योजना तयार केली. पण वास्तविक समाजातील जो शेवटचा घटक आहे, ज्याच्यासाठी ही योजना राबविणार आहात, त्याला मात्र काहीच मिळणार नाही.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये पाण्याचा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.परवाच मी एका चॅनेलवर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाडसाहेबांना ठाणे येथील पाण्याच्या प्रश्नाबाबत बोलताना पाहिले. आज मुंबईमध्ये इमारतींच्या पुनर्बांधणीचे बरेच प्रस्ताव तयार होत आहेत. मी

. . . .3 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.राजेश टोपेसाहेबांना यावर अंकुश आणण्याबाबत सूचना केली होती. आज अशी स्थिती आहे की, एकेका गल्लीमध्ये 6-6, 8-8 इमारतींची पुनर्बांधणी सुरु आहे. पण स्थिती अशी आहे की, इमारतींची पुनर्बांधणी करतात आणि त्यावेळी पूर्वी असलेली 6 इंचाची पाईप लाईन असेल तर टॉवरसाठी 9 इंचाची पाईप लाईन घेतली जाते. त्यामुळे जे जुन्या इमारतीमध्ये रहाणारे भाडेकरु असतात, तेथील पाण्याचा फोर्स कमी होतो आणि पाण्याची टंचाई निर्माण होते. म्हणून यासाठी एक नियमावली केली पाहिजे की, एखाद्या इमारतीची किती वर्षांनी पुनर्बांधणी करता येईल ? कारण काही लोक 24 तास पाण्याचे सुख उपभोगतात. घरामध्ये 24 तास झॅक्युझे लावतात, घरामध्ये स्टीम लावतात, आणखी काय-काय सोयी करतात. यासाठी आपल्याकडे कोणतेही नियम नाहीत, कोणताही कायदा नाही. कोणत्याही प्रकारचे एक्स्ट्रॉ बिल दिले जात नाही. वास्तविक जे लोक फ्लॅटमध्ये झॅक्युझे लावतात, स्टीम लावतात, त्यांच्याकडून पाण्याच्या बिल हे कमर्शिअल रेटने घेतले पाहिजे. परंतु आपण काय करीत आहात ? तर कोकाकोला, बिसलरी, पेप्सी या कंपन्यांना पाणी विकत आहोत. दोन पैसे प्रति लिटरने या सर्व कंपन्यांना पाणी विकले जात आहे. आज दिवसेंदिवस भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाडसाहेबांनी पाण्याच्या प्रश्नासंबंधात सांगितले. ते दूरदर्शनवरुन असे म्हणाले होते की, अजून तुम्हाला मातोश्रीवरुन कसे काय सांगण्यात आले नाही ? त्यानंतर त्यांनी माननीय श्री.एकनाथ शिंदे यांचे स्टेटमेंट ऐकले असते तर बरे झाले असते. या सगळया योजना कुठे अडकतात ? तर या योजना राज्य शासनाच्या लाल फितीमध्ये अडकलेल्या आहेत. त्यामुळे ठाण्याचा पाणी पुरवठा बरोबर होत नाही असे त्यांचे म्हणणे होते. याकडे देखील लक्ष देणे आवश्यक आहे.

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : म्हणून लोकांच्या घरातील मडकी फोडावयाची काय?

डॉ.दीपक सावंत : मडकी फोडण्याच्या जो विषय आहे, त्यावर मी नंतर बोलतो. आज मुंबईकरांचे दरडोई उत्पन्न वाढलेले आहे, लिव्हींग स्टॅण्डर्ड वाढलेले आहे. मुंबई शहरातील दरडोई उत्पन्न हे 65 हजार रुपये इतके झाले आहे. पण दुसरीकडे राज्याच्या कर्जाचा बोजा वाढत आहे.प्रत्येक मुंबईकराच्या डोक्यावर आज राज्याच्या कर्जाचा किती बोजा आहे ? तर प्रत्येक

. . . .3 ए-3



डॉ.दीपक सावंत . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईकराच्या डोक्यावर 15 हजार रुपयापेक्षा जास्त कर्जाचा बोजा आहे. पुण्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न किती वाढलेले आहे, तर ते 60 हजाराच्या आसपास आहे. ठाणे शहरातील लोकांचे दरडोई उत्पन्न 58 हजाराच्या आसपास, रायगड मधील लोकांचे दरडोई उत्पन्न16 हजाराच्या आसपास वाढलेले आहे. पण देशामध्ये कर्जाच्या बाबतीत उत्तर प्रदेशचा क्रमांक पहिला आहे आणि त्या राज्यानंतर दुर्दैवाने महाराष्ट्र राज्याचा क्रमांक लागत असून 1 लाख 34 हजार 493 इतकी रक्कम आहे. माननीय अर्थमंत्री महोदय, मी जे सांगत आहे ते बरोबर आहे की नाही? आज प्रगत, पुरोगामी असलेल्या महाराष्ट्र राज्याची ही स्थिती का व्हावी ? तुम्ही किती पापाच्या नावाने ढिंडोरे पिटणार आहात ?

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : हे पाप कोणाचे आहे ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तुम्ही अजून किती वर्षे ढोल वाजविणार आहात ? आपण 2032 सालापर्यंत एम.यु.टी.पी. आणि एम.यु.आय.पी.चा प्लॅन सादर केला आहे. आज मुंबईमध्ये नॅनो गाडी रस्त्यावर येत आहे आणि ती येणार आहे. यावर राज्य शासनाने काही बंधने आणली आहेत काय ? तर नाही. मुंबई शहरातील ट्रॅफीक समस्येबाबत सांगावयाचे तर दररोज किती रुपयांचे इंधन, पेट्रोल, डिझेल जळत आहे ? याविषयी कोणी विचार केला आहे काय ? तर नाही. आज मुंबईमध्ये दर लाख लोकसंख्येच्या पाठिमागे 12 हजार 92 वाहने आहेत आणि गेल्या आठ महिन्यामध्ये ही संख्या वाढलेली आहे. 2 व्हीलर्स्, मोटर बाईक ही देखील मुंबईतील एक मोठी समस्या झालेली आहे.

यानंतर श्री.खंदारे . . . .

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

या समस्येने पादचारी त्रस्त आहेत. परंतु त्याचबरोबर इतर गाडीवाले सुध्दा त्रस्त आहेत. मुंबईच्या ट्रॅफिकमध्ये 8 महिन्यामध्ये किती गाडयांची भर पडली आहे ? साधारणपणे 8 लाखापेक्षा अधिक दुचाकी झाल्या आहेत अशी माझी माहिती आहे.

सभापती महोदय, एमयुटीपी प्रकल्पासाठी साधारपणे 17 हजार कुटुंबांचे शासन पुनर्वसन करणार आहे. प्रत्यक्षात त्यापैकी किती कुटुंबांचे पुनर्वसन झाले त्याची निश्चित आकडेवारी सांगता येत नाही. परंतु कागदोपत्री तरी 17 हजार कुटुंबाचे पुनर्वसन झाल्याचा दावा केला जातो. सभापती महोदय, वांदे-कलानगर असा स्कायवॉक होणार आहे. परंतु वांद्रे ते वरळीपर्यंतच्या सागरी सेतूच्या कामाचे काय झाले ? पुढे वरळी ते नरिमन पॉईन्ट असा सागरी सेतू बांधला जाणार आहे. या सागरी सेतूमुळे जास्तीत जास्त ट्रॅफिकमध्ये भर पडणार आहे. नरिमन पॉईन्टला जात असताना अब्दुल गफार खान चौकापर्यंत हा मार्ग आठ पदरी होणार आहे. अब्दुल गफार खान चौक ते ॲट्रिया मॉलपर्यंत हा रस्ता पुढे चार पदरी होईल व त्यानंतर पुढे दोन पदरी होईल. म्हणजे आठ पदरी रस्ता पुढे दोन पदरी झाल्यावर वाहतुकीची कोंडी होणार नाही काय ? याबाबत कोणीही विचार केलेला नाही. परंतु रोज नवीन नवीन योजना आणल्या जातात. लोकांना भुरळ पाडली जाते. त्याचप्रमाणे माहीमपर्यंत आल्यावर वाहतुकीची प्रचंड कोंडी होते, त्याला जबाबदार कोण आहे ? तेथील अनधिकृत झोपडपट्टया उठविल्या आहेत काय ? माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.अनिल देशमुख हे नेहमी सांगतात की, पेडर रोडवर उड्डाण पूल होणार आहे. काही लोक असे सांगतात की, या उड्डाण पूलामुळे वाहतुकीची कोंडी कमी होणार आहे. वरळी येथे शिरताना ॲट्रिया मॉलपर्यंत दोन पदरी रस्ता आहे. याबाबत शासन विचार करणार आहे की नाही ?

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये राज्यातील बेरोजगारांसंबंधी काहीच उल्लेख केलेला नाही.

यानंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

या राज्यामध्ये साधारणत: 8 लाख 88 हजार 99 विद्यार्थी उच्च माध्यमिक शिक्षण घेत आहेत. त्यापैकी 16 हजार 202 विद्यार्थी अभियांत्रिकी तंत्रज्ञानाकडे जातात. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी 3 हजार 60 विद्यार्थी जातात. इतर पदवीधर झालेले विद्यार्थी 4 लाख 29 हजार 263 आहेत. पदव्यूत्तर पदवीधराची संख्या सांगतो. यात अभियांत्रिकी शिक्षणासाठी 903 आणि वैद्यकीय शिक्षणासाठी 703 एवढी आहे आणि इतर 38 हजार 594 एवढी संख्या आहे. राज्य शासनाकडे रिक्त पदांची संख्या 9 लाख 75 हजार एवढी आहे. एकंदर पदवीधरांची संख्या आणि रिक्त जागा पाहिल्या तर राज्य शासनाचा रोजगार आणि स्वंरोजगार विभाग हा टोटली फेल ठरलेला आहे. ही शासकीय आडकेवारी सांगते आहे. त्या आकडेवारीप्रमाणे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. राज्य शासनाने "रोजगार वाहिनी" अशा नावाची वेफसाईड सुरु केली आहे. रोजगार वाहिनीमध्ये रिक्त पदांच्या जाहिराती दिल्या जातात. ती जाहिरात वाचून उमेदवार अर्ज करतात. परंतु या उमेदवारांना मुलाखती घेतल्या जातात किंवा नाही, त्यांना रोजगार दिला गेला आहे किंवा नाही यासंबंधीचा पाठपुरावा शासनाकडून केला जात नाही. आज नरिमन पॉईंट येथील सेवायोजन कार्यालयात जाऊन पाहणी केली तर या सेवायोजन कार्यालयाकडून आजपर्यंत किती लोकांना रोजगार दिला गेला याची माहिती त्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. राज्यात बी.ए. पर्यंत शिक्षण घेतलेले किती विद्यार्थी आहेत याची माहिती मुंबई विद्यापीठाकडे उपलब्ध आहे. बी.कॉम.

झालेले किती विद्यार्थी आहेत याची माहिती मुंबई विद्यापीठाकडे उपलब्ध आहे. जर मुंबईत तसेच राज्यात किती सुशिक्षित बेरोजगार आहेत याची माहिती जर सेवायोजन कार्यालयाकडे उपलब्ध नसेल तर ही कार्यालये कशाला ठेवली आहेत याचा खुलासा झाला पाहिजे. राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही असे माझे ठाम मत आहे. या राज्यात पूर्वी सुशिक्षित बेरोजगारांना बेरोजगार भत्ता दिला जावयाचा. परंतु आता तो भत्ता बंद करण्यात आलेला आहे. इतर राज्यात मात्र सुशिक्षित बेरोजगारांना दिला जात आहे. महाराष्ट्रातील सुशिक्षित तरुणांना गुन्हेगारीपासून दूर ठेवावयाचे असेल तर बेरोजगार भत्ता दिला गेला पाहिजे अशी माझी मागणी आहे. आज या राज्यात अनेक आय.टी.पार्क होत आहेत. अनेक कंपन्या येत आहेत. परंतु यामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग किती आहे ? मराठी लोकांची संख्या किती आहे ? हा एक महत्वाचा आणि संशोधनाचा विषय आहे.

2...



ABG/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. खंदारे 17:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..

आज आय.ए.एस.,आय.पी.एस.अधिकारी यात मराठी माणसांची संख्या फारच कमी आहे. तसेच ती संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. परप्रांतातील अधिका-यांची संख्या या राज्यात वाढत चालली आहे. यामागे आपल्याकडची शिक्षण पध्दती जबाबदार आहे असे माझे ठाम मत झालेले आहे. आपल्याकडची पेपर्स तपासण्याची पध्दत आणि परराज्यातील पेपर्स तपासण्याची पध्दत यामध्ये फार मोठी तफावत आहे. या गोष्टीचा कुठे तरी विचार करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या भयगंडामुळे विद्यार्थी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होत आहेत. एच.एस.सी.परीक्षेच्या कालावधीत चार ते पाच विद्यार्थ्यांनी आत्महत्या करुन घेतल्या आहेत. बदलत्या मनोवृत्तीप्रमाणे, बदलत्या वातावरणाप्रमाणे, बदलत्या सामाजिक परिस्थितीच्या अनुषंगाने अभ्यासक्रमात सुधारणा करणे आवश्यक आहे. बी.ए., बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण घेतलेले अनेक विद्यार्थी आहेत. परंतु या विद्यार्थ्यांना बी.ए.आणि बी.कॉम पर्यंतच्या अभ्यासक्रमाचा प्रॅक्टीकल परिस्थितीमध्ये काहीही उपयोग होत नाही. अकाऊन्टसी आणि सेक्रेट्रियल प्रॅक्टीस हे विषय सोडले तर कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना सेवेच्या ठिकाणी इतर विषयांचा काही उपयोग होत नाही. आजचे सायन्स कुठे चालले आहे, आजची वाटचाल कशी आहे यासंबंधीची माहिती घेऊन त्याप्रमाणे अभ्यासक्रमात बदल करण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमणे आवश्यक आहे आणि त्या समितीच्या माध्यमातून अभ्याससक्रमामध्ये वेळोवेळी बदल केले पाहिजेत. आपण वेळोवेळी अभ्यासक्रमात बदल केले नाहीत तर बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल पर्यायाने मराठी टक्का घसरत जाईल अशी खंत मी या ठिकाणी नम्रपणे व्यक्त करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण या विषयावर मी माझे विचार मांडणार आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी माननीय वित्तमंत्र्यांनी 175 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. आपण अर्थसंकल्पात असे म्हटले आहे की, जे.जे.रुग्णालयासाठी 11 कोटी, बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयासाठी 33 कोटी, नागपूर मेडीकल आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालयासाठी 16 कोटी, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर यांचेसाठी 2.50 कोटी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयासाठी 1.75 कोटी, औरंगाबाद वैद्यकीय महाविद्यालयासाठी 40 कोटी, सोलापूर येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी 22 कोटी, मिरज येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी 13 कोटी, नांदेड येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी 8 कोटी, धुळे येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी 5 कोटी,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3...

25-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3C-3

ABG/ KTG/ KGS/ SBT/ प्रथम श्री. खंदारे 17:00

डॉ.दीपक सावंत...

अंबेजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयासाठी 6 कोटी आणि नव्याने लातूर येथे झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयासाठी 7 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3D-1

SSK/ KTG/ SBT/ 17:05

डॉ.दीपक सावंत .....

संभाजीनगर येथील डेंटल कॉलेजसाठी 1.5 कोटी रुपये अशी एकूण 175 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. याच सदनामध्ये गेल्यावर्षी जे.जे.हॉस्पीटलसाठी 120 कोटी रुपये एम्सचा दर्जा देण्यासाठी दिले होते. या 120 कोटी रुपयांचे काय झाले त्याचे उत्तर शासनाने द्यावे. आता जे.जे.हॉस्पीटलला पुन्हा 11 कोटी रुपये शासन देत आहे. मंत्रीमहोदयांनी एकदा या रुग्णालयाला भेट द्यावी. या हॉस्पीटलमध्ये आपण कधी ट्रीटमेंट घेतली आहे काय ? मी स्वत: या हॉस्पीटलला परवा भेट दिली होती. 40 कोटी रुपये खर्च करुन आर्थोपेडीक ऑपरेशन थिएटर तयार केलेले आहे. त्याची अवस्था पाहिली तर त्यामध्ये जुने स्ट्रेचर आणि खुर्च्या टाकून ठेवलेल्या आहेत. मी स्वत: डोळयांनी पाहिले आहे आणि माझ्याजवळ यासंबंधीचे फोटो आहेत. एवढे सुंदर ऑपरेशन थिएटर गेल्या सहा महिन्यापासून बंद आहे.ते बंद का आहे हे कोणीही सांगू शकले नाही. डायरेक्टरना विचारले तर ते म्हणतात की ऑर्थोपेडीक पेशंटची ऑपरेशन्स युरॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये होतात. त्या विभागात किडनी प्रत्यारोपण एकही झालेले नाही. आपण पाहतो की देशामध्ये किडनी रॅकेट कार्यरत आहे. गरीब लोकांना किडनी मिळत नाही. दरवर्षी 1 लाख रुग्णांना किडनीची गरज भासते आहे. अशा परिस्थितीत पेशंट जाणार कुठे ? जे.जे.रुग्णालयात ऑर्थोपेडीकची ऑपरेशन्स युरॉलॉजी डिपार्टमेंटमध्ये होतात. या रुग्णालयात जनरल सर्जन एकच आहे. मानसोपचार विभाग बंद आहे. इएनटी विभागात एकच डॉक्टर आहे. एमआरआय आणि सिटी स्कॅन बंद आहेत. 11 कोटी रुपये परत गेले आहेत. आजकाल डायबेटीसचे प्रमाण किती वाढले आहे याची सर्वांनाच कल्पना आहे. जे.जे.हॉस्पीटलमध्ये एन्डोक्रोनॉलॉजी विभाग बंद आहे. लॅप्रोस्कोपिक सर्जरी विभाग सुध्दा बंद आहे. टी.एल.ऑपरेशन्स फक्त केली जातात. नागपूर येथील वैद्यकीय कॉलेजसाठी गेल्या वर्षी 40कोटी रुपये दिले. त्याच्या अगोदर 20 कोटी रुपये दिले.त्याच्या आधीच्या वर्षी 10 कोटी रुपये दिले. पी.जी.कोर्ससाठी आणि रिसर्च डेव्हलपमेंटसाठी पैसे दिले. परंतु एकही पैशाचे संशोधन किंवा पी.जी. म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएशन दिलेले नाही. सगळेच अंबाजोगाईच्या मेडिकल कॉलेजमध्ये जात आहेत. परंतु अंबाजोगाईच्या मेडिकल कॉलेजमध्ये एकही ऑनररी डॉक्टर जात नाही. राज्यातील प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये रेट कॉन्ट्रॅक्ट हा एकच विषय चालतो.

नंतर श्री.भोगले

25-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3E.1

SGB/ SBT/ 17:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांचे रेट कॉन्ट्रॅक्ट कसे होतात? हाय रेट कॉन्ट्रॅक्टमध्ये ज्या कंपन्यांना प्राधान्य द्यायचे असेल त्याप्रमाणे त्या त्या कंपन्यांचे स्पेसिफिकेशन दाखवून त्यांना झुकते माप दिले जाते. मी हा जबाबदारीने आरोप करीत आहे. असे प्रकार सुरु आहेत. या सभागृहामध्ये सांगण्यात मला कोणतीही अडचण वाटत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड हे पूर्वी दवाखान्यामध्ये गेले असावेत. इंजेक्शन देण्यापूर्वी स्पिरिट लावले जाते व त्यानंतर इंजेक्शन दिले जाते.

डॉ.सुनील देशमुख : (बसून) सन्माननीय सदस्य अतिशय मुद्देसूद विचार व्यक्त करीत आहेत. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या उणिवा निदर्शनास आणून देत आहेत. परंतु वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर ज्यावेळी चर्चा होईल त्यावेळी जर या उणिवा मांडल्या गेल्या तर त्या मुद्यांची नोंद अधिकारी गॅलरीमध्ये त्या विभागाचे अधिकारी उपस्थित असतील ते घेतील. आज अधिकारी गॅलरीमध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाचे कोणी अधिकारी उपस्थित असल्याचे दिसत नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी सन्माननीय अर्थराज्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो. आजपर्यंत जे कोणी निदर्शनास आणले नव्हते ते मंत्रीमहोदयांनी याठिकाणी वक्तव्य केले आहे. विभागाच्या मागण्या विधानसभेत चर्चेला येतात आणि मताला टाकून संमत केल्या जातात. या सभागृहात सर्वसाधारण अर्थसंकल्पीय चर्चेमध्ये दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य भाग घेत असतात आणि अर्थसंकल्पातील त्या त्या विभागांच्या उणिवा नजरेस आणून देतात. ती एकप्रकारे सरकारवर टीका होत नाही. त्या उणिवा अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणाबद्दलच्या असतात. प्रत्येक विभागाचा एक अधिकारी माननीय सभापतींच्या आसनाशेजारी असलेल्या अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित राहिला पाहिजे अशी प्रथा आपण सुरु करावी. वास्तविक ती सरकारची जबाबदारी आहे. सभागृहाच्या दृष्टीने ती गॅलरी व्हिजिबल नाही. परंतु ती गॅलरी जरी व्हीजिबल नसली तरी आज त्याठिकाणच्या खुर्च्या रिक्त असल्याचे दिसून येत आहे. ज्या विभागाच्या मागण्या चर्चेला असतात त्यावेळी त्या त्या विभागाचे अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित असतात. परंतु सर्वसाधारण चर्चा सुरु असते त्यावेळी देखील प्रत्येक विभागाचा अधिकारी या गॅलरीमध्ये उपस्थित राहील अशी व्यवस्था करण्यात यावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : ही सूचना चांगली आहे. वरच्या बाजूला असलेल्या गॅलरीमध्ये त्या त्या विभागाचे अधिकारी नोंद घेण्यासाठी उपस्थित असतात. परंतु खालच्या गॅलरीमध्ये देखील त्या त्या विभागाचे अधिकारी उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला मुद्दा केवळ त्यांच्या दृष्टीने मांडला आहे असे नाही. संपूर्ण सभागृहाच्या या भावना आहेत. वरच्या गॅलरीमध्ये अधिकारी उपस्थित असण्यापेक्षा खालच्या गॅलरीमध्ये कक्ष अधिकारी किंवा उपसचिव उपस्थित राहण्यास हरकत काय आहे? विधानसभेत ज्याप्रमाणे मुद्दे मांडले जातात त्याप्रमाणेच या सभागृहात देखील अभ्यासपूर्ण मुद्दे मांडले जातात. याबाबत शासनाने निश्चितपणे विचार केला पाहिजे असे माझे देखील मत आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला मुद्दा अतिशय रास्त आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत याठिकाणी अभ्यासपूर्ण मुद्दे उपस्थित करीत आहेत. वैद्यकीय शिक्षण व आरोग्य या क्षेत्रातील ते निष्णात आहेत. परंतु माननीय राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांचे म्हणणे देखील योग्य आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून कार्यवाहीची अपेक्षा आहे असे अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आपण सरकारला आदेश द्यावेत. गॅलरीमध्ये जे तीन अधिकारी उपस्थित आहेत ते कोणत्या विभागाशी संबंधित आहेत याची मला माहिती नाही. त्यामुळे मी आज अर्थसंकल्पावर भाषण न करता उद्या करणार आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत वैद्यकीय शिक्षण विभागाशी संबंधित अत्यंत महत्वाच्या त्रुटी निदर्शनास आणून देत आहेत. अर्थसंकल्पामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात काय उणिवा आहेत हे सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत. सभागृहाच्या ज्या भावना आहेत त्या कामकाज सल्लागार समितीसमोर मांडाव्या लागतील. तेथे निर्णय झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : मला वाटते माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधीची नोंद घ्यावी, कारण हे सभागृहात सतत घडत असते.

श्री. भास्कर जाधव : महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी सभागृहाच्या गॅलरीत एकही अधिकारी उपस्थित नव्हता. आपण सुध्दा सभागृहात राजकारणाच्या पलिकडे जाऊन हा विषय शासनाच्या लक्षात आणून दिला पाहिजे. कारण सदस्य केवळ बोलतात आणि निघून जातात अशी अधिकाऱ्यांची भावना व्हायला लागली आहे.

**तालिका सभापती** : मी स्वत: या विषयावर गंभीर आहे. केवळ नोंद घेतली असे नको तर दररोज सन्माननीय सभापती, सन्माननीय उपसभापती सुध्दा अनेक वेळा सूचना करतात आणि त्याची नोंद घेतली जात असल्याचे शासनाकडून सांगितले जाते, पण त्याची अंमलबजावणी दिसत नाही. म्हणून केवळ नोंद न घेता उद्यापासून याची अंमलबजावणी झाली पाहिजे, एवढी सूचना मी करु इच्छितो.

डॉ. दीपक सावंत : महोदय, शासनान 175 कोटी रुपये मेडिकल कॉलेजेसना दिलेले आहेत. त्या अनुषंगाने मला अशी सूचना करावयाची आहे की, एवढे पैसे दिलेले असताना आज या मेडिकल कॉलेजेसमध्ये 75 मान्यता नसलेले आणि 9 मान्यता रद्द झालेले पी.जी. कोर्सेस चालू आहेत, आणि शासनाने ते अजूनही चालूच ठेवले आहेत, ही जबाबदारी शासनाची आहे म्हणून त्यासंबंधीचा खुलासा होणे आवश्यक आहे. यासंदर्भात सभागृहात एक लक्षवेधी सूचना देखील येऊन गेली. त्या चर्चेच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आमच्याकडे इन्फ्रास्ट्रक्चर नाही, आमच्याकडे लेक्चरर्स नाही, आमच्याकडे प्रोफेसर्स कमी आहेत. यासंदर्भात एम.सी.आय. ने राज्यशासनाला पत्र लिहून सांगितले की, या कोर्सेसना परवानगी मिळण्याबाबत आतापर्यंत आपण आमच्याकडे अर्ज देखील केला नाही. अशा प्रकारे गेल्या 29 वर्षापासूनची परिस्थिती आहे. त्याचा परिणाम म्हणून मुंबईत झालेला एम.डी. डॉक्टर पर्टिक्युलर विषयाची मान्यता नसतांना पी.जी. झाला असेल तर त्याला बाहेरच्या राज्यात जाऊन प्रॅक्टीस करता येत नाही, त्याला फॉरेनमध्ये जाता येत नाही. म्हणून या अनुषंगाने एम.सी.आय. ने शासनाला आदेशदिले आहेत की, 31 मार्च, 2008 पर्यंत आपण या पी.जी. कोर्सेसचे रजिस्ट्रेशन, रिकग्नाईजेशन करुन घ्यावे, तसे केले नाही तर यापुढे आपल्याला मान्यता मिळणार नाही. इंदिरा

....2

डॉ. दीपक सावंत.........

गांधी मेडिकल कॉलेजमध्ये 6 डिप्लोमा आणि 14 डिग्री कोर्सेस अनरिकग्नाईज्ड आहेत. पुण्याच्या बी.जे.मेडिकल कॉलेजची स्थिती तर त्याहून भयानक आहे. आपण बी.जे. मेडिकल कॉलेजला पैसे दिले आहेत. त्या कॉलेजच्या बाजूला एक पब्लिक प्रायव्हेट यांच्या जॉइंट व्हेंचरमध्ये सुपर स्पेशॉलिटी हॉस्पिटल तयार आहे परंतु त्यात कोणतेही इन्स्ट्रुमेंट नाही. कारण फक्त इमारत बांधून तयार ठेवली आणि हॉस्पिटल मात्र बंद ठेवले आहे. मुंबईत सेंट जॉर्जेस रुग्णालयाबाबत सांगायचे झाल्यास त्या हॉस्पिटलच्या आवारात एक उंच इमारत दिसत आहे त्यातील तळमजला भाड्याने दिला असून वरच्या मजल्यावर कबुतरे राहतात, ही मुंबईतील हॉस्पिटल्सची कथा आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत......

सभापती महोदय, मी आता सार्वजनिक आरोग्य विभागावर माझे विचार व्यक्त करणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची परिस्थिती सुध्दा फार भयानक आहे. सन 2007-2008 मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागासाठी 907.65 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात केवळ या निधीच्या 41 टक्केच खर्च झाला. माझी अशी माहिती आहे की, सार्वजनिक आरोग्य विभाग असो, वैद्यकीय शिक्षण विभाग असो, आदिवासी कल्याण विभाग असो किंवा कोणताही विभाग असो या विभागाचे प्रस्ताव ज्या ज्या वेळी वित्त विभागाकडे पाठविले जातात त्या त्यावेळी आपले बजेट सरप्लस आहे म्हणून त्यांचे प्रस्ताव मान्य केले जात नाहीत. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदया डॉ. विमलताई मुंदडा यांनी सुध्दा खेद व्यक्त केलेला आहे. बजेटमधील पैसे खर्च केले नाही म्हणून पैसे शिल्लक राहतात. रुग्णालयात एक वेळ डॉक्टर नसेल तरी चालेल, रोगी मेला तरी चालेल परंतु बजेटचे पैसे शिल्लक राहिले पाहिजेत, अशा प्रकारची आजची ही व्यवस्था आहे ती योग्य नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयाचा विचार केला तर ठाणे जिल्हयातील आरोग्य विभागासाठी 12 कोटी 7 लक्ष 24 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती त्यापैकी 11.98 कोटी रुपयेच फक्त खर्च झालेले आहेत. लसीकरणाच्या कार्यक्रमासाठी केंद्रशासनाकडून 100 टक्के निधी दिला जात असतो. लसीकरण कार्यक्रम हा 100 टक्के केंद्रपुरस्कृत कार्यक्रम आहे. असे असतांनाही यावर राज्यशासनाचा किती खर्च झालेला आहे हा संशोधनाचा विषय आहे. सन 2005 ते -2007 पर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येक वर्षी 848 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली व 244 हजार रुपये खर्च करण्यात आले. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये खर्च का होत नाही याचा शोध घेतला पाहिजे.

सभापती महोदय, आदिवासी उपयोजनेतून सार्वजनिक आरोग्य विभागासाठी पैसे येत असतात. सार्वजनिक आरोगय खाते किंवा शिक्षण खात्यातून जे पैसे येतात त्या पैशांचा हिशोब आदिवासी खात्याला कधीच दिला जात नाही, खर्चाचा विनियोग कसा झाला आहे, पैसे कसे वापरण्यात आलेले आहेत याची काही सुध्दा माहिती आदिवासी खात्याला दिली जात नाही. परंतु हे पैसे वर्षाच्या शेवटच्या तीन महिन्यात वापरले जातात आणि त्यांची बिले काढली जातात. ठाणे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत......

जिल्हयात एकही अत्याधुनिक प्राथमिक आरोग्य केंद्र नाही. खरे म्हणजे प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात पाच आरोग्य तपासणी साधने आवश्क आहेत. ते म्हणजे स्टरलायझर, स्टेथोस्कोप, ब्लड प्रेशर तपासण्याचे मशीन, सक्शन मशीन, ऑक्सीजनचे सिलेंडर अशी पाच उपकरणे आवश्यक असतात या पाच उपकरणाशिवाय तुम्हाला सहावे उपकरण महाराष्ट्रातील कोणत्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात दिसणार नाही. ठाणे जिल्हयातील 14 ग्रामीण रुग्णालयांचा आढावा घेतला तर आपल्याला दिसून येईल की, या 14 रुग्णालयांसाठी 26 वाहने असून त्यातील 13 वाहने चालू स्थितीत असून 9 वाहने बंद असून 4 वाहने पुणे येथील विभागात जमा आहेत म्हणजे 50 टक्के वाहने चालू असून 50 टक्के वाहन बंद आहेत अशी परिस्थिती आहे. अकोला, अमरावती जिल्हयांची सुध्दा हीच परिस्थिती आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने आशा स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून आरोग्याचे काम करणार आहोत असे अर्थसंकल्पात म्हटलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमाच्या माध्यमातून या वर्षी केन्द्र सरकारने राज्य शासनाला 16 कोटी रुपये दिले होते. माननीय आरोग्य मंत्री सांगतात की ग्रामीण भागातील महिलांना, बालकांना उत्तम आरोग्य मिळावे, जनन दर आणि मृत्यूदर कमी व्हावे यासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत तसेच लसीकरणाचा कार्यक्रम देखील राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. केन्द्र सरकारने राज्य सरकारला राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत 2006-2007 मध्ये 136.24 कोटी रुपये दिले होते परंतु त्यापैकी फक्त 8.89 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे 2005-2006 साली केन्द्र सरकारने राज्य सरकारला 24.16 कोटी रुपये दिले होते. त्यापैकी 1.93 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. सभापती महोदय, राज्यातील आदिवासी भागामध्ये कुपोषण सतत वाढत आहे. गरीब मुलांना औषधे मिळत नाही तेव्हा हे पैसे पूर्णपणे का खर्च केले जात नाहीत. ? राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान हे केन्द्र सरकारने सुरु केले असून त्याअंतर्गत " आशा" ही स्वयंसेवी संस्था येते. मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, केन्द्र सरकार जर राज्य सरकारला या योजनेंतर्गत एवढा निधी देते तर राज्य सरकार हे पैसे का खर्च करीत नाही.? या वर्षी केन्द्र सरकारने राज्य सरकारला 16 कोटी रुपये या योजनेतंर्गत दिलेले आहेत त्या पैकी किती पैसे खर्च केले आहेत हे मला माहीत नाही. त्याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी मला द्यावी.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. प्रशासकीय खर्च मात्र सगळयात जास्त होत आहे.त्या तुलनेने औषधांवरील खर्च मात्र कमी होत आहे.2006-2007 मध्ये 2, 567.31 लाख रुपये एवढा प्रशासकीय खर्च करण्यात आला होता आणि 500 लाख रुपये औषधावर खर्च करण्यात आले होते. सार्वजनिक आरोग्य विभागाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे हे यावरुन दिसून येते.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागा पेक्षा वाईट परिस्थिती आदिवासी विकास विभागाची आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रा पैकी 16.5 टक्के क्षेत्र आदिवासी आहे. एखाद्या गावात 50 टक्के आदिवासी राहत असतील तर तेथे एकात्मिक आदिवासी प्रकल्प लागू केला जातो दहा हजार लोकवस्ती असेल आणि तेथे 50 टक्या पेक्षा जास्त आदिवासीची लोकसंख्या असेल तर तेथे माडा योजना लागू होत असते. अशा प्रकारे राज्यामध्ये एकूण 43 माडा प्रकल्प आहेत. 5 हजार

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ..

लोकवस्ती असेल आणि तेथे 50 टक्या पेक्षा अधिक आदिवासी असतील तर मिनी माडा प्रकल्प राबविण्यात येतो अशा प्रकारे राज्यामध्ये एकूण 24 मिनी माडा प्रकल्प आहेत . 51 टक्के आदिवासी उप योजनेच्या बाहेर राहतात. सभापती महोदय, मिनी माडा प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु आदिवासी विभागाच्या 2007-2008 सालच्या कार्यक्रम अंदाजपत्रकाच्या पुस्तकातील पान नंबर 136 वर त्या बाबतीत काय म्हटलेले आहे हे मी आपल्याला सागू इच्छितो. राज्य शासनाचे पुस्तक माझ्या हातामध्ये आहे. त्या पुस्तकात असे म्हटलेले आहे की, " सर्व शिक्षण् मोहिमेअंतर्गत समावेश न होणाऱ्या इतर पात्र विद्यार्थ्यांना वरील पुस्तक पेढी योजनेतर्गत पुस्तके देण्यात आली. 2006-2007 या शैक्षणिक वर्षी इयत्ता पाचवी तील पात्र विद्यार्थ्यांना पुस्तके पेढी योजनेचा लाभ देण्यात येईल परंतु आदिवासी उप योजने अंतर्गत. तरतूद मंजूर करण्यात आलेली नाही "

सभापती महोदय, आठव्या इयत्तेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्रय रेषेखालील मुलींना मोफत सायकली देण्याची एक योजना अर्थसंकल्पामध्ये जाहीर करण्यात आलेली आहे. परंतु त्यासाठी वेगळी तरतूद केली जाणार आहे किंवा नाही हे माहीत नाही ? सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांनी सांगितल्याप्रमाणे केवळ मुलीलाच सायकल दिली तर मुलाला काय वाटेल ? तेव्हा मुलाला आणि मुलीला सायकली देण्यात आल्या पाहिजेत. पुस्तक पेढी योजनेच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे, एक वर्षी या योजनेतून पुस्तक घेतल्यानंतर पुढच्या वर्षी ती पुस्तके परत करावयाची असतात आणि पुढच्या वर्षीची पुस्तके घ्यावयाची असतात परंतु त्यासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली नाही ही तरतूद करण्यात आली पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी मुलांना विद्या वेतन देणे ही अतिशय चांगली योजना आहे.परंतु ही योजना फक्त पुस्तकातच राहते त्याची योग्य पध्दतीने अंमलबजावणी केली जात नाही. इयत्ता पाचवी ते सातवी पर्यंतच्या मुलांना दरमहा 40 रुपये आणि आठवी ते दहावीच्या मुलांना दरमहा 50 रुपये या योजने अंतर्गत विद्यावेतन दिले जाते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

मुलांना 8वी ते 10वी पर्यंत दरमहा 50 रूपये अशा प्रकारे विद्यावेतन दिले जाते. सभापती महोदय, यातील पृष्ठ 150 वर पाहिले तर त्यावर असे लिहिलेले आहे की, सदर योजनेंतर्गत 2003-04 मध्ये ही योजना सुरू झालेली आहे आणि 2004-05 पासून या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली गेलेली नाही. म्हणजे आपण या आदिवासींसाठी काय करता आहात ? हा प्रश्न पडतो. सभापती महोदय, राज्य सरकारचे पुस्तकच सांगते आहे की, या योजनेंतर्गत तरतूदच अर्थसंकल्पात मागील वर्षी केलेली नाही. तीच गोष्ट खावटी कर्जाची आहे. या खावटी कर्जाचा अनेक आदिवासींना लाभ मिळतो परंतु त्यासाठी त्या आदिवासी माणसाला शहराच्या किंवा तालुक्याच्या ठिकाणी जाऊन बँकेत खाते उघडावे लागते आणि खाते उघडण्यासाठी त्याला 200 रूपये भरावे लागतात. पण त्याच्या खिशात 200 रूपये नसल्याने तो ते खाते उघडू शकत नाही आणि परिणामी तो खावटी कर्जासाठी पात्र ठरू शकत नाही. सभापती महोदय, महिला बचतगटांनाछोटी छोटी कर्ज दिली जात होती पण त्यात भ्रष्टाचार यव्हायला लागला म्हणून आपण ती योजना बंद केली. पण मग अशा सगळ्या योजनांचा अभ्यास करून या पेक्षा चांगली दुसरी योजना राज्य सरकारला करता आली असती. परंतु राज्य सरकारला मनापासून या आदिवासींना हे पैसे द्यायचेच नाहीत म्हणून सरकार अशा अवाजवी अटी त्यासाठी टाकते जेणे करून ते पैसे तसेच राहतील आणि मग ते दुसरीकडे वळविता येतील. तेव्हा या आदिवासी जनतेची क्रूर चेष्टा पुन्हा होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. सभापती महोदय, मी वेळेअभावी या ठिकाणी केवळ तीनच मुद्दे सांगितले. खरे तर मला अधिक मुद्दे येथे सांगता येऊ शकतात.

सभापती महोदय, दुसरे मला सांगावयाचे आहे की, आपण हे सारे सांगितले. पण आज महाराष्ट्रालाच नाही तर संपूर्ण जगाला भेडसावणारा प्रश्न ग्लोबल वॉर्मिंगचा. आज यामुळे अवेळी पाऊस पडतो आहे, गेले चार दिवस कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा या भागामध्ये अवेळी पाऊस पडतो आहे. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यासाठी कोणतीही तरतूद राज्य सरकारने या अर्थसंकल्पात केलेली नाही. खरे तर यासाठी एखादी अशी संस्था असावी की, जी पर्यावरणाचा अभ्यास करील. पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामध्ये गॅस येतो आहे, कार्बनचे प्रमाण, मिथेनचे प्रमाण काय आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

...... 3आय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि म्हणूनच देशात याचा अभ्यास करण्याची सुरूवात देखील आपल्या महाराष्ट्रातच व्हावी असे मला वाटते. पण यासाठी एका रूपयाची देखील तरतूद असू नये यासारखे दुर्दैव दुसरे कोणतेही नाही. आपल्याला तेवढी समयसूचकता देवाने निश्चितपणे दिलेली आहे. हवेमध्ये, तापमानामध्ये होणारे बदल, प्राण्यांवर त्याचे होत असलेले परिणाम आणि त्यामुळे त्यांच्यात होणारा एकूण बदल, तसेच त्या तापमानाचाहवेतील बाष्पावर होणारा यपरिणाम, लोकांच्या आरोग्यावर होत असलेला परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी एखादा अभ्यासगट आपण नेमला पाहिजे होता. परंतु दुर्दैवाने तसे झालेले नाही. त्यामुळे आता या चर्चेला उत्तर देताना आपण मंत्री महोदय, स्वत: सुविद्य आहात आणि मेडिकल व्यावसायिक आहात त्यामुळे आपल्याकडून अपेक्षा आहे की, या सर्वांसाठी काही करणे आवश्यक आहे त्यासाठी आम्हाला काही मिळेल आणि हा अंध:काराकडे नेणारा अर्थसंकल्प आहे एवढे सांगून मी भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

***



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या ठिकाणी मी अर्थसंकल्पाचे समर्थन करते आणि त्याला माझा पाठिंबा देते. मी या ठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांचे, माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करताना या अर्थसंकल्पात काही गोष्टी दुरूस्त करणे आवश्यक आहे त्या दृष्टीने मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, सुरूवातीस या अर्थसंकल्पातील काही बाबींचा येथे स्पष्ट उल्लेख होणे गरजेचे आहे त्यांचा थोडक्यात आढावा घेण्याचा मी प्रयत्न करणार आहे. ज्यात आदिवासी विभाग, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, भटके-विमुक्त, महिला, अल्पसंख्यांक या सर्वांचे हित, शेतकरी, शेतमजूर आणि कामगार या सगळ्यांचे हित जोपासण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून केला आहे किंवा नाही या संदर्भात या अर्थसंकल्पाचे विश्लेषण होणे गरजेचे आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे ...3जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे...

यादृष्टीने या अर्थसंकल्पाचे विश्लेषण होण्याची गरज आहे. याबाबत मी एका वाक्यात सुस्पष्ट सांगेन की, या राज्यातील शेतकरी, शेतमजूर, कामगार, महिला, भटक्या-विमुक्त, आदिवासी, मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय आणि संपूर्ण राज्यातील शहरी आणि ग्रामीण अशा सर्व स्तरावरील प्रश्न सोडविण्याचा यशस्वीपणे प्रयत्न या अर्थसंकल्पाने केला आहे. मला याठिकाणी माझ्या लहानपणीची आठवण येते. आमच्या लहानपणी आमची आजी आमच्या वडिलांना ओवाळतांना म्हणावयाची की, "ईडा पिडा टळो, आणि बळी राजाचे राज्य येवो" असे तीन वेळा म्हणावयाची. आणि त्यानंतर ओवाळणे संपावयाचे. महात्मा ज्योतिबा फुले यांची ही कल्पना होती की, या देशामध्ये शेतकऱ्याचे राज्य असले पाहिजे. शेतीप्रधान अर्थसंकल्प असला पाहिजे. शेतकऱ्यांचे सक्षमीकरण झाले पाहिजे, त्यांच्या शेती व्यवसायाला उद्योगाचा दर्जा मिळाला पाहिजे. शेतकरी संपन्न झाला, तो जगला तर देश जगेल ही कल्पना सर्वांनी जागविली पाहिजे.

सभापती महोदय, या देशामधील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. हा क्रांतिकारी निर्णय घेण्याच्या पाठीमागे केंद्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेब, माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग, माननीय अर्थमंत्री या सर्वांचे श्रेय असून मी पहिल्यांदा त्यांचे अभिनंदन करते आणि त्यानंतर या विषयाकडे वळते. हे अभिनंदन करीत असतांना संपूर्ण देशातील आणि राज्यातील वर्तमानपत्रांमध्ये छापून आलेल्या बातम्या आपण पाहिल्या आणि मागील सर्व अर्थसंकल्पांच्या संदर्भातील छापून आलेल्या बातम्यांचा संदर्भ पाहिला, मागील सर्व इतिहास शोधून काढला तर कर्जमाफीच्या संदर्भातील पहिल्या पानावर छापून आलेली बातमी अर्थसंकल्पाच्या इतिहासामध्ये पहावयास मिळाली नाही. त्यामुळे अर्थसंकल्पाच्या बातमीच्या शिर्षकाचे छापून आलेले कात्रण आपल्या माहितीसाठी मी आपणाकडे पाठवून देते. शासनाने घेतलेल्या कर्जमाफीच्या निर्णयाचा फायदा राज्यातील 75 टक्के शेतकऱ्यांना होणार आहे. ॲडव्हाँटेज ऑफ इंडियाचे कात्रण माझ्याकडे आहे, त्यामध्ये देखील कर्जमाफीच्या निर्णयाचे वृत्त देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे माननीय कृषी मंत्र्यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, "सावकाराचे दमडीचेही कर्ज फेडू नका." अशाप्रकारे सर्व वर्तमानपत्रांमध्ये छापून आलेल्या बातम्यांची कात्रणे मी सभागृहासमोर ठेवते. तसेच, शेतकऱ्यांना दिलेल्या पॅकेजसंबंधी छापून आलेल्या बातम्यांची कात्रणे सभागृहासमोर ठेवते. त्याची दखल सभागृहाने घेणे गरजेचे आहे. ज्यावेळी देश पातळीवरील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्रीमती उषाताई दराडे...

इलेक्ट्रॉनिक मिडियामध्ये याची चर्चा होते त्यावेळी त्याची आपण दखल घेणे गरजेचे आहे. यामध्ये पाणी पुरवठयाकरिता किती तरतूद केली आहे? सिंचनासाठी किती तरतूद केली आहे? आदिवासींकरिता किती तरतूद केली आहे? याची विस्तृत माहिती मी देणार नाही. परंतु हे करीत असतांना अजून काही गोष्टी करणे गरजेचे आहे त्याबाबत मी उल्लेख करु इच्छिते. सभापती महोदय, सन 2006-07 चा इकॉनॉमिक सर्व्हे ऑफ महाराष्ट्र पाहिला तर त्याच्या पृष्ठ क्रमांक 115 व 116 वर आपल्याला उल्लेख आढळून येतो. तो मी आपणास वाचून दाखविते. "संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने 1979 मध्ये भरलेल्या परिषदेत महिलांबाबत असलेले सर्व भेदभाव दूर करण्याचे धोरण स्वीकारले. त्या परिषदेमध्ये महिलांबाबत असलेले भेदभाव दूर करुन आणि आपापल्या न्याय व्यवस्थेमध्ये समानतेचे तत्व अंतर्भूत करणे हे सदस्य राष्ट्रांना बंधनकारक करण्यात आले आहे." अशाप्रकारचे घालण्यात आलेले बंधन महाराष्ट्र सरकारने पाळावयास पाहिजे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाची बाब अशी की, याबाबत सरकारला ऑब्जर्व्हेशन करावे लागेल की, त्या परिषदेमध्ये स्वीकारलेल्या धोरणाबाबतचा पाठपुरावा महाराष्ट्र सरकारने केला आहे की नाही? सन 1994 मध्ये महिला धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राष्ट्र आहे. सन 2001 मध्ये या धोरणाचा पुन्हा आढावा घेण्यात आला. अशाप्रकारे या धोरणाचा आढावा दर तीन वर्षांनी घेतला पाहिजे. हा प्रश्न याठिकाणी उपस्थित करण्याचे कारण असे की, या धोरणाचा फेर आढावा घेण्याचा प्रसंग आता आला आहे. नवीन संदर्भ, नवीन प्रश्न, प्रगतिच्या नवीन निरनिराळया दिशा, सद्या होत असलेली मुक्त अर्थव्यवस्था व त्यानुषंगाने होत असलेली प्रगती. त्यामध्ये महिलांचा संदर्भ असल्यामुळे महिलांची प्रगती वेगाने झाली पाहिजे. सन 2001 मध्ये रिलिज झालेल्या महिला धोरणाचा पुन्हा आढावा घेतला पाहिजे. हा आढावा घेत असतांना शासकीय, निम शासकीय व शासकीय अनुदान मिळणाऱ्या संस्थांमध्ये महिलांना केंद्रभूत मानून नियोजन केले पाहिजे. तसेच, महिलांचे सबलीकरण करण्यासाठी पुरेसा निधी देण्याकरिता आपण तरतूद केली पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे . . . .

आपण बचत गटाच्या व्दारे आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न करीत आहोत. कृषी विकासामध्ये व ग्राम विकासामध्ये महिलांचा जो सहभाग आहे, त्याची विशेष दखल घेऊन बचत गट बांधणी मोठया प्रमाणात करण्यात येत आहे. महिला बचत गट तयार करीत आहेत. महिलांना घराच्या बाहेर पडावयाचे आहे. त्यांना देशाच्या बांधणीच्या कामामध्ये सहभागी व्हावयाचे आहे, अशी त्यांची इच्छा आहे आणि त्यादृष्टीने त्यांनी पावले टाकलेली आहेत. परंतु या क्षणाला आपण जर त्यांना गट बांधणीचे प्रशिक्षण, कर्ज घेण्याचे प्रशिक्षण, कर्ज वितरित करण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. तसेच पत पुरवठा म्हणजे काय ? पत वाढते म्हणजे नेमके काय होते ? त्याचे मार्केटींग कसे करावयाचे ? याची माहिती देऊन या महिलांना पापड आणि लोणची यामधून कसे बाहेर काढावयाचे ? याचा विचार केला पाहिजे. स्वयंपाकघरातील जी कामे असतात, तीच कामे, तोच व्यवसाय महिलांनी घराच्या बाहेर येऊन करावा आणि त्यातून देशाची फार मोठी बांधणी होईल असे स्वप्न कोणी बाळगण्यात अर्थ नाही. या महिलांना अशा प्रकारचे उद्योग उपलब्ध करुन देणे आणि त्याच्या मार्केटींगची व्यवस्था करणे यादृष्टीने महाराष्ट्र शासन पावले टाकत आहे त्याबद्दल मी अभिनंदन करीन. परंतु त्याची गती कमी आहे आणि त्याचे मुख्य म्हणजे आपण बजेट करीत असताना जनरल सेन्सेटीव्ह बजेट करण्याचा मार्ग अवलंबिण्यामध्ये विलंब करीत आहोत. आज आपल्याला प्रत्येक क्षेत्रामध्ये मग ते कृषी क्षेत्र असेल, पाणीपुरवठा असेल, सिंचन असेल, आदिवासींच्या योजनांमध्ये, मागासवर्गीयांच्या योजनांमध्ये, शहरांच्या विकासाच्या योजनांच्या बाबतीत जनरल सेन्सेटीव्हीटी असणे ही काळाची गरज आहे आणि ही बाब केंद्र शासनाने स्विकारलेली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने सुध्दा अत्यंत गंभीरपणे पावले टाकणे गरजेचे आहे असे मी येथे नमूद करु इच्छिते.

सभापती महोदय, केंद्र शासनाचा 2006-2007 चा जो इकॉनॉमिक सर्व्हे आहे, त्यातील पान क्र.222 वर जेंडर बजेटींग बाबत माहिती दिलेली आहे, मला सदनामध्ये त्याचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. " Annual Plan of 2006-07 carried towards the two important on going strategies of Women Component Plan (WCP) and Gender budgeting. The main object is to mainstream gender perspective in all sectoral policies and programmes and to work towards the ultimate goal of elimination of gender discrimination..."याच्यामध्ये जेंडर डिस्क्रीमिनेशनला बाजूला काढणे आणि ते संपविणे

. . . .3 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे . . . .

ही महत्वाची बाब आहे असे म्हटलेले आहे आणि हे बजेटमध्ये असले पाहिजे. यामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की, "....and creating enabling environment for Gender Justice and Empowerment of Women: the WCP envisages that not less than 30% of funds, benefits are earmarked under various schemes..." आपल्याला 30 टक्क्यापेक्षा कमी रक्कम महिलांच्या वेगवेगळया योजनांमधील सहभागासाठी जेंडर सेन्सेटीव्हीटी देऊन बजेटमध्ये आपल्याला 30 परसेंटच्याखाली जाता येणार नाही अशी कन्सेप्ट केंद्र शासनाने येथे स्विकारलेली आहे. यामध्ये पुढे असे म्हटलेले आहे की,"...of women related Ministries/Departments for women. Gender budgeting is perceived as a powerful tool for tracking not only allocation of resources for women but also implementation of issues and outcomes." मला या बाबींचा उल्लेख करणे गरजेचे वाटले, कारण केंद्र शासन बजेटमध्ये जेंडर सेन्सेटीव्हीटी मंजूर करीत असेल तर राज्य शासनाने सुध्दा जनरल सेन्सेटीव्हीटी मंजूर केली पाहिजे. 2006-2007 चा राज्य शासनाचा आणि केंद्र शासनाचा इकॉनॉमिक सर्व्हे वाचत असताना असे दिसून आले की, केंद्र शासनाच्या इकॉनॉमिक सर्व्हेमध्ये महिलांच्या मुद्यांसाठी अधिक पाने दिली आहेत, अधिक वेळ दिलेला आहे. पण राज्य शासनाच्या इकॉनॉमिक सर्व्हेमध्ये मात्र अत्यंत त्रोटक शब्दामध्ये उल्लेख आलेला आहे. आपण महिलांसाठी पुष्कळ करीत आहोत. परंतु ते बोलणे, ते रेकॉर्डवर आणणे याचे महत्व समजून घेणे गरजेचे आहे. याबाबतीत काम करीत राहणे आणि त्याला एक निश्चित दिशा देणेही गरजेचे आहे. आपण तसे काही करीत नाही का ? याबाबतीत नकारात्मक भूमिका घेणे चुकीचे होईल. आपण याबाबतीत प्रगती साधलेली नाही काय ? तर निश्चितपणे प्रगती साधलेली आहे. महाराष्ट्र शासनाने धोरण आखले. पंचायत राजची अंमलबजावणी केली, फास्ट ट्रॅक कोर्ट सुरु केले. वारसा हक्काचा कायदा केला. महाराष्ट्र राज्य हे महिलांसाठी काम करणारे आहे. पण 1992 मध्ये लक्ष्मी या नावाने एक जी.आर.आलेला आहे आणि त्यानुसार शासनाने 7/12 वर महिलांचे नाव लावण्याचे ठरविले आहे. पण तसे ते होत नाही. सर्व 7/12 वर नवऱ्याचेच नाव लागते. या पुरुष प्रधान संस्कृतीने नवऱ्यांना मालकच केलेले आहे. परंतु आम्ही सुध्दा मालकीणी आहोत. महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुरुषप्रधान संस्कृतीला भेद देत ही कल्पना पुढे आणली. ही बाब राज्य .....

. . . .3 के-3



श्रीमती उषाताई दराडे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासन मान्य करीत आहे, तसे कायदे करीत आहे, सर्क्युलर काढत आहे पण कर्मचाऱ्यांची आणि समाजाची याच्या अंमलबजावणीच्या बाबतीत मानसिकता दिसून येत नाही. आपण या मानसिकतेवर बोट ठेऊन पुढे जावयास पाहिजे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ....

महाराष्ट्र पुरोगामी आहे आणि त्या विषयी कोणीही वाद निर्माण करणार नाही. त्या मानसिकतेवर बोट ठेऊन पुढे गेलो तर प्रगतीची गती वाढल्याशिवाय राहणार नाही. जसे "धर दोघांचे" ही योजना माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी आणली. परंतु घरावर कोणत्याही पी.टी.आर. ला बायकोचे नाव टाकावयास एकाही ग्रामसेवकाचा हात धजावत नाही. कशाला सीता निर्माण होईल ? कशाला नवीन रामायण निर्माण होईल ? नवीन रामायण कोणी निर्माण करावयाचे ? यासाठी कर्मचाऱ्यांमध्ये मानसिकता निर्माण करणे आवश्यक आहे. ती मानसिकता नसेल तर रेव्हेन्यू ऑफीसर्सला जबाबदार धरावे. या पध्दतीने थोडेसे पाऊल टाकणे गरजेचे आहे. हा प्लॅन करीत असताना आपल्याला महत्वाच्या तीन बाबी लक्षात घ्याव्या लागतील. सोशल एम्पॉवरमेंट, इकॉनॉमिक एम्पॉवरमेंट आणि जेंडर जस्टीस या बाबी आहेत परंतु त्याचा वेगळा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये केलेला नसल्यामुळे आपल्याला फार अडचणीचे होते. महिलांच्या सक्षमीकरणाचे हे स्वप्न जर आपल्याला पूर्ण करावयाचे असेल तर पूर्वी आपण जशी काही ऐतिहासिक पावले उचललेली आहेत, जसे वारसा हक्कात महिलांना अधिकार दिला त्याच पध्दतीने आणखी काही पावले उचलावी लागतील. राष्ट्रीय पातळीवर पतपुरवठा करणारा राष्ट्रीय महिला कोष आहे. या राष्ट्रीय महिला कोषाच्या अत्यंत महत्वाच्या ज्या बाबी आहेत त्यामध्ये "फ्लेक्झीबीलीटी ऑफ क्रेडिट नॉर्म्स" हे फार महत्वाचे आहे. कर्ज अत्यंत सुलभ पध्दतीने देणे आवश्यक आहे. महिलांना पत म्हणजे काय, कर्ज म्हणजे काय हेच कळत नाही. म्हणून या मायक्रो फायनान्समध्ये जर पुढचे पाऊल टाकावयाचे असेल तर राज्य शासनाने डेअरी असेल, फिशरी असेल, कृषी असेल या सर्व क्षेत्रात गेले पाहिजे. जर त्या क्षेत्रात जावयाचे असेल तर पतपुरवठा करणाऱ्या संस्थांची वाढ करणे गरजेचे आहे. म्हणून राज्य महिला कोषाची निर्मिती करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य पाऊल टाकल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री वाटते. या ठिकाणी एका कायद्याचा फार मोठ्या प्रमाणामध्ये ऊहापोह झाला. तो कायदा म्हणजे डोमॅस्टिक व्हायोलन्स ॲक्ट, 2005. याबाबतीत आपण 2006 पासून अंमलबजावणी केली. एक बाब मला या ठिकाणी नमूद करावयाची आहे. आपण महिला आयोग स्थापन केला. केंद्राचा सुध्दा महिला आयोग आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्रीमती उषा दराडे ......

परंतु केंद्राचा महिला आयोग ज्या शिफारशी, कायद्याच्या ज्या ॲमंडमेंट्स केंद्र सरकारला सुचवतो त्याची अंमलबजावणी होते. डोमेस्टिक व्हायोलन्स बिल हा त्याचाच एक परिणाम आहे. याच्यातील बऱ्याच शिफारशी केंद्राच्या महिला आयोगाने केंद्र सरकारला सुचविलेल्या होत्या. महाराष्ट्राचा राज्य महिला आयोग सुध्दा अशा अनेक शिफारशी महाराष्ट्र राज्याला सुचवतो. मी स्वत: पाच वर्षे राज्य महिला आयोगामध्ये सभासद म्हणून काम केलेले आहे. त्या काळामध्ये अनेक कायद्यांच्या बाबतीत सुधारणा सुचविलेल्या आहेत. खरे म्हणजे फौजदारी कायदा, पुराव्याचा कायदा, पोटगीचा कायदा असे खूप कायदे आहेत पण त्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जी मानसिकता आहे त्याबाबत मी मघाशी सांगितले. कायद्याची अंमलबजावणी करण्याची मानसिकता या समाजाची नाही त्यामुळेच 1994 चे महिला धोरण आपल्याला आणावे लागले. ती मानसिकता निर्माण करणे गरजेचे आहे. यावर त्या महिला धोरणामध्ये विशेष भर दिलेला होता. आपण राज्य महिला आयोगाचे जे गठन केलेले आहे त्यामध्ये काय हेतू आहे ? त्यामध्ये कार्यकक्षा व्हास्ट आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर कार्यकक्षा आहेत. त्यामध्ये रिमांड होम तपासणे, शॉर्ट स्टे होम तपासणे, महिला बाल विकासाची सर्व केंद्रे तपासणे, कारागृहे तपासणे या बाबी आहेत. आम्ही किती तरी कारागृहांच्या महिला कक्षांची तपासणी केलेली आहे. या अर्थसंकल्पामध्ये तरतूद व्हावयास पाहिजे. त्याचा उल्लेख यामध्ये व्हावयास पाहिजे. या महिला परिस्थितीने गुन्हेगार होतात. ज्या महिला परिस्थितीने गुन्हेगार होऊन कारागृहामध्ये जातात, त्यांना शिक्षण देणे, त्यांच्या आरोग्याची जबाबदारी घेणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना उद्योग मिळवून देणे, त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी घेणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. परिस्थितीमुळे महिला कारागृहामध्ये जाते. कोणीही परिस्थितीमुळे गुन्हेगार होतो आणि त्याचा दोष समाजावर जातो. म्हणून या महिलांसाठी वेगळे काही तरी करण्याची गरज आहे. अशा सूचना राज्य महिला आयोगाने महाराष्ट्र शासनाला वारंवार केलेल्या आहेत. अनेक सोयींच्या बाबतीत आम्ही पाहणी केलेली आहे. औरंगाबाद येथील हर्सूलच्या कारागृहात जा, नागपूरच्या कारागृहात जा, येरवड्याच्या कारागृहात जा, त्या ठिकाणी पुरुषांसाठी ज्या सोयी आहेत त्या महिलांसाठी नाहीत. हा भेदभाव का ? यासंदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाने फार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG

श्रीमती उषा दराडे .....

गंभीर असले पाहिजे आणि महिला आयोगाच्या दृष्टीने तर फारच गंभीर असले पाहिजे. या महिला आयोगाकडील प्रलंबित प्रकरणांची संख्या पाहिली तर वकील दिले तरी 10 वर्षे सुध्दा ही प्रकरणे निकाली निघणार नाहीत. त्या ठिकाणी स्टाफ वाढवावयास पाहिजे. स्टाफ वाढवण्यासाठी त्यांना बजेट वाढवून द्यावयास पाहिजे. आज महिला आयोगाची काय परिस्थिती आहे ? आपण त्यांचे ऑडिट तपासून पहावे. त्यामध्ये जास्तीत जास्त 40 लाख, 50 लाख, 60 लाख एवढीच तरतूद दिसेल. त्यामध्ये राज्य महिला आयोग कसे काम करणार ? त्यांच्याकडून आपण काऊन्सिलिंग सेंटर्स बघाल, रेल्वेमध्ये व्यवस्थित सोय आहे की नाही ते बघाल, स्वच्छतागृहे चांगली आहेत की नाही हे बघाल. तक्रार निवारण कक्ष सगळ्या राज्यातील सगळ्या डिपार्टमेंटमध्ये आहेत की नाही हे बघाल. त्यामुळे या महिला आयोगाला किमान दोन कोटी, तीन कोटी, चार कोटी रुपयांचे बजेट देण्यास काय हरकत आहे ? जी बेसिक काम करणारी संस्था आहे त्यांचे बजेट किमान लाखामध्ये तरी नसावे अशा प्रकारची सूचना मी या ठिकाणी करते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

महिलांचा शेतीमधील सहभाग या विषयासाठी शासन खर्च करीत आहे. परंतु हा खर्च काही तालुक्यात होत आहे, काही बचत गटांचे सक्षमीकरणावर होत आहे. ज्या महिला प्रत्यक्षात शेतीमध्ये काम करतात, त्या महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा व मूल्य मिळाले पाहिजे. महिला ही 16 तासापेक्षा जास्त काम करते. परंतु 8 तास काम करणा-या पुरुषांच्या श्रमाला प्रतिष्ठा व मूल्य दिले जाते. यादृष्टीने मेन स्ट्रीमिंग करीत असताना या महिलांना, या बचत गटांना आणि शेतीमध्ये काम करणा-या महिलांना शासनाने काही तरी वेगळे देण्याची गरज आहे. विमेन ॲग्रिकल्चरिस्टसाठी देश पातळीवर भुवनेश्वरला एक रिसर्च सेंटर आहे. या सभागृहाच्या सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आणि पुणे महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती राजलक्ष्मी भोसले या त्या संस्थेच्या सभासद आहेत. मग राज्याने असे रिसर्च सेंटर का स्थापन करु नये ? शेतीमध्ये काम करणा-या महिलांकरिता सरकारने विमेन ॲग्रिकल्चरिस्टसाठी एक रिसर्च सेंटर काढावे अशी माझी यानिमित्ताने सूचना आहे. आज महिलांची अर्धी शक्ती शेतातील कामासाठी खर्च होत आहे. या देशाला ती जगविते आहे. ज्या महिलेने अन्नधान्याचा शोध लावला आहे, ती आज पेरणी करते, खुरपणी करते, नांगरणी करते, ज्वारी काढते, ऊस तोडते, सगळया प्रकारची कामे करते. त्यामुळे तिला नवीन दृष्टी देण्याची, तिला नवीन तंत्रज्ञान देण्याची गरज आहे. जसे राज्य महिला कोषाची गरज आहे तशीच शेतात काम करणा-या महिलांच्या संदर्भात संशोधन करणारे नवीन केंद्र राज्यामध्ये झाले पाहिजे. कारण भुवनेश्वरला या राज्याचा क्रॉपिंग पॅटर्न माहीत नाही. राज्यामध्ये वर्षातून 30 दिवस कधी तरी पाऊस पडतो, तो काही तास पडतो, त्यातील काही पाणी वाहून जाते आणि उर्वरित पाण्यावर शेती केली जाते. म्हणून हे ज्ञान महिलांना देणे आवश्यक आहे. त्यासाठी एक रिसर्च सेंटर निर्माण करुन, एक नवी दिशा देण्यासाठी शासनाने प्रगतीचे पाऊल टाकावे अशी सूचना मी शासनाला करीत आहे.

सभापती महोदय, या राज्याचा मानव विकास निर्देशांक काढला जातो. 2001 पर्यंत या निर्देशांकाचा सर्व्हे केला आहे. या सर्व्हेसाठी श्री.भोगे नावाचे अधिकारी नेमलेले आहेत. परंतु राज्याने मानव विकास निर्देशांकाचा 2001 नंतर सर्व्हे का केला नाही ? यासाठी एखादी कमिटी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

का स्थापन केली नाही ? महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक काय आहे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महिलांनी शिक्षण क्षेत्रात, आरोग्य क्षेत्रात, कृषी क्षेत्रात, विज्ञान क्षेत्रात, नोकरी धंद्यामध्ये काय प्रगती केली आहे हे माहिती पाहिजे. आदिवासी भागामध्ये ज्या सुखसोयी देतो त्यातून किती मानव विकास निर्देशांक वाढविला, कामाचे किती तास वाढविले, किती उपाशी पोटे जगविली ? याची माहिती असणे आवश्यक आहे. शेवटी शासन हे गरीबांच्या हातातोंडाची गाठ घालण्यासाठी प्रयत्न करीत आहे. याच्यातून किती गरीब जगले, त्यातून किती गरीब दारिद्रय रेषेच्यावर आले या गोष्टीचा सर्व्हे तर व्हावयास पाहिजे. हा सर्व्हे करण्याच्या दृष्टीने ताबडतोब एका कमिटीचे गठन केले जावे आणि त्या कमिटीच्या माध्यमातून राज्यातील मानव विकास निर्देशांकाची गोळा बेरीज केली पाहिजे. जन्म दर, आयुर्मर्यादा काय आहे, प्रौढ साक्षरता किती आहे, पंधरा वर्षानंतर शासनाने काय केले, किती लोक साक्षर झाले, दरडोई स्थूल उत्पन्नाच्या सहाय्याने प्रगती झाली, राहण्याचा दर्जा वाढला आहे की नाही याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शेतीच्या संदर्भात मला एक विनंती करावयाची आहे. आपण जेवढी प्रगती केली त्याच्यावरच आत्मसंतुष्ट राहतो. परंतु शेतीमध्ये नवीन नवीन प्रयोग करणे गरजेचे आहे. राज्याने फळबागांसाठी प्रयोग केला आहे. फळबागासंबंधी कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात एकच केंद्र निर्माण केले आहे. मराठवाडयामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात फळबाग लागवड केली जाते. म्हणून फळबाग लागवडीसंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी मराठवाडयातील बीड जिल्हयात उपकेंद्रनिर्माण करावे. आजपर्यंतचा ट्रेंड असा आहे की, कोणतेही नवीन कार्यालय सुरु करावयाचे असेल तर ते औरंगाबाद जिल्हयात, लातूर जिल्हयात सुरु होते, नांदेडला सुरु होते. रेशीम संकूल उभे करावयाचे असेल तर ते प्रथम लातूर जिल्हयात सुरु होते. आतापर्यंत केंद्रीभूत विकास झ ाालेला आहे. मराठवाडयाच्या परिघामध्ये जेवढे जिल्हे आहेत, जेथून रेल्वे धावते तेथे सर्व कार्यालये सुरु होतात. येथून पुढे मराठवाडयामध्ये सुरु होणारी कार्यालये बीड जिल्हयामध्ये सुरु व्हावीत अशा प्रकारची सूचना करते.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : सभागृहाची वेळ आपण 6 वाजेपर्यंत वाढविलेली आहे. माननीय सदस्यांनी या वेळेपर्यंत आपले भाषण संपविले तर बरे होईल.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, रेशीमा ा उद्योगामध्ये बीड जिल्हा हा महाराष्ट्रामध्ये दुस-या क्रमांकावर आहे. आम्हाला प्रत्येक वेळी 80 वरुन 100 हेक्टर, 100 वरुन 150 हेक्टर असे टारगेट देण्यात येते. माझे तर म्हणणे असे आहे की, आम्हाला एकदा 2000चे टारगेट देऊन बघा आणि मग बीड जिल्हा कसा पुढे जातो ते पहा. या सभागृहामध्ये माननीय वनमंत्री उपस्थित नाहीत. परंतु मला त्यांना एक सूचना करावयाची आहे. ज्याप्रमाणे रोहयोमध्ये हॉर्टिकल्चरसाठी अनुदान दिले जाते त्याप्रमाणे वनौषधीसाठी अनुदान द्यावे. आज सर्वत्र आयुर्वेदाचा पुरस्कार केला जात आहे. त्यामुळे वनौषधीची शेती करण्यासाठी आपण शेतक-यांना अनुदान देऊन प्रोत्साहन द्यावे. वनौषधीच्या संदर्भात महामंडळ होणार असे ऐकण्यात येते. हे महामंडळ लवकरात लवकर करावे. तसेच पहिले प्रशिक्षण केन्द्र बीड जिल्ह्यामध्ये करावे. आमच्या बीडमध्येही बालाघाट आहे. वनौषधीसाठी लागणारे हवामान आहे. आमच्याकडे श्रमशक्ती देखील आहे. तेव्हा वनौषधीची शेती करण्यासाठी शेतक-यांना अनुदान देऊन त्यांना एक शेतीला पूरक असा व्यवसाय द्यावा. ज्या प्रमाणे दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन हे शेतीला पूरक असे व्यवसाय आहेत. त्याप्रमाणे वनौषधीची शेती हा देखील शेतक-यांना चांगला पूरक व्यवसाय होईल.

सभापती महोदय, आणखी एक महत्वाचा विषय मी या ठिकाणी मांडू इच्छिते. वीज पडून बैल मेला किंवा कोणतेही जनावर मेले तर नुकसान भरपाई म्हणून किती पैसे मिळतात ? ही जी नुकसान भरपाई मिळते त्यामध्ये एखादी उस्मानाबाद शेळी देखील घेता येणार नाही. काल-परवा मी वर्तमानपत्रामध्ये एक बातमी वाचली. त्या बातमीमध्ये एका बैलाची किंमत 1 लाख 5 हजार अशी दिली होती. या निमित्ताने मला अशी सूचना करावयाची आहे की, अपघातामध्ये गाय, म्हैस असे जनावर मेले तर त्याबाबतीत कमीत कमी 30 हजार रु. नुकसान भरपाई द्यावी आणि ही किंमत वस्तुस्थितीला धरुन आहे.

सभापती महोदय, आणखी एका बाबीकडे मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. या बजेटमध्ये विविध महामंडळासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. संत रोहिहदास चर्मोद्योग विकास महामंडळाकरिता 30 कोटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाकरिता 60 कोटी, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाकरिता 16 कोटी, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळासाठी 100 कोटी अशी

..2..

(श्रीमती उषा दराडे....

भरीव तरतूद केलेली आहे आणि इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, शेळी व मेंढी विकास महामंडळ या महामंडळांसाठी कोणतीही निश्चित स्वरुपाची तरतूद न करता केवळ भरीव तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल एवढेच अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये नमूद करण्यात आलेले आहे, हे बरोबर नाही. तेव्हा इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ आणि शेळी व मेंढी विकास महामंडळ या तीनही महामंडळास 200-200 कोटी रुपयाची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने शासनास सूचना करीत आहे.

सभापती महोदय ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत मराठवाड्यासाठी अजिबात निधी दिला गेला नाही. एक गोष्टी मी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छिते की, दोन वर्षापूर्वी असे सांगण्यात आले होते की, विमुक्त जाती आणि भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांनी तंत्र शिक्षणासाठी प्रवेश घेतला तर त्यांना पैसे दिले जातील. मागील दोन वर्षामध्ये एका तरी विद्यार्थी-विद्यार्थीनीला अशा प्रकारे पैसे दिले गेले आहेत काय हे शासनाने सागावे. जी.आर. चुकीचा आहे अशा प्रकारच्या अडचणी सांगितल्या जातात. या संदर्भात सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकात हांडोरे यांना श्री. अनिल रामचंद्र कलढोणे यांनी लिहिलेले पत्र मी मुद्दामहून सभागृहाच्या पटलावर ठेवू इच्छिते.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ संपलेली आहे.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझे भाषण अपूर्ण आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. अरविंद सावंत ) : सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांचे भाषण अपूर्ण आहे. त्यांनी आपले भाषण उद्या पूर्ण करावे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 26 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 01 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 26 मार्च, 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

--------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही